
# गांव झिजत आहे

डॉ. द्वारकादास लोहिया



# गाव झिजत आहे

लेखक

डॉ. द्वारकादास लोहिया

■ **गाव झिजत आहे**

(Gaon Zijat Aahe)

■ **लेखक**

डॉ. द्वारकादास लोहिया

(Dr. Dwarakadas Lohiya)

■ **प्रकाशक**

श्री. सतिश आणि सौ. छाया काकडे,

विचारधारा ग्रामीण विकास संस्था, आशिव,

ता. औसा जि. लातूर

■ **मुखपृष्ठ व आतील फोटो**

मानवलोक

■ प्रथम आवृत्ती: सप्टेंबर २००७

द्वितीय आवृत्ती: फेब्रुवारी २००९

■ **मुद्रक व अक्षरजुळणी**

दिशा ऑफसेट, राष्ट्र सेवा दल बिल्डिंग,

दांडेकर पूल, पुणे-३०

■ **देणगी मुल्य**

शंभर रुपये मात्र

© सर्व हक्क लेखकाच्या स्वाधिन

# प्रस्तावना

महाराष्ट्रातील विशेषतः विदर्भातील आणि मराठवाडयातील काही भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे अनेकांना चिंता वाटली व वाटते. काही जाणकार कार्यकर्त्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आणि शेतमजुरांच्या जीवनाच्या आजच्या स्थितीचा अभ्यास करून त्यांचे आर्थिक शोषण कसे थांबविता येईल आणि त्यांना स्वाभिमानाने कसे जगता येईल याचे मार्ग सुचविले आहेत. माझे मित्र डॉ. द्वारकादास लोहिया आणि त्यांच्या पत्नी डॉ. शैला लोहिया यांनी कार्यकर्त्यांचा संच उभा करून मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे 'मानवलोक' ही संस्था स्थापन केली. या संस्थेने गेली २५ वर्षे जे विधायक कार्य केले त्यामुळे अनेक स्त्री-पुरुषांना रोजगार मिळाला. दारिद्र्यरेषेखालील कितीतरी कुटुंबे स्वाभिमानाने जगू लागली. हे कार्य करताना डॉ. द्वारकादास लोहिया यांनी ग्रामीण भागाचे जे सूक्ष्म निरीक्षण केले, तेथील समाजरचनेचा जो अभ्यास केला, त्यामधून ते ग्रामीण जनतेच्या जीवनाच्या विकासासाठी काय केले पाहिजे या संबंधी काही निष्कर्षाप्रत आलेले आहेत. 'गाव झिजत आहे' या पुस्तकात त्यांनी ग्रामीण जीवनाच्या सद्यःस्थितीवर प्रकाशझोत टाकला असून ते जीवन सुधारण्यासाठीठी, त्या जीवनाची पुनर्रचना करण्यासाठी शासनाने आणि समाजाने तसेच ग्रामस्थांनीही काय केले पाहिजे ते वास्तववादी दृष्टिकोनातून सुस्पष्टपणे मांडले आहे. म. गांधींच्या ग्रामस्वराज्य या कल्पनेत कालानुरूप कोणते बदल केले पाहिजेत, एकमेकांच्या जवळच्या काही गावांचा एक विकास गट करून तो बव्हंशाने स्वावलंबी होण्यासाठी शेती उत्पादनाची पद्धती, पाण्याचे समान वाटप, पर्यावरणाचे रक्षण आणि रोजगार निर्मिती या बाबतीत काय केले पाहिजे हे डॉ. द्वारकादास लोहिया यांनी या पुस्तकात अत्यंत सुगम शैलीमध्ये लिहिले आहे.

शासनाचे जे कर्मचारी ग्रामीण भागासाठी विविध कामे करण्याकरिता नेमलेले असतात. ते गावातच राहिले तर ग्रामस्थांची वेगवेगळी कामे विलंब न लागता कशी होतील हे सांगतांना डॉ. द्वारकादास लोहिया यांनी या कर्मचाऱ्यांना हवी असणारी घरे बांधल्यास त्यांना गावात राहणे सक्तीचे करता येईल हे दाखवून दिले आहे.

स्त्रियांच्या बचत गटांचे स्वागत करताना, या गटांमधून गावासाठी पतसंस्था निघाली पाहिजे. त्या पतसंस्थेमधून शेतकऱ्यांना, ग्रामस्थांना आवश्यक तेव्हा कर्ज मिळाले पाहिजेत आणि स्त्रियांना छोटे उद्योग सुरू करण्यासाठी योग्य ते भांडवल मिळाले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. द्वारकादास लोहिया यांनी केले आहे. गावचा पैसा गावातच राहिला पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन यामागे आहे.

आज शेतकरी केवळ कच्चा माल-धन्य, कापूस इ. निर्माण करतो. पूर्वी गावात तेली शेंगदाणा व करडई यांच्यापासून तेल काढीत असे. कुंभार गावाला लागणारी गाडगी, मडकी तयार करीत असे. शेतकऱ्यांची अवजारे दुरुस्त करण्याचे काम लोहार करीत असे. बांबूपासून बुरूड टोपल्या तयार करीत असे. कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याचे काम गावातच झाले पाहिजे असे डॉ. लोहिया यांनी आग्रहपूर्वक सांगितले आहे. आज छोट्या कामांसाठीही शेतकरी शहरात जातो हे योग्य नाही अशी त्यांची भूमिका आहे.

शेतकरी जे धान्य तसेच जो भाजीपाला पिकवितो, किंवा जी फळफळावळ निर्माण करतो त्याची किंमत बाजारात दलाल, अडते ठरवितात आणि शेतकऱ्याला अनेकदा उत्पादन खर्चाइतकाही पैसा त्याच्या उत्पादनाच्या विक्रीतून मिळत नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी या परिस्थितीत बदल घडवून न आणल्यामुळे शेतकरी लुटला जातो हे डॉ. लोहिया यांनी ठसठशीतपणे सांगितले आहे. शेती हा व्यवसाय, उद्योग आहे हे सत्य लक्षात ठेवून शेतकऱ्याला त्याच्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार असला पाहिजे हे सांगतांना डॉ. द्वारकादास लोहिया यांनी उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव शेतमालाला बाजारात मिळत असल्यामुळेच शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, हे सडेतोडपणे मांडले आहे.

समाजात एकत्र कुटुंब पद्धती असली पाहिजे आणि गावामध्ये ग्रामस्थांनी शेजारधर्म पाळला पाहिजे, तसेच जल, जंगल, जमीन यांच्यावर समस्त गावकऱ्यांचीच मालकी असली पाहिजे अशी भूमिका डॉ. द्वारकादास लोहिया यांनी

मांडली आहे. राजकीय सत्ता आणि अर्थसत्ता यांचे विकेंद्रीकरण करून ग्रामपंचायती आणि पंचायत समित्या सक्षम कशा बनविता येतील हे या पुस्तकात डॉ. द्वारकादास लोहिया यांनी स्पष्टपणे मांडले आहे. ग्रामीण शिक्षण व्यवस्थेबद्दलचे त्यांचे विचार मला फार उद्‌बोधक वाटले. फक्त अत्युच्च शिक्षणाच्या सुविधा शहरात असल्या पाहिजेत बाकी सर्व तऱ्हेचेशिक्षण मुलामुलींना त्यांच्या गावातच किंवा फारतर पंचक्रोशीतच मिळाले पाहिजे. या शिक्षणामधून आजच्या समाजव्यवस्थेत जी कौशल्ये आवश्यक आहेत ती त्यांना आत्मसात करता आली पाहिजेत. गावातील पाण्याचे पंप, शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटारी, गोबरगॅस प्लँटस् दुरुस्त करण्याचे शिक्षण गावातील काही मुलामुलींना मिळाले पाहिजे. त्यासाठी शहरातील कामगाराकडे शेतकऱ्यांना जावे लागता कामा नये. ही कौशल्य शिकविली तर गावातील तरुणांना व तरुणींना गावातच रोजगार मिळू शकेल.

आज तंत्र विज्ञान क्षेत्रामध्ये जी प्रगती झाली आहे, माहिती तंत्रज्ञानामुळे एकूण समाजव्यवस्थेत जे बदल झाले आहे त्यांचे चिकित्सक मूल्यमापन करून डॉ. द्वारकादास लोहिया यांनी म. गांधीजींच्या विचारांच्या आधारेच आपल्याला ग्रामीण जीवनाची पुनर्रचना करावी लागेल असे प्रतिपादन केले आहे.

आज 'गाव झिजत आहे' आणि ते अधिक वेगाने झिजत जाऊन श्रमजीवी ग्रामीण जनता विकासाच्या प्रक्रियेतून बाहेर फेकली जाईल असा इशारा या पुस्तकाव्दारे डॉ. द्वारकादास लोहिया यांनी दिला आहे. हे उद्‌बोधक पुस्तक जे कार्यकर्त्यांना मार्गदर्शक होईल. असे पुस्तक लिहिल्याबद्दल मी डॉ. द्वारकादास लोहिया यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

**ग. प्र. प्रधान**
महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
हडपसर, पुणे.
दिनांकः १८ जून २००७

# मनोगत

'गाव झिजत आहे' या मथळ्याखाली दैनिक सुराज्य, बीड आणि दैनिक लोकमत या वृत्तपत्रात लिहिलेल्या वीस लेखांचा हा संग्रह आहे.

मी खेड्यात जन्मलो आणि आजही खेड्यांच्या संपर्कात आहे. माझ्या लहानपणी बघितलेलं खेडं आणि आजच खेडं, लहानपणी बघितलेली अंबाजोगाई, परळी आणि लातूर ही शहरं आणि आजचा त्यांचा विस्तार या सगळ्यांचा विचार करताना शहरांची वाढ ही खेड्याच्या श्रमावर झाल्याचं जाणवतं. यासंबंधी गावात राहणाऱ्या जाणकारांशी मी बोलत आलो. मानवलोकच्या कृषक पंचायत या संघटनेतील छोट्या शेतकऱ्यांशी चर्चा केली आणि त्यातूनच गावासंबंधी जे जाणवलं ते लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे. शाळा-कॉलेजमध्ये असतानाच राष्ट्र सेवा दल शिबिरात सहभागी होण्याचा योग आला होता. या शिबिरात म. गांधी आणि त्यांच्या विचारांची ओळख आचार्य शंकरराव जावडेकर, आचार्य शं. ज. भागवत आदींनी करून दिली होती. म. गांधींचे सुराज्य हे पुस्तक वाचण्यात आलं होतं. विनोबांनी लिहिलेलं ग्रामस्वराज्यावरच पुस्तकही वाचलं. त्या पुस्तकातील विचारासंबंधीची

श्री. वसंत पळशीकर यांनी केलेली चिकित्साही वाचण्यात आली. हे वाचन गाव झिजत आहे या माझ्या लेखमालेसाठी उपयोगी पडले आणि त्यातूनच हे पुस्तक लिहिले गेले.

अर्थात मी तत्त्वचिंतक नाही किंवा लेखकही नाही. त्यामुळे हे पुस्तक ग्रामविकासावरील चिंतन आहे असं म्हणण्याचं धाडस मी करणार नाही. यात लिहिलेले काही मुद्दे आज जरी काहींना क्षुल्लक किंवा चुकीचे वाटले तरी, बदलत्या परिस्थितीत त्यांचा विचारच नव्हे तर आचार करणेही गरजेचे ठरणार आहे. ग्रामीण वसाहत ही

भारतीय समूह जीवनातील परंपरेने जगण्याची रीत आहे. या ग्रामव्यवस्थेला तडा जाता कामा नये असे ज्यांना वाटते त्यांनी आजच्या ग्रामव्यवस्थेच्या होणाऱ्या झिजेचा अभ्यास केला पाहिजे. झीज टाळली पाहिजे तरच ग्रामव्यवस्था टिकून राहील. भारताच्या आदी-अनादी संस्कृतीची खूण म्हणून ग्रामव्यवस्था स्थिर झाली. परिस्थितीप्रमाणे या व्यवस्थेमध्ये काही बदल करणे गरजेचे असले तरी ती व्यवस्था नष्ट होणार नाही अशी परिस्थिती निर्माण करायला हवी.

भारतीय खेडी आणि खेड्यातील शेती उद्योग ही भारतीयांना जिवंत ठेवणारा आर्थिक स्रोत आहे. परंतु गेल्या काही दशकात या कृषी उद्योगाकडे पाठ फिरवून अनेकांनी शहरांची वाट धरली आहे. शहरात छोटी-मोठी कामे मिळतात आणि कसे तरी जगता येते अशी अनेकांची धारणा आहे. शेतीवरील मनुष्यबळाचा बोजा कमी केला पाहिजे, हे खरे असले तरी यासाठी शहराकडे धाव घेणे हा यावर उपाय नाही. छोटे कुटीर उद्योग, ग्रामोद्योग खेड्यातही निर्माण करता येतील अशी शासनाची इच्छा पाहिजे आणि उद्योगपतींचा निर्धार पाहिजे. असे झाले तर झपाट्याने वाढणारे शहरीकरण आणि त्यातील दुर्दैवी बकालपणा थांबेल.

शहरीकरणामुळे माणुसकीचा ऱ्हास होत चालला आहे. भारतीय ग्रामसंस्कृती माणुसकीची शिकवण देणारी संस्कृती आहे अन् ते भारताचे वैभव आहे. हे वैभव टिकावे असे महात्मा गांधी, विनोबांना वाटत होते. शरीरश्रमाला महत्त्व देणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांनाही असेच वाटते. म्हणूनच गावाच्या झिजेसंबंधी आणि ही झीज थांबविण्यासाठी काही उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न या छोटेखानी पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ. द्वारकादास लोहिया**

३२, किनारा,
विद्याकुंज हाउसिंग सोसायटी
अंबाजोगाई, जि. बीड

दिनांक: ०७ सप्टेंबर २००७

# प्रकाशकीय

गाव झिजत आहे पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध करताना आम्हांला आनंद आहे. दै. लोकमत वृत्तपत्राने गाव झिजत आहे संदर्भातील वीस लेख प्रसिद्ध केले होते. त्या अनुषंगाने गेली सहा महिने मी व माझी पत्नी सौ. छाया उभयतांनी या लेखांचा अभ्यास केला व प्रकर्षाने जाणवले की, खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास करावयाचा असेल तर गावांची प्रथम झीज थांबली पाहिजे. यावर सर्वांनी चिंतन करणे गरजेचे आहे. असे आम्हांला प्रामाणिकपणे वाटते. म्हणून डॉ. लोहिया लिखित गाव झिजत आहे हे पुस्तक प्रकाशित करण्याचा विचार मनात आला.

ग्रामीण विकासासाठी अहोरात्र धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांनां मग ते शासकीय असोत किंवा सेवाभावी संस्थेतले या सर्वांना ही पुस्तिका उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

**श्री. सतिश काकडे**

# अनुक्रमाणिका


१. गावातला नोकर गावात ........................ १
२. बचत गटांची गावबँक ........................ ५
३. महागाई निर्देशांक आणि उत्पन्न वाढ ........................ ११
४. कच्चा माल आणि प्रक्रिया........................ १५
५. उत्पादनाचे मूल्य ठरविण्याचा अधिकार ........................ १८
६. पंचक्रोशीतच शिक्षणाच्या सोयींची उपलब्धता ........................ २३
७. गुळाचे गुऱ्हाळ तसे साखरेचे साखराळ ........................ २७
८. गावकुसातच उद्योगांची निर्मिती........................ ३१
९. गावकुसातील संसाधनांची चोरी ........................ ३५
१०. ग्रामराज्य लोकशाहीचा आधार........................ ३९
११. परस्परावलंबी गाव–स्वावलंबी गाव ........................ ४३
१२. ग्रामपंचायत सदस्यांसाठी प्रशिक्षण बंधनकारक ........................ ४७
१३. एक कुटुंब–एक उत्पन्नाचे साधन........................ ५३
१४. बोअरचे पाणी पिण्यासाठी–पावसाचे पाणी शेतीसाठी........................ ५७
१५. शेतीच्या उत्पादन वाढीसाठी ........................ ६३
१६. गावचा धर्म–शेजारधर्म........................ ६७
१७. एकत्र कुटुंब–सुखी कुटुंब ........................ ७३
१८. नारी के सहयोग बिना हर गाव सुना है........................ ७७
१९. यंत्रे आली–जनावरे कमी झाली ........................ ८३
२०. तर आत्महत्या थांबतील ........................ ८७
२१. मराठवाड्याच्या विकासासाठी 'साझ' हवा ........................ ९३



# १. गावातला नोकर गावात

गेल्या आठवड्यात मोरफळीच्या सरपंचांनी गावात बोलावले होते. त्या दिवशी सकाळी त्यांनी ग्रामसभा आयोजित केली होती. ग्रामसभेत गावचा सरकारी नोकर गावातच सहकुटुंब राहिला तर गावाला काय लाभ होईल, यावर गावकऱ्यांसमोर माझी मते मांडावीत व त्यांच्याशी चर्चा करावी, अशी त्यांची माझ्याकडून अपेक्षा होती.

महाराष्ट्रात ४२५०० पेक्षा अधिक गावे आहेत. बरीच गावे स्वतंत्र ग्रामपंचायती आहेत. अशा ग्रामपंचायतींची संख्या २७६१४ एवढी आहे. जिल्ह्यात शांतता, सुव्यवस्था नांदावी आणि शासनाच्या विविध खात्यांचा कारभार नीट चालावा म्हणून जिल्ह्याच्या ठिकाणी अनेक विभाग कार्यरत आहेत. त्या त्या खात्याचा अधिकारी जिल्हाभर आपल्या खात्याचे काम कसे पोहोचेल याची दक्षता घेत असतो. महसूल खात्याचा प्रमुख जिल्हाधिकारी हा जिल्ह्याच्या ठिकाणी राहतो. तहसीलदार तालुक्याच्या ठिकाणी राहतो. तर या खात्याचा शेवटचा माणूस म्हणजे तलाठी हा नेमून दिलेल्या ग्रामपंचायतीच्या गावातच राहावा अशी या खात्याची व्यवस्था आहे. बहुतेक खात्यांची व्यवस्था अशी आहे की, त्या खात्याचा शेवटचा कर्मचारी गावपातळीपर्यंत पोहोचलेला असावा; म्हणूनच जिल्ह्याच्या व्यवस्थापनात आणि विविध विकास योजना गावापर्यंत पोचविण्यात गावपातळीवरील कर्मचाऱ्याचा मोठा वाटा असतो.

ग्रामपंचायतीचा विचार केला तर असे लक्षात येईल की, शाळेचे शिक्षक, अंगणवाडीची शिक्षिका, ग्रामसेवक, तलाठी, दवाखाना असेल तर डॉक्टर्स, परिचारिका, दाई किंवा V.H.W, लाईटमन, कृषी पर्यवेक्षक इ. इ. कर्मचारी नेमून दिलेल्या गावांत कार्यरत असतात.

अशी ही कर्मचाऱ्यांच्या कार्याची विकेंद्रित व्यवस्था असल्यामुळे केंद्र वा महाराष्ट्र शासनाच्या योजनांचा फायदा असल्यामुळे गावांचा आणि दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबांचा विकास साधला जातो. वरवर पाहता ही व्यवस्था अतिशय चांगली वाटते. या व्यवस्थेमुळे स्वातंत्र्यानंतर गावकऱ्यांना शासकीय धोरणांचा आणि विकास कामांचा फायदा होत आला आहे. शिवाय गावविकासाच्या इतरही अनेक योजना गावात राबवल्या जात आहेत.

विकासाच्या नावाखाली, गावाला मूलभूत गरजा पुरविण्यासाठी, स्वातंत्र्योत्तर काळात लाखो रुपये दरवर्षी खर्च केले गेले. तरीही गावाचा अपेक्षित असा विकास होत नाही. उलटपक्षी दिवसेंदिवस गावांची झीज वाढतच आहे. असे गावात गेल्यानंतर लक्षात येते. एवढा खर्च करूनही असे का व्हावे, याचा विचार मात्र लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, समाजसेवक कोणीही करीत नाही ही चिंतेची बाब आहे.

गावांची झीज वाढते आहे, यामागे अनेक कारणे आहेत. या कारणांपैकी काही कारणांचा अभ्यास मानवलोकने केला. तेव्हा असे लक्षात आले की गावासाठी नेमलेला सरकारी कर्मचारी गावात राहत नाही हे या झीज होण्यामागे, एक प्रमुख कारण आहे.

२००१ साली मानवलोकने Mobilizing people`s Initiatives असा एक कार्यक्रम २० गावांसाठी राबविला. हा कार्यक्रम राबविण्यापूर्वी त्या वीस गावासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या, त्यांना मिळणाऱ्या भत्त्यासहित वेतनाची माहिती मिळविली. तेव्हा असे लक्षात आले की, त्या गावांसाठी शासनाने ४२७ कर्मचारी नेमलेले आहेत. हे सर्व कर्मचारी शासकीय खात्याचे आहेत. या सर्व कर्मचाऱ्याचे मासिक वेतन २१,६८,२३६/- इतके होते. यांपैकी १६४ म्हणजे ३८% कर्मचारी गावात सहकुटुंब राहत होते. अर्थात ते त्याच गावचे होते. त्यांत ग्रामपंचायतीचा चपराशी, अंगणवाडी शिक्षिका, दाई असे कनिष्ठ पदाचे कर्मचारी होते. त्यात मिळणारा पगारही तुलनात्मक दृष्टीने कमीच आहे. वीस गावांतील अशा ३८% कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन रुपये ४,१२,६५०/- इतके होते. म्हणजे गावासाठी नेमलेल्या एकूण कर्मचाऱ्यांच्या १९.३% इतकेच त्यांचे उत्पन्न होते. त्यांच्या पगाराचा, त्यांच्या उपजीविकेसाठी त्याच गावात खर्च होत होता. उर्वरित ६२ % कर्मचारी जवळच्या शहरात किंवा तालुक्याच्या ठिकाणी राहत होते. त्यांना मिळणाऱ्या रुपये १७,५५,५८६/- म्हणजेच ८०.९७% वेतनाचा खर्च ते राहत असलेल्या शहरातच होत होता. वरील अभ्यासावरून असे लक्षात आले की वीस गावांच्या नावे

कर्मचाऱ्यांना दर महिन्याला रुपये २१,०८,४११/- इतका त्यांचा एका गावासाठी पगार होतो. जर हे कर्मचारी गावातच राहिले असते तर दर महिन्याला पगाराच्या रूपाने रुपये १,०८,४११/- इतका पैसा एका गावात आला असता. त्यांचा पगारही गावातच खर्च झाला असता. त्यामुळे घरमालक, गांवाकडील दुकानदार, भाजीपाला विकणारे टपरीवाले, धोबी, न्हावी इ.इ.च्या उत्पन्नात भर पडली असती. परंतु हे कर्मचारी शहरात राहत असल्यामुळे त्यांचा खर्चही शहरातच होतो. त्यामुळे शहराचे उत्पन्न वाढते. शहराच्या आर्थिक उत्पन्नात भर पडते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे हे सर्व कर्मचारी गावातच राहिले तर गांवातील सर्वांशीच त्यांचा संपर्क वाढेल. शेतकऱ्यांना गांवातच त्यांच्या मालकीचे सात-बाराचे उतारे मिळू शकतील. चौकशी केली तेव्हा असे लक्षात आले की, सात-बाराचा उतारा मिळविण्यासाठी शेतकऱ्याला तलाठ्याकडे दोन-तीन फेऱ्या माराव्या लागतात. यामुळे तेवढे दिवस शेतकऱ्यांचे वाया जातात. त्यांची मजुरी बुडते. तलाठ्याकडे जाण्यायेण्याचा खर्च होतो तो वेगळा! गावात शिक्षक राहिले तर त्यांची मुलेही त्याच शाळेत शिकतील. शिक्षक नियमितपणे वेळेवर शाळेत उपस्थित राहतील आणि शिकवतीलही. इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही असेच घडेल. यामुळे गावात निर्माण होणाऱ्या अडचणी त्वरित सोडवल्या जातील. विकासाच्या सर्वच योजना गावात मार्गी लागतील. पगाराच्या रूपाने गावात तर पैसा येईलच. शिवाय कर्मचाऱ्यांच्या शोधासाठी जाणारा शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाचेल. तो गावातच राहील. दर महिन्याला गावाचे हजारो रुपये वाचतील. म्हणून गावासाठी नेमलेला कर्मचारी गावातच राहिला पाहिजे, असे आग्रहपूर्वक मोरफळीच्या ग्रामसभेत मी सांगितले आणि लोकांनीही टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले.

मानवलोकने केलेल्या सर्वेक्षणात गावात न राहण्याबद्दल कर्मचाऱ्यांनी एक अडचण सांगितली. ती म्हणजे त्यांना राहायला भाड्यानेदेखील चांगली घरे मिळत नाहीत ही त्यांची अडचण आम्हाला रास्त वाटते. ही अडचण दूर झाली तर अधिक कर्मचारी निश्चित गावात राहतील असे काही शिक्षकांनी सांगितले होते. पण विपन्नावस्था झाल्यामुळे चांगली घरे बांधून ती कर्मचाऱ्याला भाड्याने देण्याची ऐपत फारशी कोणाजवळ नाही. यासाठी दुसरी उपाययोजना करावी लागेल.

गेल्या काही वर्षांपासून शासनाने लोकप्रतिनिधी म्हणजे आमदार-खासदार यांच्या मतदारसंघात विकासकामासाठी काही निधी राखून ठेवला आहे. या निधीतूनच

शेकडो गावांतून समाजमंदिर, शाळेच्या खोल्या, रस्ते, पूल, व्यायामशाळा अशा इमारती गावात उभ्या राहिल्या आहेत. म्हणून यापुढच्या काळात आमदार-खासदार फंडातून एखाद्या गावी गावकर्मचाऱ्यांसाठी आठ-दहा घरांचे संकुल उभे केले आणि या संकुलाचा वापर कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी केला, तर कर्मचाऱ्यांच्या निवासाची अडचण सहज दूर होऊ शकते.

बीड जिल्ह्याचे विद्यमान खासदार श्री. जयसिंगराव गायकवाड पाटील यांचेकडे आम्ही ही कल्पना मांडली. त्यांनी या कल्पनेचे स्वागत केले आणि प्रयोग म्हणून एखाद्या गावात आपल्या खासदार फंडातून अशा प्रकारचे संकुल उभारण्याचे तत्त्वतः मान्यही केले. मोरफळी या गावाने घरा-घरातून पट्टी जमवून ग्रामपंचायतीच्या नावे ४०-५० गुंठे जमीन घेण्याचे ठरविले आहे. या जमिनीवर जिल्ह्याच्या खासदार फंडातून गाव कर्मचाऱ्यांसाठी निवास संकुल तयार झाले तर गावासाठी नेमलेला कर्मचारीवर्ग गावात राहील. त्यांच्या पगाराचा पैसाही गावातच खर्च होईल. संकुलाचे भाडे ग्रामपंचायतीला मिळेल. ते ग्रामपंचायतीला उत्पन्नाचे कायमस्वरूपी साधन राहील. कर्मचाऱ्यांना गावात राहावे लागल्यामुळे त्यांचा गावकऱ्यांशी सतत संपर्क राहील. कामातील दिरंगाई टळेल. भ्रष्टाचाराला बराच आळा बसेल. गावांची आर्थिक आणि सामाजिक धूप कमी होण्यास मदत होईल.

❑

# २. बचत गटांची गावबँक

सध्या महाराष्ट्रात बचत गटांची चळवळ जोरात सुरू आहे. स्वयंसेवी संस्था, गावपातळीवरील कार्यकर्ते या कामात खूपच पुढाकार घेत आहेत. माविम, नाबार्ड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यासारख्या संस्थांनीही त्यात आपला आर्थिक सहभाग नोंदविला आहे. अवर्षणप्रवण क्षेत्रविकास कार्यक्रम आणि हरियालीच्या वतीने सुरू असलेल्या पाणलोट क्षेत्रविकासाच्या गावांतून बचत गट तयार करण्यावर भर दिला जात आहे.

बचत गटाची कल्पना तशी नवीन नाही. बांगलादेशात यापूर्वी असे काही प्रयोग झाले आहेत. छोट्या-मोठ्या शहरांतून "भीसी" चा प्रकार चालूच आहे. त्याचाही तोंडवळा थोडा बचत गटासारखा आहे. फक्त त्याची देवाण-घेवाण त्वरित होते. गरज असलेल्या सभासदाला सर्व सभासद आपली रक्कम देतात आणि त्याची गरज पूर्ण करतात. जमलेल्या रकमेवर थोडेफार अधिक पैसे लावून गरजवंत सभासद ती रक्कम घेतो आणि मूळ रकमेवरील जादा मिळालेली रक्कम सर्वजण वाटून घेतात. महाराष्ट्रातील राजगुरूनगर येथील डॉ. सुधा कोठारींच्या चैतन्य संस्थेने या बाबतीत पुढाकार घेतला आणि बचत गटाला एका चांगल्या संघटनेचे रूप दिले. आता तर केंद्रशासनाच्या S.G.S.Y. या योजनेअंतर्गत बचत गटातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाला वैयक्तिक व सामुदायिक उद्योग करण्यासाठी लाखो रुपयांचे कर्ज देण्याची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे बचत गटाचा परिचय गावागावात आणि शहरातही वाढला आहे. बचत गट कसा करावा? कोणी करावा? बचत किती करावी ? हा स्वतंत्र विषय आहे. बचत गटाचे आर्थिक व्यवस्थापन हा त्या विषयाचा महत्त्वाचा भाग आहे. बचत गटामुळे

मिळणारे कर्ज हा बचत गटात सामील होणाऱ्यांसाठी आकर्षणाचा विषय झाला आहे. पण बचत गटाची खरी वाढ होण्यामागे मुख्य कारण बचत गटाला मिळणारी सब्‌सिडी, बँकेच्या सवलती मिळत असल्यामुळे बचत गट स्थापन करण्यास वेळ लागणार नाही. काही दिवसांच्या आतच बचत गट तयार होतो. आणि त्याला सब्‌सिडीचा ध्यास लागतो. बचत गटाचे जंगल फोफावण्यासाठी हे सर्वांत मोठे कारण आहे. यामुळेच महाराष्ट्रात तरी बचत गटांची संख्या लाखाच्या वर गेली आहे. वेगाने होणारी बचत गटांची वाढ हीच बचत गटांच्या भविष्याबद्दल शंका निर्माण करणारी आहे.

बचत गटाचा मूळ उद्‌देश दरिद्रीनारायणांचा एकत्र करून 'दस की लकडी , एक का बोझ' हलका करण्याचा आहे. शिवाय सावकारमुक्ती हाही त्याचा मुख्य उद्‌देश आहेच. परंतु सब्‌सिडीच्या आकर्षणापुढे भान हरवून गेल्याचे जाणवते. दर महिन्याच्या बैठका, कर्जाची रक्कम गोळा करणे, ती बँकेत भरणे, गटातील सभासदांना कमीत कमी व्याजाने कर्ज देणे इत्यादी गोष्टींवर अधिक भर दिला जातो. महिला बचत गट, संमिश्र बचत गट, दारिद्र्य रेषेखालील बचत गट अशा अनेक प्रकारचे बचत गट आहेत. मात्र हे बचत गट करताना आणि त्यांचा दैनंदिन आर्थिक व्यवहार केवळ गटातल्या सभासदांना सब्‌सिडी किंवा आर्थिक कर्ज देण्यापुरताच बघितला जातो. गरीब कुटुंबांनी एकत्र यावे, सामुदायिक धनसंचय करावा आणि त्यातूनच एकमेकांना गरजेप्रमाणे, सहकार्य करावे एवढेच बचत गटाचे उद्दिष्ट नाही.

विशेषतः महिलांचे बचत गट करण्यामागे दुसराही महत्त्वाचा हेतू आहे. तो म्हणजे महिला सक्षमीकरणाचा! बचत गटामुळे चार चौघींनी एकत्र यावे. कोणाच्या तरी घरी मीटिंग घ्यावी. मीटिंगमध्ये आर्थिक व्यवहाराबरोबरच महिलांच्या सामाजिक प्रश्नांवर चर्चा व्हावी असे गृहीत आहे, पण महिला बचत गटांमधून असे काही घडत असल्याचे जाणवत नाही. पाच-दहा महिला बचत गटांनी याबाबत काही भरीव विचार केला असेलही. परंतु बहुतेक गटांतून कर्ज वाटप, सब्‌सिडी आणि काही काळापुरती रोजगार उपलब्धी यापुढे हे गट सरकलेले नाहीत. सामुदायिक उद्योग करणाऱ्या गटांची अवस्थाही फारशी आशादायक करणारी नाही.

महिला बचत गटांमध्ये महिला सक्षमीकरणाच्या प्रश्नावर जाणीव जागृतीच्या कामास प्राधान्य दिले पाहिजे. समाजात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची, कुटुंबात होणाऱ्या पिळवणुकीची किंवा छळणुकीची गटांतून चर्चा होणे गरजेचे आहे. शासनाच्या ग्रामीण विकासाच्या विविध योजनांची माहिती बचत गटातून दिली गेली पाहिजे. योजना मिळविण्यासाठीच्या सर्व पद्धतींची माहिती अशा मीटिंग मध्ये मांडली



पाहिजे. ग्रामपंचायतीमधले आर्थिक – भौतिक व्यवहारही बचत गटामध्ये चर्चिले गेले पाहिजेत. दबाव गटाचे स्वरूप या गटांना आले पाहिजे. मात्र आज तरी या पातळीपर्यंत कुठलाही बचत गट गेल्याचे दिसत नाही.

बचत गटाचा जसा गावाच्या अर्थकारणावर परिणाम होऊ शकतो तसा गावच्या समाजकारणावरही परिणाम झाला पाहिजे. (त्यासाठी बचत गटाच्या उद्देशात भर घालण्याची गरज आहे.) मात्र यासाठी बचत गटाचे मर्यादित उद्देश विस्तारण्याची गरज आहे. गावात तयार झालेल्या सर्वच बचत गटांना एकत्र करून त्याला गावपतपेढीचे स्वरूप देणे फायद्याचे ठरेल. बचत गटांची पतपेढी करताना अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही. गावचे राजकारण, जातकरण, छोट्या बचतीचा गट, मोठ्या बचतीचा गट या सर्वांना एका उपक्रमाखाली आणणे कठीण आहे असे प्रथमदर्शनी कोणासही वाटेल. पण प्रत्येक घरातून किमान एक ते दोन व्यक्ती बचत गटाच्या सभासद झाल्या, तर सर्व गावच अप्रत्यक्षपणे पतपेढीच्या उपक्रमांत सहभागी होऊ शकेल. काही दिवस बचत गटांमार्फत बचत करावी. वर्ष सहा महिने बचत करीत रहावे. त्यांना परतफेडीची सवय लावावी. पतपेढीसंबंधी पूर्वतयारी म्हणून सर्व बचत गटांच्या चार-पाच बैठका घेऊन वातावरणनिर्मिती केली आणि मग पतपेढी नोंदणी केली तर असा उपक्रम यशस्वी ठरतो.

अशा प्रकारच्या कुठल्याही आर्थिक उपक्रमांत पारदर्शकता असावी लागते. पारदर्शी व्यवहारासंबंधी सर्वांना कल्पना दिली, पतपेढीतून मिळणाऱ्या नफ्यातोट्याची आणि गावाच्या आर्थिक सबलीकरणाची स्पष्ट जाणीव गावकऱ्यांत निर्माण केली तर अशा उपक्रमांस गावकऱ्यांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळेल. दुर्दैवाने अनेक बचत गटांत पारदर्शकता नसल्यामुळे हे गटही बंद पडले आहेत. हा धोका लक्षात घेऊन पतपेढीची पूर्वतयारी करावी लागेल. असे केले तर त्या पतपेढीमध्ये पहिल्या एक-दोन वर्षांतच लाखो रुपयांची उलाढाल सुरू होईल. छोट्या-मोठ्या कारणासाठी शासकीय, सहकारी बँकेत कर्ज मागण्यासाठी ग्रामस्थांना धावपळ करण्याची गरज लागणार नाही.

जेव्हा गावातला एखादा माणूस बँकेतून कर्ज घेतो तेव्हा त्या गावाची एका अर्थाने धूपच होत असते. गावातील मंडळींनी बँकेत पैसा ठेवला तर पैशावर फार कमी व्याज मिळते. मात्र त्यांच्याच पैशावर बँकर्स दुसऱ्याला कर्ज देऊन भरपूर व्याज मिळवितात. ठेवीदारांच्या पैशावरच बँका मोठ्या झाल्या आहेत. प्रत्येक गावातून काही ना काही श्रीमंत लोकांनी बँकेत पैसे ठेवले आहेत. गावाचीच पतपेढी असेल आणि कर्ज घेणाराच पतपेढीचा सभासद असेल तर त्यालाही पतपेढीच्या नफ्यात फायदा मिळतो.

शिवाय गावचा पैसा गावातच राहतो. सभासदांचा पैसा पतपेढीत आणि पतपेढीचा नफा सभासदाच्या खिशात! म्हणजे घी कहाँ गया खिचडीमें, खिचडी कहाँ गयी? घी में। असे गावाचे आर्थिक स्वरूप राहील. गावाबाहेर जाणारा पैसा, व्याज गावतच राहील. गावांची होणारी आर्थिक धूप काही अंशाने थांबेल. स्वावलंबी गावाची स्वप्नं पाहणाऱ्यांनी बचत गटाला काही कालावधीनंतर गावपेढीचे स्वरूप दिले तर हे शक्य आहे.

बचत गटांतून तयार झालेल्या गावपतपेढीला आणखीनही पुढे नेता येईल. विविध योजना राबविण्यासाठी ग्रामपंचायतीला येणारा निधी कुठल्यातरी बँकेत ठेवावा लागतो. ज्या गावात अशी पतपेढी असेल त्या पतपेढीद्वारेच शासनाने ग्रामविकासाच्या योजनेसाठी लागणारा निधी ग्रामपंचायतीला दिला तर या पतपेढीला ग्रामीण बँकेचे स्वरूप सहज प्राप्त होईल. यातूनच गाव तेथे रस्ता या योजनेप्रमाणे गाव तेथे–गावची बँक ही कल्पना साकारेल. सध्या रिझर्व बँकेने, बँकांवर अनेक निर्बंध घातले आहेत. त्याची गरज असली तरी ७३ व्या घटना दुरुस्तीचा उद्‌देश सफल करण्यासाठी गावपतपेढी किंवा गावबॅंकांना काही सूट मिळाली तर गाव स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करू शकेल. गावातून अनेक कारणांसाठी गावाबाहेर जाणारा पैसा गावातच थांबेल. खऱ्या अर्थाने गावाला आर्थिक स्वावलंबनाचे स्वरूप प्राप्त होईल.

बचत गटांच्या माध्यमातून सुरू झालेली गावबँक हळूहळू उत्तम प्रकारचे आर्थिक व्यवहार करू शकते. शासनाने ठरवले तर या बँकेला भरघोस सहकार्य देता येते. त्या गावातील शिक्षक, तलाठी, अंगणवाडी शिक्षिका किंवा इतर शासकीय सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार गावबँकेमध्ये केला गेला तर गावबँक लवकर स्थिर होईल. शिवाय या सर्व कर्मचाऱ्यांवर गावाचा दबदबा राहील. जसे कर्मचाऱ्यांच्या पगाराचे तसेच गावपातळीवर राबविल्या जाणाऱ्या शासकीय योजनांचेही करावे लागेल. गावांत रोजगार हमीचे काम असो किंवा एसजीआरवाय योजनेखाली सडकेचे या तळ्याचे काम असो वा सर्व योजनांसाठी वापरला जाणारा निधी गावबँकेच्या द्वारेच वाटला गेला तर व्यवहारात पारदर्शकता येईल. त्याशिवाय मजुरांना वेळेवर पगार मिळेल. हळूहळू गावातील सर्वांचे सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार या गावबँकेच्या वतीने सुरू होतील. अशी ही गावबॅंक योजना ७३ व्या घटनादुरुस्तीने गावाला दिलेले स्वातंत्र्य आणि स्वावलंबन सक्षम करण्यास मदत करेल.

❑



# ३. महागाई निर्देशांक आणि उत्पन्न वाढ

शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण तेलंगण, आंध्रप्रदेशमध्ये वाढत आहे. यात महाराष्ट्र मागे आहे अशातली परिस्थिती नाही. महाराष्ट्रात विशेषतः विदर्भात गेल्या दोन वर्षांत अनेक शेतकरी कुटुंबांतील कर्त्या माणसांनी आत्महत्या केल्याचे आपल्यां वाचनात आले आहे. या आत्महत्यांबद्दल स्वाभाविकच वर्तमान पत्रे, विरोधी पक्ष, सामाजिक कार्यकर्ते, समाज धुरंधर आदी सहानुभूती दाखवीत आहेत. शासन स्तरावरूनही लगोलग धावपळ होताना दिसते. मदतीचे चेकही त्वरित मृतांच्या कुटुंबियांना दिले जात असल्याचे लक्षात येते. मात्र अशा आत्महत्यांमागच्या कारणांची मीमांसा कोणी करताना दिसत नाही. शासनाने यावर काही ठोस उपाय-योजना केल्याचे कुठे वाचनात आले नाही. या आत्महत्ये मागचा नीट अभ्यास केला असता, शेतकऱ्याने घेतलेले कर्ज हे कारण ठळकपणे समोर येते. सावकाराकडून घेतलेले कर्ज परत करता येत नाही म्हणून बऱ्याच शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे.

काही ठिकाणी एखादा अल्पभूधारक बटाईने शेती करतो. कर्ज काढून बियाणे, खते घेतो. निसर्गाच्या अवकृपेमुळे त्याला मूळ मालकाला परत देण्याएवढे उत्पन्न शेतात न झाल्याने काहींनी आत्महत्या केल्या आहेत. कारणे काहीही असोत मात्र अशा आत्महत्यांवर ठोस उपाय शोधण्याची नितांत गरज आहे. राजकीय लोकांकडून असे उपाय शोधण्याची न दिसणारी इच्छा हे आणखी दुर्दैव आहे.

शेतकऱ्यांचे शेती उत्पादन वाढले की शेतकरी सुखी होईल असे उच्चरवाने सांगितले जात होते. उत्पादन वाढले की शेतकऱ्याच्या घरात आर्थिक सुबत्ता नांदेल. अनेक़ सुख सोयी तो घरात खेचून आणील. शेतकऱ्यांचे भले होईल असे प्रतिपादन अनेक राजकीय आणि शेतीक्षेत्रातील तज्ज्ञांनी केले होते. पण हा उपाय खरा नाही. हे

शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्यांवरून आता सिद्ध झाले आहे. १९५० च्या सुमारास देशाचे कृषी उत्पादन पन्नास दशलक्ष टन होते. ते सन २००० च्या सुमारास दोनशे दश लक्ष टनांवर पोहचले असे या क्षेत्रात काम करणाऱ्यांची माहिती आहे. एवढे उत्पादन वाढूनही शेतकरी सुखी झाला का? उत्तर नकारार्थीच मिळेल. एखाद्या शेतकऱ्याने गाठले असेल यशाचे शिखर. एखाद्याने कमावले असतील भरपूर पैसे. पण शेतकऱ्याचे उत्पादन वाढल्यामुळे शेतकरी चिंतामुक्त झाला असे काही पाहायला मिळत नाही. म्हणजे शेती उत्पादनवाढीतून शेतकऱ्याचा उत्कर्ष होतो असे म्हणणे चूक ठरले आहे. असं का व्हावे? याचा शोध कदाचित काही लोक घेत असतील. पण मला काही वर्षांपूर्वी अकोला ता. अंबाजोगाई या गावाच्या सरपंचाने जे सांगितले ते नमूद करावेसे वाटते.

मानवलोकच्या कामांसाठी दररोज खेड्यात भ्रमंती करावी लागत होती. गावाशी आणि शेतीशी आमचा संपर्क होता. शेतकऱ्यांबरोबर काम करण्याचा आमचा निर्धार असल्यामुळे खेड्यांशी संपर्क ठेवणे भागच होते. १९९१ -१९९२ च्या सुमाराला, एके दिवशी सकाळीच कृषक पंचायती बैठका घेण्यासाठी अकोला या गावी गेलो होतो. शेतकरी जमायला वेळ होता म्हणून शाळेत चक्कर मारली. आम्हाला पाहून गुरुजी खूष झाले. आलाच आहात तर मुलांना साने गुरुजींच्या गोड गोष्टी सांगा असा आग्रह त्यांनी धरला. एवढ्यात मुख्याध्यापक कार्यालयात दाखल झाले. त्यामुळे गोष्ट सांगणे बाजूला पडले व इतर बाबींवर चर्चा सुरू झाली. सरपंच सांगत होते की, हे गुरुजी फार चांगले आहेत. शाळेतच राहतात. हाताने स्वैपाक करून खातात. मुक्कामाला इथेच राहत असल्यामुळे आमची शाळा सुधारली. हे ऐकून मलाही बरे वाटले. पुढे ही चर्चा लांबली... मी गुरुजींना विचारले गुरुजी, तुम्ही कोणत्या वर्षी नोकरीला लागलात. ते म्हणाले १९६४–६५ चा सुमार असेल. त्यावेळेस मला पगार म्हणून रुपये १४० ते १५० मिळत होते. आता किती मिळतो? माझा प्रश्न. गुरूजींनी आकड्यांची जुळवाजुळव केली आणि म्हणाले, सगळा मिळून रुपये जवळपास आठ ते नऊ हजार मिळतात. पगाराचा आकडा ऐकून संरपचाला आश्चर्य वाटले. ते म्हणाले, गुरुजी तुमचं चांगल आहे बुवा! २०–२५ वर्षांत तुमच्या पगारात खूपच वाढ झाली. आम्हा शेतकऱ्यांचं नशीबच फुटकं बघा. तुम्हाला नोकरी लागली त्याच वर्षी आमच्याकडे हायब्रीड सुरू झालं. ६०/– रुपये क्विंटलचा भाव होता. यंदा वीस वर्षांनंतर ३००/– रुपयांच्या वर गेला आहे. आमचं सगळ असंच कासवाच्या गतीनं चाललंय. सरपंचाचं बोलणं मी ऐकत होतो. गुरुजी म्हणाले आमचा पगार महागाईच्या निर्देशांकावर आवलबूंन असतो. गेल्या वीस पंचवीस वर्षांत महागाईच इतकी वाढली की आमची पगारवाढ करणं सरकारला भागच होते.

महागाईचा निर्देशांक कसा काढतात. तो कशावर ठरतो याची विचारपूस मी अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या व महाविद्यालयात हा विषय शिकविणाऱ्या काही मित्रांकडे केली. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, महागाईचा निर्देशांक काढताना कापड, साखर, साबण किंवा टी.व्ही, रेडिओ इ. वस्तूंच्या किंमतीचा विचार केला जातो. ग्रामीण भागात उत्पन्न होणाऱ्या फार कमी वस्तू महागाई निर्देशांकाच्या बास्केटमध्ये आहेत.

ग्रामीण भागात कच्चा माल तयार होतो. गेल्या ५० वर्षांत परिस्थिती बदलली आहे. तेल, तूप, गूळ, अशा वस्तूंचे उत्पादन पूर्वी खेड्यात होत असे. तेही आता शहरातच होऊ लागले. शेतकरी जवळच्या शहरी बाजारपेठेत आपला कच्चा माल ज्वारी, गहू, तूर, मूग, कापूस, सोयाबीन करडई, सूर्यफूल इ.इ नेऊन विकतो. त्याच्या मोबदल्यात कापड, साखर, तेल व संसारोपयोगी इतर वस्तू विकत घेऊन येतो. शेतकरी जो माल बाजारात विकतो तो कच्च्या स्वरूपाचा आहे, आणि जो विकत घेतो तो पक्क्या स्वरूपाचा आहे. त्यामुळे या दोन्हीच्याही किमतीत खूप तफावत आहे. कमी भावात कच्चा माल विकणे आणि अधिक पैसा खर्च करून पक्का माल विकत घेणे हे आता त्याच्या अंगवळणी पडले आहे. पक्क्या मालाची निश्चित किंमत ठरलेली असते. तशी कच्च्या मालाची अवस्था नसते. कच्च्या मालाचा विचार महागाईचा निर्देशांक काढताना होत नाही. निर्देशांक काढताना ग्रामीण भागात तयार होणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती धरून काढला तर पगारवाढीचे आजचे स्वरूप बदलेल. पगारवाढीमुळे महागाई वाढते आणि या महागाईचा फटका कच्च्या मालाचे उत्पादन करणाऱ्या ७०% जनतेला बसतो. शेतीतील उत्पादन वाढूनही शेतकऱ्याच्या नशिबी कर्ज काढण्याची पाळी येते. म्हणून महागाईचा निर्देशांक काढण्याची पद्धत बदलली पाहिजे असे मला वाटते.

मी अर्थशास्त्राचा विद्यार्थी नसलो तरी कच्चा माल तयार करणारा आणि पक्का माल तयार करणारा यांच्या उत्पन्नातील तफावत मला दिसते आहे. ही तफावतदेखील शेतकऱ्याच्या आत्महत्येला कारणीभूत होत आहे. म्हणून शेतकऱ्याच्या उन्नतीसाठी आणि समृद्धीसाठी महागाईचा निर्देशांक काढण्याची पद्धत बदलावी लागेल. शेतकऱ्याची समृद्धी अनेक कारणांवर अवलंबून आहे. केवळ निर्देशांकामुळेच ती बदलेल असे जरी नसले तरी महागाईचा निर्देशांक कच्च्या मालाच्या किमती गृहीत धरून काढला गेला तर महागाईची गती मंदावेल आणि शेतकऱ्यांच्या बरोबर सामान्य माणसालाही कमी खर्चात आपला संसार सुखाचा करता येईल.

❑



# ४. कच्चा माल आणि प्रक्रिया

आपला देश सात लाख खेड्यांतून वसला आहे. स्वातंत्र्यानंतर वाढत्या लोकसंख्येमुळे वाड्यांची संख्या वाढत चालली आहे. खेड्यांमध्ये कासवाच्या गतीने सुधारणांचे वारे वाहत आहेत. त्यामुळे समाजजीवनात फरक झाल्यासारखा जाणवतो. परंतु ग्रामीण भागाच्या उत्पादनस्त्रोतात अंगभूत असा बदल झालेला दिसत नाही. ग्रामीण भागातील उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत शेती हाच आहे. आजही गावातील ७०% कुटुंबांचे जीवन शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक नाड्या शेतकऱ्यांच्या हातात आहेत असे म्हटले तर कोणाला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. गेल्या पाच दशकांत शेतीक्षेत्राने उत्पादनाच्या दृष्टिकोनातून भरघोस प्रगती केली आहे. असे असतानाही शेतकरी कर्जबाजारी आहे. याची कारणे शोधली तर अनेक गोष्टींचा उलगडा होऊ शकतो.

ग्रामीण भागात शेतीमध्ये होणारे उत्पादन हे कच्च्या स्वरूपाचे आहे. उत्पादनाचे हे कच्चे स्वरूप शेतकऱ्यांची आर्थिक पीछेहाट करीत आहे, असे दिसते. शेतकऱ्याने नवीन बियाणे वापरले, खते वापरली, कीटकनाशके वापरली आणि उत्पादन वाढविले. परंतु उत्पादनाचे कच्चे स्वरूप त्याने बदलावे यासाठी फारसे काही केले असे मला तरी वाटत नाही. म्हणूनच शेतीतील उत्पादन वाढूनदेखील त्याचे उत्पादन वाढले नाही. आजही त्याला दरिद्री अवस्थेतच जगावे लागत आहे.

शेतकरी कच्चा माल तयार करतो आणि दुसरा कोणीतरी त्या मालावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करतो. कच्चा माल म्हणजे ज्वारी, गहू, कापूस, तूर, हरभरा,

सूर्यफूल, भुईमूग इत्यादी आणि पक्का माल म्हणजे भाकरी, पोळी, पाव, ब्रेड, कापड, साखर, गूळ, तेल, डाळ इत्यादी. ग्रामीण भागात कच्चा माल पक्का करण्याच्या सोयी उपलब्ध नाहीत. पक्का माल तयार करण्यासाठी कौशल्य, भांडवल, तंत्रज्ञान लागते. ते बहुतेक शेतकऱ्यांकडे नाही. परिणामी 'आहेरे'वाल्यांनी या सर्व क्षेत्रात प्रगती केली आणि कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग शहरात गेले. कच्चा माल तयार करणारा एक आणि पक्का माल तयार करणारा दुसरा असे त्याला स्वरूप आले. त्यामुळे कच्चा माल तयार करणारा आर्थिकदृष्ट्या नागावला गेला आणि पक्का माल तयार करणारांची आर्थिक प्रगती होत गेली. पक्क्या मालाचे वैशिष्ट्य असे की ते नेहमी अधिक फायदेशीर असते. कारण त्याचे मूल्य वर्धित होत असते.

कच्च्या मालाचे आणि पक्क्या मालाचे काळ, काम, वेगाप्रमाणे गणित मांडले तर असे लक्षात येते की, कच्च्या मालाच्या उत्पादनाला मेहनत अधिक लागते. पीक हाती येण्याचा काळही मोठा असतो. शिवाय सर्व काही वेळेवर करूनही नेमके पीक किती येईल याची खात्री नसते. शेतीउत्पादनाचा भरवसाच नसतो. यामध्ये निसर्गही आपली खेळी खेळत असतो. त्यामुळे शेतीतील उत्पादन हा बेभरोशाचा खेळ आहे. पक्क्या मालाचा म्हणजेच प्रक्रिया उद्योगाचा विचार केला तर शेती उत्पादनाच्या आड येणारे बहुतेक अडथळे यात नसतात. तुलनेने प्रक्रिया उद्योगातून तयार होणाऱ्या पक्कया मालाला कमी काळ लागतो. त्यावर नफा किंवा फायदा जास्त मिळतो.

मुद्दा अधिक स्पष्ट करण्यासाठी सूर्यफुलाचे उदाहरण घेऊया. सूर्यफूल हे तेलबिया या वर्गात मोडणारे पीक आहे. शेतीतील मशागत, बी-बियाणे, खते, कीटकनाशके या सर्वांचा प्रमाणात वापर झाला. पाऊस वेळेवर पडला तर १०० ते ११० दिवसांत सूर्यफुलाचे चांगले पीक हाती पडेल. हे पीक हेक्टरी सात ते आठ क्विंटल किंवा त्यापेक्षा अधिक उत्पादन देते. शेतकऱ्याने ते बाजारात विकले तर त्याला किलोमागे ७५ पैसे ते एक रुपया इतका नफा होतो. उत्पादन आणि उत्पन्न वाढते हे खरे. पण खर्च आणि वेळ याचा विचार केला तर हा फायदा तुटपुंजाच आहे. कारण शेतकरी सूर्यफूल शहरात नेऊन बाजारामध्ये विकतो. आडतदुकानदार, व्यापारी, ऑईलमिलवाले हे विकत घेतात आणि त्यावर प्रक्रिया करून ते पेंड आणि तेल याचे उत्पादन करतात. तेलबियांच्या उत्पादनकाळापेक्षा कितीतरी कमी काळ या तेल काढण्याच्या प्रक्रियेस लागतो. त्यामुळे किलोमागे २५ पैसे नफा जरी त्या व्यापाऱ्याला मिळाला तरी तो फायद्यातच राहतो. शेतकरी पुन्हा आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी हेच तेल आणि पेंड चढत्या भावात विकत घतो.

या सर्व चक्राचा विचार केला तर शेतकऱ्याने अधिक उत्पादन करणे म्हणजे अधिक शोषित होणे असे वाटते. पूर्वीच्या काळी गावागावात अशा जीवनावश्यक वस्तूंवर प्रक्रिया करण्याची पद्धत रूढ होती. गावातील तेली शेतकऱ्याला त्याच्या गरजे-प्रमाणे तेलबियांतून तेल काढून देत होता. त्यात त्याला नफा मिळत नव्हता. त्याला त्याच्या श्रमाची किंमत मिळत होती. आजचा प्रक्रिया उद्योग श्रममूल्य मिळविण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही; तर तो व्यापार झाला आहे. नफा मिळविणे हा कुठल्याही व्यापाऱ्याचा उद्देश असतोच. या सबंध प्रक्रियेमध्ये अधिक मेहनत करणारा शेतकरी कमी उत्पन्न मिळवतो आणि कमी मेहनत करणारा प्रक्रिया कारखानदार कमी वेळात जास्त उत्पन्न मिळवितो. मला वाटते ही कळत नकळत शेतकऱ्यांच्या श्रमाची चोरी आहे. या नकळत होणाऱ्या चोरीमुळेच शेतकरी देशोधडीस लागत आहे. ही चोरीच आहे. ही चोरी थांबवायची असेल तर शेतीमध्ये उत्पादन होणाऱ्या वस्तूंवर शक्य तेवढे प्रक्रिया उद्योग, अन्नधान्यांवर प्रक्रिया करणारे उद्योग त्याच गावात सुरू केले पाहिजेत. गावाची गरज ओळखून प्रक्रिया उद्योगाद्वारे गरजेपुरता पक्का माल तयार झाला तर शेतकरी कच्च्या आणि पक्क्या अशा दोन्ही मालाचा उत्पादक होईल. त्याच्या श्रमाची होणारी चोरी थांबेल. त्याचे उत्पन्न वाढेल.


शेतीउत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग पूर्वीच्या काळी गावागावात सुरू होते. गावात तेली होता. दावे-दोरखंड तयार करणारे होते. गावातला धनगरच घोंगड्या तयार करीत होता. सर्वच गावांतून कापड तयार करणारे नसले तरी जवळ-पासच्या खेड्यांतून विणकर लोक होते. गावातच गुऱ्हाळ चालायचे. पाक, गूळ आणि काही वेळा खडीसाखरही गावात तयार होत असे. पण औद्योगिकरणाच्या व आधुनिकीकरणाच्या नावाखाली हे सारे बदलले आणि शहरात याचे केंद्रीकरण झाले. घराघरात चालणारे 'जाते' थांबले. शेतकरी मात्र भरडून निघाला. म्हणून शेतीत कच्चा माल तयार करणाराकडेच पक्का माल तयार करण्याची व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. गावच्या स्वावलंबनाला यामुळेच हातभार लागणार आहे.

❑

# ५. उत्पादनाचे मूल्य ठरविण्याचा अधिकार

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या भोवती लोकशाहीची संकल्पना गुंफलेली आहे. भारताने लोकशाही स्वीकारताना या त्रिसूत्रीचा अंगिकार केलेला आहे, पण लोकशाहीची ही मार्गदर्शक सूत्रे भारतात तरी घटनेच्या बाहेर पडली नाहीत. आम्ही समतेचा स्वीकार केला, परंतु मतदान सोडले तर इतर क्षेत्रांत समता अद्यापही प्रस्थापित झाली नाही. बंधुतेबद्दल न बोललेलेच बरे. स्वातंत्र्याचीही अशीच बोळवण करण्यात आली आहे. मताचे स्वातंत्र्य, उद्योग करण्याचे स्वातंत्र्य. उद्योगातून निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या किमती ठरविण्याचे स्वातंत्र्य. विचारस्वातंत्र्य असे स्वातंत्र्याचे अनेक रंग आहेत. मात्र या रंगांचे सौंदर्य फार कमी भारतीयांना डोळे भरून पाहता आले. ज्यांची संख्या अल्प प्रमाणात आहे अशांना या स्वातंत्र्याने दिलासा दिला आहे, पण ज्यांची संख्या मोठी आहे अशा भारतीयांपासून हे स्वातंत्र्य आणखी दूर आहे.

ब्रिटिशांनी भारतावर राज्य केल्याचे दुःख आहेच, पण त्यांनी आमचा गावगाडा विस्कळीत केला याचे दुःख अधिक आहे. ब्रिटिशपूर्व काळातील गावगाडा हा परस्परावलंबी होता. त्यामुळे त्या वातावरणात एकमेकांच्या मताची, मदतीची कदर होती. गावातील परंपरागत कारागिरांची गरज लक्षात आली होती. शेजारधर्म पाळला जात होता. मोठ्या प्रमाणात निर्माण केलेल्या वस्तूंचा क्रयविक्रय शेतकरी स्वतः करीत होता. एवढेच नव्हे तर त्याने निर्माण केलेल्या वस्तूंची किंमतही तो ठरवीत होता. गावातील भुसार मालाचे उद्योग करणाऱ्याला वस्तू विकायची की नाही हे तो ठरवीत होता. नव्हे याचे स्वातंत्र्य त्याला होते; आणि म्हणूनच शेतीचा उद्योग सर्वोत्तम उद्योग



समजला जात होता. माझ्या लहानपणी मी म्हण ऐकली होती, "उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी" परंतु राज्य ब्रिटिशांचे आले आणि नोकरीची किंमत वाढली. ब्रिटिशांच्या काळात नोकऱ्यांचे प्रमाण वाढले. त्यांनी ही म्हण बदलली आणि आज "उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती" असे म्हणावे अशी शेतकऱ्यांची परिस्थिती आहे. शेती हा आतबट्ट्याचा व्यवहार आहे. तो शारीरिक कष्टाचा आहे. निसर्गावर, किंबहुना पावसावर तो अवलंबून आहे. त्यामुळे या व्यवसायाकडे तुच्छतेने बघण्याची वृत्ती ब्रिटिश काळानंतर सुरू झाली. हे खरे की, आजची शेतीकडे बघण्याची दृष्टी ब्रिटिशांनी केलेल्या दुर्लक्षाचे कारण आहे. त्यामुळे शेतीव्यवसाय करणाऱ्यांना समाजात आणि राजकारणातही फारशी प्रतिष्ठा मिळत नाही. अशी काही कारणे श्रमाला प्राधान्य देणारी नसली तरी गेल्या ५० वर्षांत आपल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न इतर उत्पादकांच्या प्रमाणात वाढले नाही याला अनेक कारणे आहेत. त्यापैकी एक, पण महत्त्वाचे कारण इथे नमूद करण्यासारखे आहे.

गेल्या ५० वर्षांत समाजातील शेतीव्यतिरिक्त व्यवसाय करणाऱ्यांना समाजरचनेच्या चुकीच्या घडणीमुळे आणि शासनाच्या दुर्लक्षामुळे अधिक स्वातंत्र्य मिळाले. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती चांगलीच बळकट झाली. हे स्वातंत्र्य म्हणजे त्यांनी सुरू केलेल्या व्यवसायाची किंमत ठरविण्याचे. हा प्रश्न समजून घेण्यासाठी आपण उदाहरण घेउया वकिलाचे. वकिलाकडे जेव्हा एखादा अशील जातो तेव्हा वकील त्या अशिलासाठी करावयाच्या कायदेशीर कामाची किंमत म्हणजे त्याची फी सांगत असतो. डॉक्टरकडे एखादा पेशंट गेला तर डॉक्टर तपासणी आणि औषधाची फी पेशंटला सांगतो. कापडाची किंमत कापड दुकानदार सांगतो. किंमत सांगण्याचा मुद्दा यासाठी इथे लक्षात आणून द्यायचा की, समाजातल्या ठराविक व्यवसाय करणारांना स्वत:च्या बौद्धिक, शारीरिक किंवा स्वत: निर्माण केलेल्या वस्तूंची किंमत सांगण्याचा अधिकार मिळाला आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात हा अधिकार सर्वच घटक वापरू शकत नाहीत. जेव्हा मजुरांचा तुटवडा असतो तेव्हा मजूर आपल्या श्रमाची किंमत म्हणजे मजुरी वाढवून मागू शकतात. मात्र असे क्वचितच घडते. सदासर्वकाळ त्यांनाही त्यांच्या मागणीप्रमाणे स्वत:ची मजुरी ठरवता येत नाही. या सर्वांमध्ये शेतकरी अधिक दुर्दैवी ठरला आहे. कारण त्याने निर्माण केलेल्या मालाची किंमत त्याला ठरविता येत नाही. एखाद्या शेतकऱ्याने धाडस केले आणि कृषी उत्पन्न बाजारात आपला माल विक्रीसाठी काढला. त्याचा भाव त्यानेच जाहीर केला तर मार्केटमधील आडत दुकानदार किंवा दलाल आणि तुमच्या आमच्यासारखेही त्याला वेड्यात

काढतात. 'तुझ्या मालाचा भाव तू ठरवायचा नसतो. आडते ठरवितात.' असे त्याला कोणी सांगितले तर ते बरोबरच आहे असेही सांगणारे बाजारात अनेकजण भेटतात.

मला असे वाटते की, शेतीतील उत्पादन वाढवूनही आजचा शेतकरी हलाखीचे जीवन जगत आहे. याची कारणे अनेक असतील, पण सर्वांत महत्त्वाचे कारण त्याला स्वतःच्या उत्पादित मालाची किंमत किंवा भाव ठरविता येत नाही हे आहे. लोकशाहीमुळे शेती, उद्योग, व्यापारात अनेक व्यवस्था शासनाने निर्माण केल्या. कोणीही कोणाची पिळवणूक करता कामा नये हा त्यामागचा उद्देश असला तरी शेतकऱ्याने स्वतः उत्पादित केलेल्या शेतमालाची किंमत ठरविण्याचे स्वातंत्र्य भारतातही त्याला उपभोगता आले नाही. हे स्वातंत्र्य कसे द्यायचे हा अडचणीचा मुद्दा होणार असला तरी ते दिल्याशिवाय शेतकऱ्यांचा उत्कर्ष होणे शक्य नाही. शेती-व्यवसाय उत्तम होता कारण त्या काळात आपल्या उत्पादित मालाचा भाव वा किंमत माल विकत घेणारा व्यापारी किंवा ग्राहक ठरवीत नव्हता तर तो शेतकरी ठरवीत होता. कृषी उत्पन्न बाजार समित्या किंवा आडत दुकानदार हे स्वातंत्र्य शेतकऱ्याला देऊ शकतील असा बदल या व्यवस्थेत झाल्याशिवाय ही व्यवस्था शेतकऱ्यांच्या हिताची ठरणार नाही.

❑



# ६. पंचक्रोशीतच शिक्षणाच्या सोयींची उपलब्धता

स्वयंपूर्ण खेडे हा महात्मा गांधी यांच्या ग्रामराज्य चळवळीचा मुख्य आधार होता. पंचक्रोशीतील उत्पादनावर पंचक्रोशीतच प्रक्रिया व्हावी असे यात अपेक्षित होते. महात्मा गांधीची दूरदृष्टी शिक्षणविषयक उपक्रमांना लागू करायला हवी. असे झाल्यास शैक्षणिक दृष्टिकोनातून खेडे स्वयंपूर्ण व्हावयास विलंब लागणार नाही.

पूर्वी म्हणजे निजाम राजवटीत ठराविक गावातच शाळा होत्या. छोट्या गावातील विद्यार्थी शाळा असलेल्या गावात येऊन शिक्षण घ्यायचे. गावातील सर्वच विद्यार्थी शाळेत गेले पाहिजेत असे बंधन त्या काळी नव्हते. दलित, मातंगांची मुले क्वचितच शाळेत जायची. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणासमवेतच चातुर्वर्ण्य भोगावे लागे. सवर्ण विद्यार्थ्यांपासून या विद्यार्थ्यांना वेगळे बसवले जाई.

सर्वांसाठी शिक्षण अशी घोषणा स्वातंत्र्यानंतर जनमानसावर बिंबवण्यात आली. शिवाय शिक्षणक्षेत्रातली चातुर्वर्ण्य व्यवस्था संपविण्यासाठी खेड्यांपाड्यांतूनही प्रयत्न झाल्याने वाढत्या लोकसंख्येप्रमाणे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या चांगलीच वाढली. हजार लोकवस्तीच्या गावातही साधारणपणे २० ते २५ मुले शिक्षणासाठी शाळेत येऊ लागली. साधारणतः: तीन हजार लोकसंख्या असलेल्या गावात सातवीपर्यंत शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध झाली. निजाम राजवटीत दहावीच्या शिक्षणासाठी हैद्राबादला जावे लागे. ती परिस्थिती आता राहिली नाही. मोठ्या गावात आता दहावीपर्यंतचे शिक्षण उपलब्ध झाले आहे. एवढेच नाहीतर काही गावात कनिष्ठ

महाविद्यालये ही सुरू झाली आहेत. या तुलनेत तांत्रिक आणि कौशल्यावर आधारित तंत्रनिकेतन महाविद्यालये मात्र आजही शहराची सीमा ओलांडून खेड्यांपर्यंत पोचली नाहीत. अशी महाविद्यालये शहरातच असल्याने केवळ घरची आर्थिक परिस्थिती बरी असणाऱ्या पालकांचीच मुले अशा शिक्षणासाठी शहरात जाऊ लागली. शिवाय मुलामुलींना शिक्षणासाठी शहरात ठेवणे ही एक प्रतिष्ठेची, श्रीमंतीची बाब समजली जाऊ लागली. आर्थिक निकषावर शिक्षणात भेद निर्माण झाला. या शिक्षणसंस्थांनी आपल्या शहरातील सीमा न ओलांडल्यामुळे खेड्यांतील गोरगरिबांची मुले अशा शिक्षणापासून आजही वंचितच आहेत. म्हणूनच की काय स्वयंपूर्ण खेड्याच्या चळवळीतील खेड्यांच्या वाट्याला हे अपंगत्व आल्यासारखे वाटते. ग्रामराज्याला मूळ आकार देण्याकरिता हे अपंगत्व दूर करावे लागेल.

प्रत्येक पंचायत समिती मतदारसंघ एक एकक म्हणून गणला पाहिजे. अशा मतदार संघातील एखाद्या गावी सर्व शिक्षणाच्या सुविधांचे संकुल उभारावयास पाहिजे. अशा संकुलात कला शाखेपासून विज्ञान, तंत्रज्ञान, संगणक, तंत्रनिकेतन, पदव्युत्तर शिक्षण आदि ज्ञानशाखेतील शिक्षणाची सोय व्हावयास हवी. यामुळे त्या त्या पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार शिक्षण घेता येईल. दूर शहराला जाऊन शिक्षण घेण्यासाठी जो खर्च त्याला लागणार होता तो लागणार नाही. शिवाय त्या त्या पंचक्रोशीतील अशा संकुलातच अथवा उपलब्ध असलेल्या शिक्षण संस्थांतच प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे हे बंधनकारक केल्यास अशी संकुलेही विद्यार्थ्यांनी भरून जातील. महाविद्यालयेही चांगली चालतील. उपलब्ध नसलेल्या ज्ञानशाखांसाठीच विद्यार्थ्यांना बाहेर जाण्याची परवानगी दिल्यास गावातही केवळ शैक्षणिकच नव्हे तर आर्थिक उलाढालही वाढेल. जवळच शिक्षणाची सोय उपलब्ध झाल्याने आपल्या शिक्षणासाठी कराव्या लागणाऱ्या शिक्षणखर्चातही कपात होईल. एवढेच नव्हे तर सुट्टीच्या दिवसांत हे विद्यार्थी आपआपल्या घरच्या कामाला, श्रमाला उपयोगी पडतील.

आज कुठल्याही खेड्यातून तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेण्यास येणारा विद्यार्थी दरमहा सरासरी ५०० ते १००० रुपये खर्च करतो. या खर्चात प्रवास, खोलीभाडे, भोजन, कपडे, शिक्षणसाहित्य यावर होणारा खर्च समाविष्ट आहे. त्याचा फायदा तो शिक्षण घेत असलेल्या शहराला होतो. दररोज बसने जा-ये करणारा विद्यार्थी सुध्दा महिन्याकाठी अडीचशे ते तीनशे रुपयांचा खर्च करतो. अंबाजोगाई-सारख्या ठिकाणी दररोज जा-ये करणारे किमान हजार विद्यार्थी आहेत. किरायाने खोल्या करून

राहणारेही तेवढेच निघतील. याचा अर्थ असा निघतो की, महिन्याकाठी या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या सुखसोयीसाठी या शहरात दहा लाख रूपये येतात. या विद्यार्थ्यांना प्रत्येक पंचायत समिती मतदारसंघात दर्जेदार शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या तर अंबाजोगाई सारख्या गावात येणारा पैसा त्या खेड्यातच राहील. दरडोई दरमहा शहरात येणारा पैसा शहरात येणार नाही. यात ग्रामीण भागातील पालकांचा फायदा तर आहेच आहे, शिवाय शहराच्या वाढीवर ही मर्यादा येईल. गावातच उच्च शिक्षणाची सोय करणाऱ्या गावांची संख्या वाढेल. अर्थात या वाढीला निश्चित मर्यादा असेल. याचा फायदा मतदारसंघातील लोकांना अप्रत्यक्षरीत्या होईलच. यामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांचे सरासरी अडीचशे ते पाचशे रुपये दर महिन्याला वाचतील. त्याबरोबरच ज्या गावात पदवी आणि पदव्युत्तर, तांत्रिक आणि इतर शिक्षणाची सोय आहे त्या गावांचाही चांगला विकास होईल. त्या गावांचे उत्पन्न वाढेल. गावातच सर्व शिक्षक, प्राध्यापकांना राहण्याचे बंधन केल्यामुळे शिक्षक-प्राध्यापकांचे पगार गावातच खर्च होतील. शालेय साहित्य विक्रीचीही काही दुकाने चालतील. छोट्या-मोठ्या खानावळी आणि हॉटेल्स चालतील. न्हाव्याच्या दुकानापासून धोब्याच्या दुकानापर्यंत छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्यांना ग्राहक मिळतील. दुकानदारांचे उत्पन्न वाढेल. असे शिक्षणकेंद्र असलेल्या गावातील बेकारी यामुळे कमी होईल. रोजगाराची शाश्वती वाढेल.

प्रत्येक पंचायत समितीच्या मतदारसंघात असे शिक्षणकेंद्र उभे केले पाहिजे. शहरात फक्त उच्च तांत्रिक, अतिउच्च शिक्षणाचीच सोय करण्यात आली पाहिजे. यामुळे शहरात वाढणारी तरुणांची प्रचंड गर्दी कमी होईल. गल्लोगल्लीत, खुराड्यात प्राणी ठेवावेत अशा पद्धतीने किरायाच्या घरात राहणारांची गर्दी कमी होईल. वाहतुकीवर पडणारा ताण कमी होईल. गुंडागर्दीही कमी होईल. शहराचे पर्यावरण सुधारेल आणि ग्रामीण भागाची अर्थव्यवस्थाही सुधारेल. गावांची झीज करणारा एक मार्ग बंद होईल.

❑



# ७. गुळाचे गुऱ्हाळ तसे साखरेचे साखराळ

अलीकडच्या काळात 'गुळवे' हा शब्द ऐकायला सुद्धा मिळेनासा झालाय. गूळ तयार करण्याच्या पाककौशल्यात माहिर असणाऱ्या व्यक्तींना पूर्वी 'गुळवे' म्हणून ओळखले जाई. गेली काही शतके ऊसापासून गूळ तयार करण्याची प्रक्रिया ग्रामीण भागातील जनतेला अवगत होती. खेडोपाडी प्रवासात हमखास गुऱ्हाळे लागायची. आजच्या प्रमाणात त्यावेळी ऊसाला लागणारे पाणीही भरपूर प्रमाणात उपलब्ध होते. पाणी उपसण्याची आजच्याएवढी अद्ययावत यंत्रणा जरी नसली तरी पोहऱ्याने किंवा मोटेने विहिरीतील पाणी काढून ऊसाला दिले जाई. दिवसाकाठी एका विहिरीतून पाच-दहा भिऱ्यांपर्यंत जमीन याद्वारे भिजली जायची. पाणी उपसायच्या मर्यादित साधनांमुळे विहिरीला कितीही पाणी असले तरी ऊस लागवडीला आपोआपच मर्यादा येत होती. सगळ्याच गावांत ऊस होता असेही नाही. जे घरचे बरे होते त्याच्याजवळ ऊस असायचा. स्वाभाविकच त्याच्याजवळ बैल-बारदान भरपूर राहायचा. यामुळे त्यांना मोटेने पाणी उपसणे शक्य व्हायचे. ज्याच्याजवळ ऊस तो शेतकरी गब्बर हे गणितच होते, नव्हे तो शेतकरी श्रीमंत समजला जायचा. त्याकाळी साखर कारखाने नसल्याने गुळासाठीच ऊसाची लागवड होत होती. अशा गुऱ्हाळापासून तयार झालेला गूळ त्या त्या गावपरिसरातच विकला जायचा हे विशेष.

अत्याधुनिकतेच्या धबडग्यात खेडी कधी बदलली ते आपल्या लक्षातही आले नाही. विहिरींची जागा बोरने घेतली. मोटेच्या जागेवर इंजीन, इलेक्ट्रिक पंपाने कब्जा केला. मोटेसमवेत मोटेवरची गाणीही विरली. गुळाबद्दलही असेच झाले. गूळ, काकवी याची जागा साखरेने घेतली, क्युब्सने घेतली. साखरेच्या उपलब्धतेमुळे लोकांचा

कलही साखरेकडे झुकला. गुळाची पोळी खाण्याऐवजी साखरेची पोळी खाणे प्रतिष्ठेचेच नव्हे, तर श्रीमंतीचे लक्षण समजले जाऊ लागले. शेतकऱ्यांऐवजी यात उद्योगपतींनी आपआपल्या भागात खांडसऱ्या सुरू केल्या. यात सुधारणा होऊन साखर कारखाने निर्माण झाले. हळूहळू ऊसाच्या गोडीतला नफा शेतकऱ्यांऐवजी उद्योगपतींकडे वळता झाला. शेतकरी केवळ ऊसाचा धनी राहिला. स्वातंत्र्यानंतर भांडवल नसलेल्या शेतकऱ्यांनाही स्वत:चा साखरउद्योग सुरू करता यावा म्हणून सहकारी चळवळीतून बळ मिळाले. अनेक सामान्य शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी पद्धतीने साखर कारखाने सुरू केले. शासनानेही अशा कारखान्यांना मोठ्या प्रमाणात अनुदान दिले. विविध बँकांद्वारे कर्ज मिळवून दिले.

खाजगी कारखाने संपुष्टात येऊन त्याची जागा सहकारी साखर कारखान्यांनी घेतली. सहकारी चळवळीची पाळंमुळं लक्षात घेता महाराष्ट्रात अशा सहकारी साखर कारखान्यांची संख्या भरमसाठ वाढली. ऊसाची मागणी लक्षात घेता लाखो एकर जमिनीवर ऊसाची लागवड होऊ लागली. विहिरी, तळे, बोअर्स यांचे पाणी साखरमळ्याकडे धावू लागले. कारखान्यातून लाखो टन साखर बाहेर पडू लागली.

सहकाराच्या तत्त्वामुळे कारखाना सर्वांच्या मालकीचाच! कारखान्यात काम करणाऱ्या कामगार तंत्रज्ञापासून ते ऊसउत्पादक शेतकऱ्यांपर्यंत याचा लाभ पोहोचला. मात्र सहकारी बंधने, डायरेक्टर मंडळींच्या भ्रष्टाचार आणि कामगारांची दादागिरी लक्षात घेतली तर ऊसउत्पादक शेतकऱ्याला म्हणावा तसा आर्थिक लाभ झाला नाही. इथेही त्यांच्या श्रमाची चोरी होतच गेली. ऊसाचा आणि साखरेचा भाव ठरविण्याचे अधिकार शासनाने आपल्या हातात घेतले. यामुळे शेतकऱ्याला ऊसासाठी दिला जाणारा भाव, हा साखर उत्पादनासाठी लागणारा खर्च आणि साखरेची किंमत याचा विचार केला तर शेतकरी तुलनेने तोट्यातच राहू लागला. खर्चावर आधारित भाव कधीच कोणत्याही कारखान्याने शेतकऱ्यांना दिले नाहीत. यापुढच्या काळात ते मिळतील याची कोणीही खात्री देऊ शकत नाही. म्हणून शेतकऱ्यांचा खरेच फायदा करावयाचा असेल तर ऊस उत्पादक आणि साखर कारखानदार यांचे आजचे संबंध बदलले पाहिजेत.

साखरेचा भाव ठरविण्याचा हक्क ऊसउत्पादक शेतकऱ्याला मिळाला पाहिजे. हे करायचे असेल तर साखर विक्रीची पद्धत बदलली पाहिजे. ती पद्धत पिठाच्या गिरणीसारखी असावी. पिठाच्या गिरणीत ग्राहक ज्वारी किंवा गहू घेऊन जातो. गिरणीमालक त्याचे दळण दळून पीठ करून देतो. गिरणीमालकाला दळणाचे पैसे दिले

जातात. ग्राहक पीठ घेऊन घरी येतो आणि गरजेप्रमाणे वापरतो. साखरेचा साखर कारखाना ही पिठाची गिरणी समजावी. शेतकऱ्यांनी आपला ऊस तेथे नेऊन गाळावा. साखरेच्या उताऱ्याप्रमाणे त्यांनी घातलेल्या ऊसाच्या मोबदल्यात त्यांना साखर परत मिळेल. साखर कारखाना त्यांच्याकडून ऊसावर साखरेची प्रक्रिया करण्याचा खर्च घेईल. शेतकरी त्याच्याकडे असलेली साखर गरजेप्रमाणे त्याला हवी तेव्हा त्याला परवडणाऱ्या किंमतीत विकू शकेल. म्हणजे आज साखरेचे दलाल कारखान्यातून साखर उचलतात त्याऐवजी ते अशा शेतकऱ्यांकडून साखर घेतील. मोंढ्यात जशी शेतकऱ्यांकडून ज्वारी, गहू, तेलबियांची खरेदी आडत दुकानदार करतो. तशी खरेदी साखरेचे आडते त्या शेतकऱ्यांकडून साखर घेतील करतील. राहिला प्रश्न स्वस्त धान्यासाठी कमी भावात विकणाऱ्या साखरेचा. यासाठीही सरकार टेंडर काढून निरनिराळ्या शेतकऱ्यांकडून व्यापाऱ्यांप्रमाणेच साखर खरेदी करील आणि ती साखर कमी भावाने स्वस्त धान्य दुकानदाराला देईल. म्हणजे स्वस्त धान्य दुकानदार ती साखर स्वस्त दरात विकू शकेल. गरिबांचे आर्थिक नुकसान होणार नाही.

वर लिहिल्याप्रमाणे हा सर्व व्यवहार सचोटीने आणि शेतकऱ्यांचे हित समोर ठेवून झाला तर शेतकरीही डॉक्टर, वकिलाप्रमाणेच आपल्या मालाचा भाव ठरवू शकेल. डॉक्टर, वकील, व्यापारी, यांना श्रमाचा, कौशल्याचा, मालाचा भाव ठरविण्याचा जो अधिकार या व्यवस्थेने दिला तो अधिकार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळेल. यामुळे त्यांची प्रतिष्ठा वाढेल. पिळवणूक होणार नाही. निवडणुकीत त्यांना मत देण्याची संधी जरी असली तरी त्या मताला प्रतिष्ठा नाही. जर शेतकऱ्याला आपण उत्पादन केलेल्या भावाचा हक्क ठरविण्याची संधी उपलब्ध करून दिली तर शेतकऱ्याच्या मतामागे त्याची पत उभी राहील. मताबरोबर पत आली की शोषण होणार नाही.

❑



# ८. गावकुसातच उद्योगांची निर्मिती

स्वावलंबन केवळ व्यक्तीपुरतेच मर्यादित नसून ते प्रत्येक गावालाही आवश्यक आहे. पूर्वी खेडी पाडी, गावे स्वावलंबी असायची. हे स्वावलंबन परस्पर सहकार्यातून आकाराला आले होते. ग्रामीण भागाला समृद्ध करण्यात शेतकऱ्यांसमवेत 'बारा बलुतेदारांचा' वाटाही महत्त्वाचा होता. पारंपरिक कारागिराचा वर्ग म्हणून बारा बलुतेदारी असायची. त्यात प्रामुख्याने सुतार, कुंभार, न्हावी, चांभार, साळी, माळी, शिंपी, रंगारी, सोनार, तेली... यांचा समावेश होता. ही कारागिरांची वर्गवारी होती. याशिवाय वेशीच्या बाहेर ठेवलेला आणखी एक वर्ग होता. या वर्गाकडून मृत जनावरांना ओढून नेणे आणि त्यांची कातडी काढणे, शेणामातीची कामे करणे, जनावरांच्या गोठ्याची सफाई करणे अशा कमी दर्जाची कामे त्यांच्याकडून करून घेतली जात होती. हा वर्ग घाण कामे करतो म्हणून त्याला अस्पृश्य समजले जात होते. घरातली धुणी-भांडी ते बाळाची शी-सू काढणारी आपली आईसुद्धा घाणच कामे करीत होती. तिला आपण कधी अस्पृश्य मानले नाही. अशाच स्वरूपाची इतर कामे करणाऱ्या व्यक्तींना मात्र समाजाने वेशीबाहेर काढले अस्पृश्य मानले व माणुसकीहीन खालच्या दर्जाची वागणूक दिली.

शरीरश्रम आणि कौशल्य हे बारा बलुतेदारांचे किंवा पारंपरिक कारागिरांचे एकमेव भांडवल होते. एकीकडे शेतकरी आणि दुसरीकडे बारा बलुतेदार असे दोन वर्ग असले तरीही हे दोन्ही वर्ग परस्परावलंबी होते. सुतार- लोहाराने शेतीची अवजारे करायची. गावातल्या लोकांच्या घरासाठी दरवाजे, खिडक्या, माळवदाचे साहित्य तयार करायचे, शिंप्याने कपडे शिवायचे, तेल्याने कडधान्यांचे तेल काढायचे आणि

वेशीबाहेरच्या लोकांनी शेतकऱ्यांच्या मृत जनावरांची विल्हेवाट लावायची. या सर्वांच्या मोबदल्यात शेतकऱ्यांनी या गावकामगारांना वर्षभर लागणारे धन-धान्य पुरवायचे. पारंपरिक कारागिराच्या मदतीशिवाय शेतकरी किंवा गावकऱ्यांचा संसार अपूर्ण होता. शेतकऱ्यांच्या धनधान्याच्या मदतीशिवाय गावकारागीरांना जगणे कठीण होते म्हणून हे सर्व वर्ग परस्परावलंबी होते. या परस्परावलंबनातूनच शेजारधर्म पाळला जाऊ लागला. या संबंधामुळेच गावातही एकमेकांचा दर्जा सांभाळला गेला. तंटे बखेडे सामोपचाराने सुटू लागले. गावागावात राहणाऱ्या सर्वच कुटुंबांना एकमेकांच्या मदतीने जगण्याची सवय लागली होती. गाव सुखी-समाधानी होते.

पण हळूहळू  हे वातावरण बदलले. शिक्षणाचे प्रमाण वाढले. त्यामुळे स्वाभिमान वाढला. आपली पिळवणूक होत आहे याचे भान आले. त्यातूनच बारा बलुतेदारांचा गाडा हळूहळू बिघडत गेला. बारा बलुतेदारी विस्कळीत झाली. एका अर्थाने हे बरेच झाले. कारण या प्रथेमध्ये अडकलेल्या माणसाला दुय्यम दर्जाची वागणूक वरच्या वर्गाने दिली होती. माणसांसारखे त्याने जगावे असा फारसा कोणी प्रयत्न केला नव्हता. कालांतराने फुले, आंबेडकर, शाहू महाराज आदी समाजसुधारकांच्या विचारांचा प्रभाव वाढत गेला. बारा बलुतेदारांची मुलं शिकली. नोकरीला लागली. चांगलं जीवन जगू लागली. त्यांना सन्मान मिळू लागला. पिळवणूक आणि माणुसकीहीन वागणूक या बारा बलुतेदारांना चिकटलेल्या दोन जळवा होत्या. यातून हा समाज बाहेर पडत गेला.

याचा दुसरा परिणाम मात्र गावाच्या दृष्टीने चांगला झाला नाही. गावाला सहाय्यभूत होणाऱ्या वस्तू गावात मिळणे दुर्मिळ झाले. विशेषत: शेती व्यवसायाला लागणाऱ्या अवजारांच्या निर्मितीचे काम मंदावले. या सर्व गोष्टी शहरात निर्माण होऊ लागल्या. अगदी आयत्या कपड्यापासून दावे-दोरखंडापर्यंत सर्वच वस्तू शहरातून गावात येऊ लागल्या. शहरात येणाऱ्या वस्तू अधिक सुबक आणि आकर्षक आहेत. त्यामुळेही गावात तयार होणाऱ्या वस्तूंची मागणी कमी झाली. गावकामगारांच्या सहकार्याशिवाय आम्ही शेती करू शकतो, दावे- दोरखंड, आयते कपडे, तेल इत्यादी घेऊ शकतो असे शेतकऱ्यांना तसेच गावातील इतर लोकांना वाटू लागले. या बदलत्या परिस्थितीमुळे गावातील परस्परावलंबीत्व कमी झाले. जीवनावश्यक सर्वंच गरजा शहराकडून भागविण्याची सोय झाल्यामुळे आपले काही अडत नाही अशी भावना गावकऱ्यांत बळावली. यामुळे गावात तयार होणाऱ्या वस्तू, पक्का माल, औजारे, दावे-दोरखंड, चपला-जोडे, तेल इत्यादींच्या मागणीवर परिणाम झाला. गावकारागिरांचे

महत्त्व कमी होऊ लागले. ही सर्व परिस्थिती सुद्धा गावाची आर्थिक झीज होण्यास कारणीभूत ठरली आहे. गावाला खऱ्या अर्थाने स्वावलंबी करायचे असेल तर गावच्या गरजा गावातील लोकांकडूनच भागवल्या पाहिजेत. शहरात मिळणारे चांगले आणि गावात मिळणारे कमी दर्जाचे ही गावकऱ्यांची मानसिकता बदलली पाहिजे.

चांभारकीचा परंपरागत धंदा करणाऱ्या मुलांनी तोच धंदा केला पाहिजे या मताचा मी नाही. चांभाराचा मुलगा हुशार असेल तर तो डॉक्टर, इंजीनिअर होईल. पण त्या चांभाराऐवजी गावांत कोणी तरी चामडी कमविणारा वा जोडे करणारा असला पाहिजे. त्यांनी तयार केलेले जोडे गावातील लोकांनी घेतले पाहिजेत. गावातच तेल काढले पाहिजे. दावे दोरखंडाचा उद्योग गावातच कोणी तरी केला पाहिजे. गावातील शिंप्याकडून कपडे शिवून घेतले पाहिजेत. सुतार-लोहाराकडून अवजारे करून घेतली पाहिजेत अशी मानसिकता तयार करण्याची गरज आहे. परंपरागत बारा बलुतेदाराची गरज नाही. हे उद्योग इतर कोणीही केले तरी चालतील. पण वरील वस्तू गावांत तयार करणाऱ्या कारागिरांची आज गरज आहे.

आज लघुयंत्रे मिळतात. त्यांचा वापर बलुतेदार कारागिरांनी केला तर चांगल्या दर्जाच्या, सुबक वस्तू गावात तयार होऊ शकतील.

एवढेच नव्हे तर या कारागिरांनी गावांत तयार केलेल्या वस्तू गावांतील लोकांनी खरेदी कराव्यात. गावांतील वस्तू खरेदी केल्या तर गावातील श्रम गावात राहतील. पाच-दहा कुटुंबांना कायमचा रोजगार मिळेल. गावची होणारी झीज थांबवता येईल.

❑



# ९. गावकुसातील संसाधनांची चोरी

गावाची आर्थिक धूप विविध मार्गाने कशी होते याचा विविध दृष्टिकोनातून अभ्यास झालेला आहे. आर्थिक शोषणाबरोबरच गावाचे भौतिक शोषणही सुरूच आहे. यातून निसर्गाचे लाभलेले लेणेही सुटले नाही. महाराष्ट्रात जवळपास ३८० नद्या आहेत आणि त्यांची लांबी १९२६९ कि. मी. इतकी आहे. या छोट्यामोठ्या नद्यांच्या खोऱ्यात हजारो गावे वसलेली आहेत. याच नद्यांवर शेकडो तलाव, बंधारे आणि धरणे बांधली गेली. देशातील एकूण धरणांच्या ५०% धरणे महाराष्ट्रात झाली असे सांगण्यात येते. यातील पाण्याचा उपयोग शहरवासीयांच्या सुखसोयींसाठी वाढत आहे. शहरांना अशाच धरणातून पाणी पुरविले जाते. धरणात हे पाणी कोठून आले? गाव परिसरावर पडलेले हे पावसाचे पाणी धरणात साठले आणि त्याचा उपयोग शहरांच्या पिण्यासाठी आणि उद्योगासाठी होत आहे. आज महाराष्ट्रात जवळपास एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ७२ शहरे आहेत. २० हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली २४४ शहरे आहेत. या सर्व शहरांना दररोज दरडोई ७० ते १५० लिटर पाणीपुरवठा होतो. हा सर्व पाणीपुरवठा हा धरणांतूनच होतो. काही शहरांना तर बऱ्याच अंतरावरून पाणी आणावे लागते. बंगलोर शहराला १०० कि. मी. अंतरावरून कावेरी नदीवर बांधलेल्या धरणातून पाणी आणले जाते. हैद्राबाद शहरासाठी १३० कि. मी. असलेल्या नदीवरील धरणातून पाणी आणावे लागते. चेन्नईचे पाणी तर २३० कि. मी. असलेल्या धरणातून आणावे लागते. धरणातील पाणी पाइपलाइन टाकून शहरांना पुरविले जात आहे. खेड्यांच्या परिसरांतून या पाइपलाइन शहरात येतात. शहरांना भरगच्च

पाणीपुरवठा होतो. खेड्यांतील लोकांना मात्र उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. गावशिवारातले पाणी धरणात आणि धरणातील पाणी शहरात!

शहरामध्ये भरमसाठ वेगाने घरे बांधली जात आहेत. हाऊसिंग सोसायट्या निर्माण होत आहेत. बिल्डर्सचा धंदा सध्या पहिल्या क्रमांकावर आहे. गेल्या १५-२० वर्षांत जवळपास सर्वच शहरांचा आकार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. औरंगाबाद-सारख्या शहराच्या वाढीचा विचार केला तर त्याचा क्रमांक आशिया खंडात पहिला आहे. महाराष्ट्रात मोठे, मध्यम आणि छोटे असे जवळपास ४००० उद्योग नोंदणीकृत आहेत. नोंदणी न झालेले हजारो उद्योग आहेत. २६७ औद्योगिक वसाहती आहेत. या सर्व शहरी आणि औद्योगिक वापरासाठी लागणारे पाणी एकंदर पाणी वापराच्या आठ टक्के एवढे आहे. हे सर्व उद्योग शहरात असल्यामुळे त्यांना लागणारे पाणी धरणातूनच दिले जाते.

मुंबई, पुणे या शहरांना पाणी पुरविण्यासाठी तानसा, भातसा, वैतरणा, खडकवासला अशी धरणे बांधली गेली. या धरणातील पाण्याचा उपयोग ग्रामीण भागात सिंचनासाठी होतच नाही. बांधकामासाठी लागणारे दगड, माती, वाळू कोठून आणली जाते? खेड्यातल्या नद्यांतील वाळू संपत आलेली आहे. हजारो एकरांवरील मातीचा थर विटा करण्यासाठी संपला आहे. गाव परिसरातील खाणीतून दगड काढला जात आहे आणि हे सर्व बांधकाम साहित्य शहरात चालले आहे. यामुळे नद्या आटल्या आहेत हजारो एकर जमीन ओसाड पडलेली आहे. याचा अल्पसा मोबदला देऊन शहरांना सुंदर करण्याचे काम बिल्डर्स करीत आहेत. सर्व नियम धाब्यावर बसवून हे चालू आहे. शहरात उत्तम फर्निचर बनविले जाते हे खरे. फर्निचरशिवाय श्रीमंतांना आपले दिवाणखाने सजविताच येत नाहीत पण फर्निचरला लागणारे लाकूड कोणत्या शहरात तयार होते? तेही ही खेड्यांतूनच आणावे लागते. यावरून हे लक्षात येईल की खेड्यातील जल, जंगल आणि जमिनीचा नाश करून शहरवासी आपले जीवन फुलवीत आहेत. हे थांबले पाहिजे. महात्मा गांधी एकदा म्हणाले होते, की निसर्ग भरपूर देऊ शकतो, पण हावऱ्या माणसाची हाव भागवू शकत नाही. शहरात निर्माण झालेल्या भोगवादी संस्कृतीने सभोवतालच्या शेकडो नव्हे हजारो गावांना झिजविण्यास सुरुवात केली आहे.. हे थांबले नाही तर शहरे वाढतील त्यातील बकालपणाही वाढेल, पण ग्रामीण भाग नष्ट होईल. शहराने खेड्यांना काहीच दिले नाही असे कोणीही म्हणणार नाही. पण जे दिले त्यापेक्षा कित्येक पटीने परत घेतले, अडवून घेतले, नाडून घेतले.

त्यांच्या अज्ञानाचा फायदा करून घेतला आवळा देऊन कोहळा काढणे म्हणतात ना तशातलाच हा प्रकार आहे. शहराने खेड्यांना आवळा दिला आणि त्याच्या मोबदल्यात भोपळा घेतला. हे थांबले पाहिजे.

खेड्याची सर्वांगानेच धूप होत चालली आहे. ही धूप थांबली नाही तर ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार तर होणारच नाही; उलट गाव हे गुलामांची वस्ती होईल. कुठल्याही लोकशाहीत गुलामगिरीला थारा नसतो. लोकशाहीवरील तो कलंक आहे.

स्वावलंबी, स्वाभिमानी जीवनाच्या आवश्यक गरजा पूर्ण झालेले खेडे ही लोकशाहीची आणि ग्रामराज्याची या देशातील खरी शक्ती आहे. ही शक्ती राज्यकर्त्यांनी, समाजधुरीणांनी, जाणकारांनी ओळखली पाहिजे. यावर वेळीच उपाय झाला नाही तर भारतीय लोकशाहीचा वटवृक्ष केव्हाही उन्मळून पडू शकतो.

❑



# १०. ग्रामराज्य लोकशाहीचा आधार

ब्रिटिशांनी या देशाचे सर्वांत मोठे नुकसान जर कोणते केले असेल तर ते भरभक्कम पायावर उभी असलेली ग्रामरचना मोडीत काढली. दोनशे वर्षांपूर्वी प्रत्येक गाव हे स्वावलंबी होते. एवढेच नव्हे तर ते एक छोटे राज्यच होते. गावांची परंपरा, गावांचे सण, वागण्याचे नियम, चालीरीती, न्यायपद्धती ठरविण्याची प्रत्येक गावाला मुभा होती. जशा आदिवासी आणि मागासलेल्या वर्गांत जातपंचायती आहेत आणि त्या पंचायतीच्या धारणेप्रमाणेच तो समाज आजही वागतो आहे, असे काहीसे स्वरूप गावाचे होते. फरक एवढाच की गावामध्ये अनेक जाती-जमातींचे लोक राहत होते. या सर्वांना एकत्र घेऊन जाणारी त्या गावची पद्धत होती. थोडक्यात सर्वांना लागू पडणारे गावांचे नियम होते. हे नियम तोडणारांना शिक्षा करणारी पंचायत होती. त्यामुळे गावांतील भांडणे, तंटे, शेतीची प्रकरणे, नैतिक-अनैतिक वागणुकीवरची बंधने या पंचायतीच्या मार्गदर्शनाखालीच चालत होती. आर्थिक दृष्ट्याही गाव स्वावलंबी होते. स्वावलंबी गाव हेच या देशाचे वैशिष्ट्य होते. अनेक राजे आले आणि गेले. अनेक सम्राट आपली कारकीर्द गाजवून गेले, पण त्यांपैकी कोणालाही ही ग्रामव्यवस्था तोडता आली नाही. किंबहुना ते तोडू शकले नाहीत. त्यामुळे ग्रामराज्याचा राजेरजवाड्यांवरही वचक होता.

ग्रामरचना आणि व्यवस्था तोडल्याशिवाय या देशात पाय रोवणे कठीण आहे. याची चहाच्या व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या चाणाक्ष इंग्रजांना जाणीव झाली होती. आपले राज्य अबाधित ठेवण्यासाठी म्हणून, त्यांनी ग्रामरचना विस्कळीत करण्याचे घोर पाप केले. याची जाणीव महात्मा गांधींना होती म्हणूनच ते ग्रामस्वराज्याच्या रूपाने

स्वातंत्र्याकडे पाहत होते. गांधींची रामराज्याची कल्पना किंवा विनोबांची अन्त्योदयाची कल्पना ग्रामीण क्षेत्राला पुनर्गठित करण्यासाठीच होती असे मला वाटते.

भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यांच्या सर्वांगीण विकासातच भारतीय लोकशाहीचा आत्मा स्थिर होऊ शकतो याची जाणीव जेवढी गांधी–विनोबांना होती त्याच्या काही अंशाने जरी त्यांच्या नावाने टिळा लावून राज्यारोहण करून घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांना झाली असती तर आजचे गावाचे भयाण स्वरूप केव्हाच संपले असते. गावाच्या विकासापासून शहराकडे विकासाची गंगा गेली असती. आधी पाया बांधला गेला असता आणि मगच विकासाची सुंदर इमारत त्यावर बांधता आली असती. पण गेल्या पन्नास वर्षांत झाले उलटेच! विकासाचा कळस बांधताना पाया मजबूत करण्याचे राजकर्त्यांना भानच राहिले नाही, आणि आताही लाचारीला जन्म देणाऱ्या थातुरमातुर योजना विकासाच्या नावाखाली राबविल्या जात आहेत. शेतकऱ्यांना अनुदान, गरिबांना मोफत घरे, गावासाठी चांगल्या सडका, म्हाताऱ्यांना जगण्यासाठी मदत देऊन ग्रामीण पुनर्रचना होणार आहे का? ही तर विकास करण्यासाठी केलेली केवळ मलमपट्टी आहे. हे मूळ रोगाचे निदान नव्हे.

७३व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण विकासाचे निदान करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण जनता स्वावलंबी, स्वाभिमानी आणि निर्भय व्हावी यासाठी ७३व्या घटनेत बरेच काही आहे. परंतु राजकीय बांडगुळांनी त्यालाही गळती लावण्याचा प्रयत्न चालविला आहे. गावाची झीज थांबविण्यासाठी हा घटनात्मक बदल खूप काही मदत करू शकतो. परंतु त्यासाठी हवे जातीचे!... येरागबाळ्यांनी करण्यासारखे हे काम नाही. सुधारणेसाठी एखादा नियम करणे म्हणजे सुधारणा झाली असे होत नाही. ७३व्या घटना दुरुस्तीत ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार व्हावे म्हणून अनेक गोष्टींचा समावेश केला परंतु प्रत्यक्षात ते घडत नाही, आणि तसे घडवून आणण्याची गावपातळीपासून ते दिल्लीच्या गादीवर बसणाऱ्या राजकर्त्यांची इच्छा नाही. नोकरशाही तर या नियमांना खो देण्यासाठीच सदा सिद्ध आहे.

ग्रामराज्य अधिक बळकट करावयाचे असेल तर गावातील लोकांचा सूर बघूनच राजकर्त्यांनी आपला ताल संभाळला पाहिजे. वरून योजना राबविण्याऐवजी गावाकडून त्या वर पोहचल्या पाहिजेत, पण असे गेल्या पन्नास वर्षांत क्वचितच घडले. डिमांड ड्रिव्हन ज्याला म्हणतात अशा योजनेचा शासनाने कधी विचार केला नाही. गेल्या पन्नास वर्षांत ग्रामीण शोषितांना आणि गरजूंना, स्वाभिमानी आणि स्वावलंबी

बनविणारी महाराष्ट्राने सुरू केलेली रोजगार हमी योजना होती. या योजनेने गावातील अनेक कुटुंबांना सावरले. आधार दिला. पण आता हीच योजना गुत्तेदाराच्या कचाट्यात सापडली आहे. यामुळेही गुत्तेदारांचे चीज होणार आणि गावांची झीज चालूच राहणार. गावाची झीज थांबवायची असेल तर केंद्राकडून किंवा प्रांताकडून गावांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांचे पुनरावलोकन झाले पाहिजे. गावागावात सध्या चालू असलेल्या ग्रामीण विकासाच्या योजनांबद्दल चर्चा घडवून आणली पाहिजे आणि नंतरच त्या योजना अमलात आणल्या पाहिजेत. गावकऱ्यांच्या सहभागाने गावाच्या गरजांचे मूल्यावलोकन व्हावे आणि गावकऱ्यांच्या चिंतनातून, गरजेतून आणि सहभागातून नव्या योजना अवतरल्या तरच ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार होईल. गावाची पदोपदी होणारी झीज थांबेल आमच्या गावांत आमचे सरकार अशी घोषणा गावकरी स्वाभिमानाने देऊ शकतील.

❑



# ११. परस्परावलंबी गाव–स्वावलंबी गाव

विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतातील गावाची संस्कृती वेगळी होती. औद्योगिक क्रांतीनंतर विविध जीवनोपयोगी वस्तूंची निर्मिती मोठ्या प्रमाणात यंत्राव्दारे कारखान्यात होऊ लागली आणि त्याचा परिणाम प्रथम शहरात जाणवला. कारखान्यात होणाऱ्या दैनंदिन गरजा भागविणाऱ्या वस्तू हळूहळू ग्रामीण भागातही पोहचल्या. याचे बरेवाईट परिणाम ग्रामीण भागावर झाले आणि ग्रामीण संस्कृतीमध्ये आहिस्ते कदम बदल होऊ लागला. शहरी संस्कृतीची छाप ग्रामीण भागावर जाणवू लागली. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत ग्रामीण जीवन वेगळे होते. प्रत्येक गाव स्वतंत्र तर होतेच. एकसंध होते. क्वचितच एका गावाचा संबंध दुसऱ्या गावाशी असायचा. तोही पाहुण्यापुरता मर्यादित. प्रत्येक गाव, गावातील कारागीर, शेतकरी, मजूर यांचे जीवन आणि सौख्य शेतीत निर्माण होणाऱ्या अन्नधान्यावर आणि गावात निर्माण होणाऱ्या वस्तूंवर अवलंबून होते.

शेतीचा शोध लागल्यानंतर शेती उत्पादनासाठी लागणारी अवजारे हळूहळू विकसित झाली. औत, नांगर, कोळपे, तिफन, मोगडा, खोरे, इ. इ. चा शोध शेतीविकासाच्या गरजेतूनच लागला. ही सर्व सामुग्री गावातच लाकडापासून तयार होत होती. पण पुढे औद्योगिक क्रांतीमुळे या सर्व वस्तू रेडीमेड फॉर्म मध्ये गावामध्ये पोहचल्या. १९ व्या शतकाच्या अंतापर्यंतचा काळ ग्रामीण भागासाठी वेगळाच होता. गाव शेतीउत्पन्नावर जगत होते. शेतकऱ्यांनी शेत पिकवायचे, कारागिरांनी शेती कसण्यासाठी लागणारी अवजारे तयार करून पुरवायची. शेती नसणाऱ्यांनी शेतीत काम करायचे गावकारागिरांनी शेतीसाठी लागणारी केवळ अवजारेच पुरवायची नाहीत, तर गावकऱ्यांना लागणाऱ्या वस्तूंची निर्मितीही करायची. म्हणजे असे की, सुताराचा

व्यवसाय करणारे शेतकऱ्याला शेती मशागतीसाठी लागणारी अवजारे पुरवीत होते, एवढेच नव्हे तर त्यांच्या घराला लागणारे बांधकाम साहित्य, दरवाजे, खिडक्या, संदूक(पेटी), पाट, पलंग, खुंट्या, पाळणे अशा विविध लाकडी वस्तू तयार करून देत होते. त्या काळी मजुरीची किंमत पैशात केली जात नव्हती. देवाण-घेवाण व्यवहार बहुतेक वेळा वस्तुरूपात व्हायचा. सुताराचेच उदाहरण घ्या. सुताराने शेतकरी कुटुंबाला वरीलप्रमाणे वस्तू पुरवून सहकार्य करायचे आणि त्याच्या मोबदल्यात शेतकऱ्याने त्याच्या कुटुंबाला वर्षभर लागणारे अन्नधान्य पुरवायचे. शेतकरी आणि इतर कारागीर म्हणजे सुतार, धोबी, न्हावी, तेली, तांबोळी, मांग, महार, शिंपी, कुंभार, सोनार, लोहार, चांभार, गवंडी अशा गावकामगारांशी हा व्यवहार क्वचितच पैशाच्या स्वरूपात होत असे. बहुतेक वेळा श्रमाची देवाणघेवाण किंवा व्यवहारातील देवाण-घेवाण वस्तूंच्या रूपात होत होती. म्हणजे गावातील मजूर आणि गावकामगारांना अन्नधान्य पुरविण्याचे काम शेतकऱ्यांकडून होत होते. शेतकऱ्यांना इतर जीवनावश्यक वस्तू पुरविण्याचे काम गावकामगार आणि मजूर यांच्याकडून होत होते. एकमेकांच्या मदतीवरच गाव चालत होते. शेतकरी गावकामगाराच्या मदतीशिवाय आणि गावकामगार शेतकऱ्याच्या मदतीशिवाय एकेकटे जगणं कठीण होतं. गावातील सर्व जाती-जमाती, कारागीर, शेतकरी, मजूर परस्परांवर अवलंबून होते. याचा दुसरा परिणाम असा की गावात जाती, धर्म किंवा इतर कारणांवरून सहसा भांडणे होत नसत. घरगुती आणि संपत्तीच्या भांडणांचा निकालही गावातलीच चार बरी माणसं एकत्र येऊन देत होते.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेता असे लक्षात येते की गावाच्या बहुतांशी गरजा गावातच भागवल्या जात होत्या. गावाच्या मूलभूत गरजा फार थोड्या होत्या. गावातील सांस्कृतिक, धार्मिक आणि मनोरंजनाची जबाबदारीही गावातील ब्राम्हण, गोंधळी, जोगी, गोसावी, जंगम, गुरव हे भागवीत होते. या सर्वांचा परिणाम की काय गाव एकत्र आणि एकजुटीने राहण्याच्या बाजूने होता.

परंतु २०व्या शतकाच्या उत्तरार्धात परिस्थिती हळूहळू बदलली. पाश्चिमात्य देशात लागलेले शोध, औद्योगिक कारखाने भारतातही पोहचले. जीवनावश्यक वस्तू निर्मितीला वेग आला. या सुधारणा, त्या वस्तू आणि सोयी छोट्या-छोट्या शहरात सुद्धा आल्या. याचा परिणाम गावावर होत गेला. ग्रामीण भागाच्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तू शहरात सहज मिळू लागल्या. शहरातून कोणतीही वस्तू विकत आणणे प्रतिष्ठेचे समजले जाऊ लागले. लाकडाची शेतीची अवजारे गेली आणि त्याची जागा लोखंडी अवजारांनी घेतली. शिंप्याची हातशिलाई कमी झाली आणि मशीनचा वापर

कपडे शिवण्यासाठी होऊ लागला. चांभाराचा जोडा मागे पडला आणि मुलायम, सुबक वहाणा कारखान्यात तयार होऊ लागल्या. त्याचा वापर गावपातळीवर होऊ लागला. असेच इतर आवश्यक वस्तूंचेही झाले. गावाला जे पाहिजे होते ते शहरात तयार मिळू लागले. यामुळे हळूहळू गावातील परस्परावलंबित्व संपले. शेतकऱ्याला सुताराची गरज वाटेनाशी झाली. कुंभाराची गरज वाटेनाशी झाली कारण बाजारात ॲल्युमिनियम, पितळ, लोखंडी, तांबे आदी धातूपासून तयार होणाऱ्या घागरी, लोटे, स्वयंपाकाची भांडी मिळू लागले. लोखंडी नांगर, औत, विळे, खुरपे, कुदळीचा वापर शेतकरी आपल्या शेतीच्या कामात सर्रास करू लागला. तयार दागिने मिळू लागले, कपडे मिळू लागले. शेतीमालावर प्रक्रिया करून तयार झालेले अन्नपदार्थ तेल, गूळ, साखर इत्यादी मिळू लागली. याचा व्हायचा तो परिणाम गावावर झाला. शहरातून जीवनावश्यक वस्तू गावात आल्या. त्या सुबक होत्या, टिकावू होत्या आणि केव्हाही विकत मिळणाऱ्या होत्या. त्यामुळे त्या विकत घेण्याचे आकर्षण ग्रामस्थांमध्ये वाढले आणि मग गावकामगारांची गरज भासेनाशी झाली. बार्टर पद्धतीचा व्यवहार संपला. त्याची जागा पैशाच्या व्यवहाराने घेतली. मजुरांच्या, गावकामगारांच्या हातात वस्तूंच्या ऐवजी पैसा पडू लागला. मग तेही शेतकऱ्यांवर अवलंबून न राहता पैसा खर्चून धान्य आणि जीवनावश्यक वस्तू खरेदी करू लागले. एकमेकांच्या मदतीची गरज उरली नाही आणि जो तो स्वतंत्रपणे वागू लागला. अशा रीतीने परस्परावलंबित्व संपले.

या परिस्थितीचा जसा चांगला परिणाम गावावर झाला तसा वाईट परिणामही गावाला भोगावा लागत आहे. आर्थिक स्वातंत्र्यामुळे प्रत्येक कुटुंबाला स्वत:च्या विचाराने वागण्याचे स्वातंत्र्य मिळाले. चार्तुवर्णाची शिडी मोडकळीस आली, आपला परंपरागत व्यवसाय करण्याचे बंधन गावकामगारांवर राहिले नाही. आर्थिक स्वातंत्र्यामुळे भेदभाव निवळत गेला. हे एका दृष्टीने चांगलेच झाले. परंतु याचा दुष्परिणाम गावाला भोगावा लागत आहे. २० व्या शतकातील बदलाचा सामाजिक समता आणि स्वातंत्र्य मिळविण्यावर चांगला परिणाम झाला असला तरी गावची म्हणून जी एकात्म संस्कृती होती ती हळूहळू नष्ट होत आहे. पूर्वी गावाच्या गरजा गावातील कच्च्या मालावर प्रक्रिया करून भागवल्या जात होत्या. शिवारातले लाकूड तोडून शेती अवजारे तसेच घरांची उभारणी होत होती. कुंभार परिसरातील मातीचा वापर करून माठ, रांजन, पणत्या तयार करीत होता. दावे-दोरखंड, वहाणा गावातील उपलब्ध कच्च्या मालातूनच तयार होत होत्या. यामुळे गावातले श्रम गाव स्वावलंबी होण्यास कारणी लागत होते. नव्या गावाच्या उभारणीमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचे तत्त्व कायम ठेवून या पुढच्या काळात गाव स्वावलंबी कसे होईल याचा विचार होणे गरजेचे

आहे. यापूर्वी लिहिलेल्या आठ-दहा लेखांमध्ये गाव कसे झिजत आहे यासंबंधीचे विवेचन केले होते. गावचे परपस्परावलंबित्व उखडून काढण्याचे काम गेल्या पन्नास वर्षांत झाले आहे. याला शासनाची धोरणे, आधुनिक सुधारणा, चंगळवादी प्रवृत्ती ही जशी कारणीभूत आहे. तसेच गावचे सामाजिक मानस तयार करण्याचे काम शिक्षणव्यवस्था आणि समाजसेवक करू शकले नाहीत. यामुळे गावच्या सुखासाठी निर्माण झालेली व्यवस्था गावाला सुखी ठेवू शकली नही.


आज गावागावामध्ये वरचे १०%लोक श्रीमंत आहेत. पण ९०%चे हाल चालूच आहेत. चंगळवादी प्रवृत्ती बोकाळली आहे. आर्थिक कुवत बघून खर्च करण्याची वृत्ती कोणातही दिसत नाही. कमी वेळात कमी श्रमात अधिक पैसा कसा मिळेल याकडेच बहुतेकांचे लक्ष आहे. गावागावात जात-जमातवाद, धर्मवाद यामुळे एकतेत तिढा निर्माण झाला आहे. पक्षीय राजकारणाने त्यात भर घातली आहे. जात, जमात, धर्म, पक्ष या पातळीवर गावागावात गट पडले आहेत. त्यामुळे गाव म्हणून एकत्र विचार करण्याची प्रवृत्ती संपत आली आहे. परस्परावलंबी गाव होते तोपर्यंत गावात एकी होती. एकीचे बळ मोठे आणि फळही चांगले मिळते.

अलीकडच्या काळात अनेक विकास योजना गावासाठी राबविल्या जात असताना सुद्धा गावाची परिस्थिती खंगत चालली आहे. सर्व गरजा उपलब्ध असतानाही त्याचे सुख सर्वांना चाखता येत नाही अशी अवस्था होण्याची कारणे शोधणे गरजेचे आहे. असे झाले नाही तर ७३ व्या घटनादुरुस्तीने अधिकार दिले पण गावाने स्वावलंबी मन तयार केले नाही असे होईल. स्थिरचित्त आणि गरजेपुरती आर्थिक व्यवस्था घराघरात निर्माण झाल्याशिवाय 'मेरे गाँव में मेरा राज' चालणार नाही. स्वत:चे राज्य चालविण्यासाठी स्वावलंबन गरजेचे असते. हे स्वावलंबन पुन्हा गावात यावे यासाठी १०० वर्षांपूर्वी गावातील कामगार, मजूर एकमेकांना कौशल्य पुरवीत होते. शेतकरी गावाला अन्नधान्य पुरवीत होता. आधुनिक कौशल्य गावकामगारात निर्माण केले, प्रक्रिया उद्योग गावातच सुरू झाले, ग्राहक आणि मालक गावातच तयार झाले आणि गरज भागविणाऱ्या वस्तू काही अपवाद वगळता गावातच निर्माण झाल्या तर पुन्हा परस्परावलंबी परंतु स्वावलंबी समाज निर्माण होईल. स्वावलंबन हे ग्रामस्वराज्यासाठी महत्त्वाचे आणि बळकट पाऊल असेल. त्या दिशेने गावाचा प्रवास सुरू झाला तरच गावाचे खंगणे थांबेल. ग्रामस्वराज्य अवतरेल.

❑

# १२. ग्रामपंचायत सदस्यांसाठी प्रशिक्षण बंधनकारक

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच ग्रामीण विकासाच्या योजना आखण्यास सुरवात झाली. १९५२ मध्ये सीडीपी-पूर्ण फार्म १ नावाने ग्रामीण विकासाची पहिली योजना सुरू झाली. शेती, रस्ते, शिक्षण, आरोग्य यासंबंधी या योजनेत ग्रामीण विकासाकडे लक्ष पुरविण्यासाठी बऱ्याच बाबींचा विचार केला होता. परंतु म्हणावा तेवढा या योजनेचा गावाला हातभार लागला नाही. या योजनेचे मूल्यांकन करणारांचे म्हणणे असे की, ही योजना परिणामकारक ठरली नाही. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत जिल्ह्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. 'इन्टेसिव्ह ॲग्रीकल्चर डिस्ट्रिक्ट प्रोग्राम' तसेच 'इन्टेसिव्ह ॲग्रीकल्चर एरिया प्रोग्राम' अशा योजना दुसऱ्या-तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत आखण्यात आल्या. त्याचाही म्हणावा तेवढा फायदा खेड्यासाठी झाला नाही. या योजनेपासून लहान शेतकरी आणि मजूर वंचित राहिले. म्हणून पुढच्या योजनेत म्हणजे १९६९ च्या सुमाराला 'स्मॉल फार्मर डेव्हलपमेंट एजन्सी' आणि 'मार्जिनल फार्मर्स ॲण्ड ॲग्रीकल्चरल लेबर डेव्हलपमेंट एजन्सी' नावाने योजना सुरू करण्यात आल्या. याशिवाय १९७२ ते दोन हजार पर्यंत डीपीएपी, कडा, आयआरडीपी, ड्वाक्रा, ट्रायसेम, एनएसएपी, एनएमबीएस, एनओपीएस, आएवाय अशाही योजना सुरू करून लाभार्थींना वैयक्तिक लाभ देण्याचा प्रयत्न झाला. अगदी अलीकडच्या काळात सामुदायिक विकासावरही भर देण्यात आला. सीआरएसपी, एसजीआरवाय, एसजीएसवाय सारख्या योजना चालू आहेत. तरी म्हणावा असा बदल ग्रामीण अर्थरचनेत झालेला दिसत नाही.


मानवलोक अंबाजोगाई
ग्रामसभा जागृती अभियान
ग्रामसभा - गांव विकासाचा

ग्रामीण विकासाच्या नावाखाली गेल्या ५५ वर्षांत करोडो रुपये खर्च झाले, पण ग्रामीण दारिद्र्य कमी झाल्याचे जाणवत नाही. मूलभूत सुविधा म्हणून गावात रस्ते झाले. त्या रस्त्यांवर दुचाकी-चारचाकी वाहने धावू लागली. वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ झाली. टेलिफोन, मोबाईलसारखी संपर्काची साधने आली. हायब्रीड बियाणे आले. रासायनिक खतांचा भडिमार झाला. जंतुनाशकांची फवारणी शेताशेतावर होऊ लागली. काही काळ शेती उत्पन्न वाढले, पण ग्रामीण दारिद्र्य मात्र कमी झाले नाही. चार-दोन श्रीमंतांची गावात संख्या वाढली एवढेच! पण योजनेचा उपयोग ग्रामीण भागासाठी पूर्णपणे झाला नाही. याचे कारण अशा विकास योजनेची माहिती खेड्यातील सर्वांपर्यंत पोचलीच नाही. गावपातळीवर काम करणारे शासकीय कर्मचारी आणि पाच-दहा टक्के गाव सोडले तर बहुतेक योजनासंबंधी गाव अज्ञानीच राहिले. योजनेचा लाभ मात्र दुसऱ्यांनीच घेतला असावा असे वाटते. नसता मराठवाड्यातील ७८ टक्के उत्पन्नाची मालकी फक्त पाच टक्क्यांच्या हातात राहिली नसती.

विकास योजना आखताना प्रथम मूलभूत सोयी निर्माण करण्यावर शासनाचा भर होता, ते योग्यच होते. मूलभूत सोयींबरोबर ग्रामीण भागातील दरिद्री कुटुंबाच्या मूलभूत गरजा भागाव्यात असाही प्रयत्न विविध विकास योजनेद्वारे झालेला दिसतो. अनेक योजनांमध्ये अनुदानाची सोय होती. या अनुदानाचा उपभोग लाभधारकांना योग्य प्रकारे घेता आला नाही. कारण योजनांचा उद्देश, त्याची माहिती आणि अंमलबजावणीसंबंधी जे शिक्षण लाभधारकांना द्यायला हवे होते, ते दिले गेलेच नाही. ते अज्ञानी राहिले. या अज्ञानातूनच भ्रष्टाचार फोफावला. गरिबांचे नाव सांगून इतरांनीच अशा योजना गिळंकृत केल्याची उदाहरणे गावागावात आजही पाहावयास मिळतात.

ग्रामीण दारिद्र्याचे उच्चाटन करावयाचे असल्यास पहिल्यांदा लोकांच्या गरजा ओळखल्या गेल्या पाहिजेत. नुसत्या गरजा ओळखून भागत नाही तर त्या गरजांच्या पूर्तीसाठी लोकांकडूनच मागणी आली पाहिजे. विकासाच्या शहरी कल्पना योजनेद्वारे लोकांच्या गरजा म्हणून लादल्या गेल्या. ग्रामीण भागाच्या खऱ्या गरजा लक्षात घेऊन जाणकारांनी योजना तयार केल्या नाहीत. लोकांची मागणी लक्षात घेऊन योजनेची आखणी झाली नाही. लोकांशी संवाद करून योजना तयार झाल्या असत्या तर त्यांचा उपयोग झाला असता. माहिती, प्रशिक्षण आणि संवाद या त्रिसूत्रीचा वापर करून यापुढील काळात योजनांची अंमलबजावणी झाली तरच गरजू लोकांपर्यंत योजना

पोहोचतील. एवढेच नव्हे तर त्या योजनांची फळे भविष्यातही गरजूंना चाखावयास मिळतील. त्यांचे दारिद्र्य कायमचे दूर होईल. शोषण थांबेल.

७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामराज्य निर्माण करण्याच्या दृष्टीने काही पावले टाकली आहेत. गावाच्या हातात गावचा कारभार देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ''हमारे गाँव में हमारा राज'' अशा आशयाचे संकेतही अशा घटनाबदलामुळे दिले गेले आहेत. परंतु गावकऱ्यांमध्ये सोडाच, निवडून आलेल्या ग्रामसदस्यांमध्ये सुद्धा यासंबंधीची पूर्ण माहिती नाही. ग्रामपंचायतीचा कारभार कसा चालवावा, त्याचे नियम कोणते, ग्रामपंचायतीला कोणकोणत्या योजनेतून अनुदान मिळू शकते, गावासाठी शासनाने कोणत्या योजना तयार केल्या आहेत इत्यादींसंबंधीची माहिती गावकऱ्यांना तसेच ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या बहुसंख्य सदस्यांना नसते. यासाठी लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणाची योजना शासनाने आखली आहे. ती विविध पातळ्यांवर राबविली जात आहे. ग्रामपंचायतीसंबंधी प्रशिक्षण देणाऱ्या शासकीय संस्था आणि स्वयंसेवी संस्थांकडे हे काम सोपविले आहे. परंतु अनुभव मात्र फारसा उत्साहवर्धक नाही. ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रशिक्षणासाठी त्यांच्या प्रवासखर्चाची आणि दुपारच्या भोजनाची सोय करूनही नाममात्र सभासदच अशा प्रशिक्षणासाठी उपस्थित राहतात. काही गावांचा अनुभव तर यापेक्षाही वाईट आहे. सरपंच आणि ग्रामसेवक अशा प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष करतात. त्याचा परिणाम गावाचे राज्य चालविण्यासाठी जी तयारी ग्रामपंचायत सदस्यांकडून व्हायला पाहिजे ती होत नाही. सारा कारभार सरपंच आणि ग्रामसेवकापुरताच मर्यादित राहतो. बाकीचे सदस्य आणि ग्रामीण जनता अज्ञानी राहते. योजनेचा लाभ त्यांच्यापर्यंत पूर्णपणे पोहोचतच नाही. महिलांनी अशा प्रशिक्षण वर्गात भाग घ्यावा असे वातावरण तर मुळीच निर्माण होत नाही. ग्रामस्वराज्यासाठी ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर अनेक बदल झाले.हे बदल गावाच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावू शकतात. परंतु त्याची माहितीच ग्रामपंचायत सदस्यांना नसेल तर त्याचा उपयोग काय?

म्हणून ग्रामपंचायतीच्या कायद्यात आणखीन काही बदल होणे गरजेचे आहे. विधानसभेवर निवडून गेल्यावर आमदार किंवा मंत्री म्हणून विधानसभेत प्रथम शपथ घ्यावी लागते. ग्रामपंचायतीत निवडून आलेल्या सदस्यांसाठीही ग्रामसभेत शपथ घेण्याची प्रथा सुरू करावी. नंतरच तो ग्रामपंचायतचा सदस्य झाला असे समजले जावे. मात्र अशी शपथ घेण्यापूर्वी निवडून आलेल्या सर्व सदस्यांचे किमान दोन-तीन दिवसांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. अशा प्रशिक्षण वर्गास गैरहजर राहणाऱ्या सदस्यांना

ग्रामपंचायत सदस्य म्हणून मान्यता देऊ नये. प्रशिक्षण पूर्ण केल्यावरच त्याने ग्रामसभेत शपथ घ्यावी आणि त्या दिवसापासून त्याच्या सदस्यत्वाला मान्यता द्यावी. अशा प्रशिक्षणामुळे जाणीव-जागृती निर्माण होईल. सदस्यांना आपले कर्तव्य आणि अधिकार कळतील. ज्यांना हे समजणार नाही ते निवडणुकीच्या फंदात पडणार नाहीत. खरोखरच गावाची सेवा करावयाची आहे असे वाटणारे उमेदवारच निवडणुकीत भाग घेतील.

ग्रामपंचायत कायद्याप्रमाणे विकास योजनेचा लाभ ज्या दारिद्र्यरेषेखालील लाभधारकांना घ्यायचा असतो त्यांच्या नावाला ग्रामसभेत मान्यता देणे अपरिहार्य आहे. तसेच नोव्हेंबर महिन्याच्या ग्रामसभेत वार्षिक अंदाजपत्रक सादर करून त्याची मान्यता घ्यावी लागते, आणि त्याला वरिष्ठांकडूनही रीतसर मान्यता घ्यावी लागते. ही कार्यवाही काटेकोरपणे पाळली जात नाही. बोगस ग्रामसभा दाखवून कार्य पूर्ण केले जाते. नियम पाळले तर आपल्या गावात पुढील वर्षासाठी कोणते उपक्रम राबवायचे याची आखणी लोकांकडून होईल. त्यांचा सहभाग वाढेल. शिवाय व्यवहारात पारदर्शकता येईल. सध्यातरी असे फारसे कोठे घडत नाही. त्यामुळे गावकऱ्यांचे योजना राबविण्यासाठी हवे तेवढे सहकार्यही मिळत नाही. बोगस ग्रामसभा टाळण्यासाठी काही कडक उपाय योजले गेले पाहिजेत. सध्या शासकीय योजना राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेतले जात आहे. ग्रामसभेसाठीही असे सहकार्य घ्यावे. शिवाय प्रत्येक ग्रामसभेत गावासाठी, दरिद्रीनारायणांसाठी, मागासवर्गीयांसाठी सामुदायिक आणि वैयक्तिक राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली गेली पाहिजे. असे झाले तर पाच टक्क्यांच्या हातात ७८ टक्के उत्पन्न राहणार नाही. या उत्पन्नाचा आणि योजनांचा गावातील इतर कुटुंबियांना फायदा होईल. ही काळाची गरज आहे. भ्रष्टाचारामुळे काळ सोकावला आहे. शोषितांची झीज चालूच आहे. त्यांची झीज थांबली तरच खेड्याची झीज थांबेल.

❑



# १३. एक कुटुंब-एक उत्पन्नाचे साधन

मराठवाड्यातील ४८ लाख हेक्टर शेतजमिनीपैकी ४० लाख हेक्टर जमीन पूर्णपणे कोरडवाहू आहे. या जमिनीवर फक्त खरिपाचीच पिके घेतली जातात. ही सर्व पिके पावसावर अवलंबून आहेत. शेतीला पाणी मिळावे म्हणून जायकवाडी, पूर्णा, विष्णुपुरी, ऊर्ध्व पैनगंगा, मांजरा, निम्न तेरणा हे मोठे सिंचन प्रकल्प उभे करण्यात आले. याशिवाय ७४ मध्यम प्रकल्प आणि ६१२ लघु प्रकल्प पूर्ण झाले आहेत. असेच प्रकल्प उर्वरित महाराष्ट्रात बांधण्यात आले आहेत. शेतीला दुबार पीक घेण्यासाठी सिंचन व्यवस्थेची गरज आहे. गेल्या ५० वर्षांत बांधल्या गेलेल्या धरणांचा उपयोग कोरडवाहू शेतीत दोन पिके घेण्यासाठी कोणाला झाला हे पाहिले तर लक्षात येईल की, दोन-पाच टक्के कोरडवाहू शेतकरी याचा फायदा घेऊ शकले. उर्वरित कोरडवाहू शेतकऱ्यांना एका पिकावरच संसार भागविणे भाग पडले. त्यांचे उत्पादन वाढू शकले नाही.

गेल्या ५० वर्षांत शेतीचे विभक्त कुटुंब पद्धतीमुळे खूप तुकडे झाले. मराठवाड्यात १९९१ साली २३.९५ लाख खातेदार होते. त्यांपैकी एक हेक्टरच्या आत शेती असणारांची संख्या ३३.२५ टक्के होती. अशा एकूण ५७.४५ टक्के शेतकऱ्यांकडे मराठवाड्यातील एकूण जमिनीपैकी १४.१७ लाख हेक्टर जमीन होती. असे छोटे शेतकरी आणि भूमिहीन शेतमजूर यांचाच दारिद्र्यरेषेखाली समावेश होता. आजही ग्रामीण भागात ५० टक्के लोक दारिद्र्यरेषेखालचे जीवन जगत आहेत. त्यात कोरडवाहू अल्पभूधारकांची संख्या मोठी आहे. मराठवाड्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या संपत्तीचा काहींनी अभ्यास केला; तेव्हा असे लक्षात आले की, मराठवाड्यातील एकूण उत्पन्नापैकी ५८ टक्के उत्पन्न हे केवळ ०२ टक्के लोकांच्या हातात आहे.

## मराठवाड्यातील उत्पन्नाची टक्केवारी

| अ.क्र. | लोखसंख्येची टक्केवारी | उत्पन्नाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | २ टक्के | ५८ टक्के |
| २ | ३ टक्के | २० टक्के |
| ३ | १० टक्के | १० टक्के |
| ४ | ३५ टक्के (कुटुंब) | ०७ टक्के |
| ५ | २५ टक्के | ०४ टक्के |
| ६ | २५ टक्के (कुटुंब) | ०१ टक्के |

तर २५ टक्के कुटुंबाच्या हातात एकुण उत्पन्नाच्या केवळ ०१ टक्का एवढेच उत्पन्न आहे. केंद्र आणि महाराष्ट्र सरकारच्या ग्रामीण भागासाठी योजिलेल्या योजनांचे हे फलित आहे. प्रश्न असा पडतो की, ग्रामीण विकासाच्या योजनेचा फायदा योग्य लाभधारकाकडे का गेला नाही? याचे प्रथमदर्शनी उत्तर भ्रष्टाचार असेच घ्यावे लागेल. मात्र भ्रष्टाचाराची कारणे शोधताना महत्त्वाचे कारण लक्षात येते ते म्हणजे लाभधारकाचे अज्ञान!

ही शोचनीय अवस्था दूर करण्यासाठी काही उपाय योजावेच लागतील. त्याशिवाय ग्रामीण भागाचे दारिद्र्य लढणार नाही. कारण दारिद्र्यातून दारिद्र्यच निर्माण होते. म्हणून या दरिद्री नारायणांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी गेल्या ५३ वर्षांत अनेक योजना शासनाने आखल्या, पण त्या सर्व तात्पुरत्या होत्या असेच म्हणावे लागेल. दशलक्ष विहीर, एसजीआरवाय सारख्या योजनांचा उपयोग अशा कोरडवाहू शेतकऱ्यांना होईल असे वाटले होते. परंतु योजना अपुऱ्या असल्यामुळे त्याचा फारसा उपयोग शेतकऱ्यांना झालेला दिसत नाही. गरीब शेतकऱ्यांस विहीर दिली पण पाणी उपसण्यासाठी लागणारी साधनसामुग्री म्हणजे मोटार, पाइपलाइन, वीज कनेक्शन मिळाले नाही. त्यामुळे त्याचा उपयोग शेतकऱ्याला तात्काळ घेता आला नाही. तेव्हा शेतीच्या सिंचनासाठी संपूर्ण सोय कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिली तर वर्षभरातच त्याचे दारिद्र्य हटते असे आम्ही अनुभवले आहे.

मानवलोकने प्रयोग म्हणून अशा छोट्या कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी विहिरी खणून दिल्या. त्याच काळात कोटेशन भरले. जादा लागणाऱ्या विजेच्या खांबांची किंमत भरली, इलेक्ट्रिक मोटार विहिरीवर बसवून दिली. पाइपलाइन टाकली एवढेच नव्हे तर एका सिझनला लागणारे बियाणे-खते उसनवार दिले. याचा परिणाम असा

झाला, की तो शेतकरी रब्बीचे पीक घेऊ लागला. त्याचे उत्पन्न दुप्पट झाले आणि बघता–बघता दारिद्र्याची रेषा त्या कुटुंबापासून दूर झाली.

ग्रामीण भागासाठी कोरडवाहू शेतकऱ्यांना कमीत कमी रब्बीच्या सीझनसाठी अर्धा किंवा एक हेक्टरला पाणी मिळावे अशी योजना करणे गरजेचे आहे. तरच तो गावात स्थिरावेल. १०० टक्के शेतकऱ्यांसाठी सिंचनाची सोय होणे अशक्य आहे, पण धरणातील पाण्याच्या वापरावर बंधन आणले आणि रब्बीसाठी मोजून पाणी दिले तर गावातील जास्त कुटुंबांचा फायदा होईल. यामुळे सिंचनक्षेत्र फारसे वाढणार नसले तरीही सिंचनाचा फायदा होणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढेल. पाण्याचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना फायदा होईल. दोन–पाच टक्के कुटुंबांकडे केंद्रित झालेले पाणी इतर अनेक कुटुंबांच्या घरात जाईल. त्यांच्या दारिद्र्याचे दशावतार थांबतील.

कोरडवाहू शेतकऱ्याला दारिद्र्यातून मुक्त करण्यासाठी पाण्याव्यतिरिक्त आणखीन काही उपाय योजावे लागतील. ज्या कोरडवाहू शेतकऱ्यांना पाण्याचा लाभ होणार नाही अशांना शेतीपूरक जोडधंदा करण्यास मदत केली पाहिजे. म्हैस, गाय, शेळीपालन हा उत्पन्नवाढीसाठी पूरकधंदा आहे. ज्यांना हे करणे शक्य होणार नाही त्यांना कुक्कुटपालन, वराहपालन अशा जोडधंद्यांत गुंतविले तर त्यांना कोरडवाहू शेतीव्यतिरिक्त उत्पन्नाचे दुसरे साधन मिळेल. त्यांचे गाव सोडून जाणे थांबेल. कोरडवाहू शेतकऱ्यांनीच शेतीच्या उत्पादनवाढीला हातभार लावला आहे. १००–५० एकराचा मालक असलेल्या शेतकऱ्याच्या शेतातील एकरी सरासरी उत्पन्न आणि कोरडवाहू छोट्या शेतकऱ्याच्या शेतातील एकरी उत्पन्न यात खूपच तफावत आहे. छोट्या शेतकऱ्याचे एकरी उत्पन्न मोठ्या शेतकऱ्यांपेक्षा निश्चित जास्त आहे. अशा कोरडवाहू शेतकऱ्याला रब्बीच्या एका पिकासाठी जास्तीत जास्त एक हेक्टरसाठी पाणी मिळाले किंवा ज्यांना पाणी मिळाणे शक्य नाही त्यांना जोडधंद्यासाठी मदत मिळाली तर त्यांचे संसार सुखाचे होतील. गाव सोडून शहरात जाऊन श्रम विकण्याची त्यांच्यावर पाळी येणार नाही.

शहर असो किंवा खेडेगाव असो एकाच कुटुंबात उत्पन्नाची अनेक साधने एकवटलेली दिसतात. याचाही परिणाम ग्रामीण दारिद्र्य वाढीवर झाला आहे. गावात कोणीतरी एक श्रीमंत असतो. त्याच्याच घरात पिठाची गिरणी किंवा हालर असते. त्याच्याकडे ट्रक किंवा ट्रॅक्टर असतो. त्याचेच किराणा दुकान असते. त्याच्याच घरातला कोणीतरी नोकरीला असतो. शिवाय तोच गावात ग्रामपंचायतीचा सदस्य किंवा

अशाच प्रकारचे पद भूषविणारा असतो. तोच सोसायटीचा चेअरमन असतो. अशी उत्पन्नाची आणि प्रतिष्ठेची अनेक साधने इतर कुटुंबांकडे कशी वळतील याचा विचार झाला पाहिजे. नाहीतर राव तुपाशी आणि गाव उपाशी अशी धोकादायक परिस्थिती निर्माण होईल. त्याची सध्या सुरवात झाली आहे. कोरडवाहू शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. शेतकऱ्याच्या आत्महत्या यातूनच होत आहेत. म्हणून ग्रामपंचायत कायद्यात किंवा घटनेतच बदल करून 'एक कुटुंब-एक उत्पन्नाचे साधन' असे काहीतरी केले पाहिजे. म्हणजे एकाच कुटुंबाच्या हातात केंद्रित झालेली आर्थिक आणि राजकीय सत्ता विकेंद्रित होईल. याचा गावातील अनेक कुटुंबांची संख्या सहज दोन-पाच टक्के आहे. 'एक कुटुंब-एक उत्पन्नाचे साधन' हा न्याय गावात अंमलात आला तर तो दारिद्र्याच्या उंबरठ्यावर असलेल्या ५० टक्के कुटुंबांना जगण्यासाठीचा मोठा आधार होईल. शोषणाची ही प्रक्रिया अनंत काळापासून चालत आलेली आहे. त्यात बदल होणार नाही असे काहींना वाटत असेल तर ते रक्तरंजित क्रांतीला आमंत्रित करीत आहेत असे म्हणावे लागेल. अनेक अंगाने गावाची होणारी झीज उत्पन्नवाढीचे पर्याय देऊन थांबवावी लागेल तरच गावात स्वराज्य येईल.

❑

# १४. बोअरचे पाणी पिण्यासाठी –पावसाचे पाणी शेतीसाठी

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची समस्या दरवर्षीच गंभीर स्वरूप धारण करीत आहे. याची सर्वात जास्त झळ गरीब कुटुंबांनाच सोसावी लागते. पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. सर्वांचा तिच्यावर हक्क आहे. सर्वांचा त्याच्यावर हक्क आहे असे आजपर्यंत कोणी मानतच नव्हते, कारण पाणी मुबलक होते.

भारतात जगाच्या एकूण पाण्याच्या उपलब्धीपैकी ४.९ टक्के पाणी आहे. पूर्वीही पाणी तेवढेच होते आणि आजही तेवढेच आहे. तरीही पिण्याच्या पाण्याची समस्या ग्रामीण भागात दरवर्षी उन्हाळ्यात भेडसावत असते. याचे कारण वाढती लोकसंख्या! १९७५ पर्यंत जेवढी धरणे भारतात बांधली गेली त्यांपैकी निम्मी धरणे महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात धरणाच्या पाण्याचा प्रामुख्याने सिंचनासाठी आणि काही ठिकाणी वीजनिर्मितीसाठी उपयोग केला गेला. धरणाचे पाणी पिण्यासाठी सुध्दा वापरावे लागेल असे कोणाच्याही ध्यानीमनी नव्हते. पण अलीकडच्या काळात धरणातील पाणी शहरवस्तीला त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पुरविण्यात येत आहे.

ग्रामवासीयांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे म्हणून खेड्यांत लाखो बोअर्स घेण्यात आले. अनेक गावांना काही काळ बोअर्सचे पाणी मिळालेदेखील. पण बोअर्सही कोरडे पडू लागले. म्हणून अलीकडच्या काळात टँकरद्वारे ग्रामीण भागाला पाणीपुरवठा होऊ लागला. पण पाणी कमी का पडते? विहिरी कोरड्या का पडतात? बोअर्सचे पाणी कां संपते? याचा मात्र गंभीरपणे विचार अजूनही झालेला दिसत नाही.



पिण्याच्या पाण्याची टंचाई ग्रामीण भागात दिवसेंदिवस वाढत आहे. आणि त्यात सामान्य माणसांना बळी पडावे लागत आहे, गावातील श्रीमंत माणसे पिण्याच्या पाण्याची सोय प्रसंगी स्वखर्चाने करतात त्यांना ते शक्यही आहे. पण सामान्य माणसाचे काय? पाणी आणण्यासाठी अर्धा दिवस खर्च करणे त्यांना परवडणारे नाही. त्यांची मजुरी बुडते. मजुरीच मिळाली नाही तर त्यांनी जगायचे कसे. शहरातील माणसे हुशार आहेत. आपल्या हक्कांसाठी ते आवाज उठवितात. एकत्र येऊन शासनावर दबाव आणतात. त्यांना पाणी मिळते. खेड्याचे चित्र मात्र वेगळे आहे. खेड्यातील माणसे धर्म, जात, अज्ञान, राजकारण, दारिद्र्य यामुळे असंघटित आहेत. ते एकत्र येऊ शकत नाहीत. म्हणून त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी टंचाईच्या काळात वणवण भटकावे लागते. गतवर्षी तर असंख्य तळी, धरणे कोरडी पडली. त्यात जे काही पाणी शिल्लक होते तेही शहरवासीयांना पुरविण्यात आले. मुंबई-पुण्यासारख्या शहरांना टंचाईच्या काळातही १५० ते २०० लिटर पाणी दरडोई दररोज पुरविण्यात आले. दुष्काळी खेड्यांना मात्र ही मर्यादा २० लिटरची ठरविण्यात आली. हा अन्यायच आहे. त्यांच्या शिवारावर पडणारे पाणी त्यांना मिळत नाही. शिवारातून धरणात आलेले पाणी मात्र शहरवासीयांना पुरविले जाते. ही विषमता कोण घालवणार?

ग्रामीण भागातील पाण्याच्या टंचाईची कारणे शोधली तर असे लक्षात येते की, धरणातील पाणी उसासारख्या पिकाला मोठ्या प्रमाणात दिले जात आहे. एक हेक्टर ऊसाला जगविण्यासाठी दोन कोटी पन्नास लाख लिटर पाणी लागते. केळीच्या उत्पादनाला एक कोटी साठ लाख लिटर पाणी हेक्टरी लागते. एक हेक्टर द्राक्ष लागवडीसाठी एक कोटी पन्नास लाख लिटर पाणी लागते. तर मोसंबी, संत्री यासारख्या फळझाडांच्या लागवडीसाठी एक कोटी वीस लाख लिटर पाणी लागते असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. श्रीमंत बागायतदारांनी धरणातले पाणी याच पिकासाठी वळविले. त्यामुळे ग्रामीण भागात इतर पिकांसाठी तर सोडाच पिण्यासाठी पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे.

बोअर करून भूगर्भातील पाणी वर काढण्याचा प्रघात मोठ्या प्रमाणात श्रीमंत शेतकऱ्यांनी अमलात आणला. कायद्याचे बंधन कोणीही पाळले नाही. शासनानेही त्यांना तशी जाणीव करून दिली नाही. अनेक गावांतून १५० फुटांपासून तीनशे फुटांपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी बोअर्स घेतले गेले. पण श्रीमंत शेतकऱ्यांनी या बोअर्सच्या पाचशे फूट परिघाच्या आतच ४०० ते ६०० फूट खोलीचे बोअर घेतले आणि लाखो लिटर पाणी पिकासाठी वापरले. त्यामुळे कमी खोलीचे बोअर कोरडे

पडले. पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ गावकऱ्यांना जाणवू लागला. यावर उपाय शोधण्याचा थातुरमातुर प्रयत्न शासनाने केला. टँकरमुक्तीची घोषणा केली. पाणलोट क्षेत्रविकासाचा कार्यक्रम आखला. मात्र यामुळे ग्रामीण भागास पाण्याची भासणारी टंचाई कमी झाली नाही. शेतावर पडणारे पाणी पाणलोट क्षेत्रविकासामुळे वाहून जाण्याऐवजी जमिनीत मुरले हे खरे पण मुरलेले पाणी लाखो बोअर्स घेऊन श्रीमंत शेतकऱ्यांनी पिकांसाठी वापरले. सर्व शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी पुरविणे समस्या कठीण आहे. पण सर्वांना पिण्यासाठी पाणी पुरविणे अवघड काम नाही.

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ बघता-बघता कमी होऊ शकतो. पण त्यासाठी शासनाने निर्धार केला पाहिजे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संस्था ग्रामीण भागासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणारी यंत्रणा आहे. त्याच्या अधिनियमांचे पालन कडकपणे झाले पाहिजे. पिण्याच्या पाण्याच्या मूळ स्रोताच्या ५०० मीटरच्या परिघात खाजगी बोअर घेण्यावर बंदी आहे. हा नियम तंतोतंत पाळला तर उन्हाळ्यात कोरडे पडणाऱ्या बोअर्सना निश्चित पाणी राहील. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामाने महाराष्ट्रात वेग धरला आहे. त्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बोअर्स घेतले जात आहेत. पाणलोट क्षेत्रात सिंचनासाठी बोअर घेण्यावर बंदी घालावी लागेल. अशी बंदी घातली तर भूगर्भातील पाण्याचा उपसा होणार नाही. यामुळे परिसरातील विहिरींना आणि पिण्याच्या पाण्याच्या बोअर्सना निश्चित पाणी राहील. पिण्याच्या पाण्याची टंचाई बघता-बघता संपेल. महाराष्ट्र शासनाचा यावर होणारा करोडो रुपयांचा खर्च वाचेल.

गरिबी हटावची घोषणा केंद्र शासनाने केली होती. टँकरमुक्त महाराष्ट्राची घोषणा महाराष्ट्र शासनाची होती. आता पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी 'बोअरचे पाणी पिण्यासाठी आणि पावसाचे पाणी शेतासाठी' अशा नव्या घोषणेची गरज आहे. अशी घोषणा अमलात आली तर धरणे, तळी, विहिरी, नदीनाले यात साठलेल्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी होईल आणि बोअरच्या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी होईल. पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ संपेल. सामान्य माणसाचे वणवण भटकणे ही थांबेल.

दुष्काळी भागाचा कायापालट करावयाचा असेल तर त्या परिसराचा पाणलोट क्षेत्र विकास शंभर टक्के झाला पाहिजे. विकसित पाणलोट क्षेत्रात बोअरचे पाणी सिंचनासाठी वापरण्यावर बंदी आणली पाहिजे. अधिक पाणी लागणाऱ्या पिकांपासून शेतकऱ्यांना परावृत्त केले पाहिजे किंवा अशा पिकांच्या लागवडीवर मर्यादा घातली

पाहिजे. गावागावातून रुफ वॉटर हार्वेस्टिंग सारखे घराच्या छतावर पडणारे पाणी गावातील विहिरीत किंवा बोअरमध्ये साठविले पाहिजे. दुष्काळी भागातील साखर कारखाने बंद करून ते इतरत्र हालविले तर त्या भागातील पाणी इतर पिकांकडे वळविले जाईल. पिण्याच्या पाण्याची कदापिही टंचाई भासणार नाही. पाणी ही सर्व प्राणिमात्रांची अत्यावश्यक गरज आहे. ती वरील प्रकारच्या उपायांनी सोडविता येईल.

दोन वर्षांपूर्वी केंद्र शासनाने पाण्याविषयी नवे धोरण ठरविले होते. त्यात उद्योगधंद्यासाठी पाणी देण्याचा क्रमांक दुसरा आहे. शेतीसाठी पाण्याचा क्रमांक तिसरा आहे हे चूक आहे. भारतात शेती उद्योगच मोठा आहे. त्याला दुसऱ्या क्रमांकावर ठेवले पाहिजे. महाराष्ट्र शासनाने देखील आपली जलनीती ठरवताना अशी चूक केली होती. नंतर ती दुरुस्त करून शेतीच्या पाण्याची गरज दुसऱ्या क्रमांकावर आणली हे बरे झाले. पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा म्हणून पाणी सोसायट्या करण्यावर त्या धोरणात भर दिला आहे. त्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी झाली तर छोट्या शेतकऱ्यांना देखील सिंचनासाठी पाणी मिळू शकेल. पाणी ऊसाकडून इतर पिकांकडे वळविले तर अन्नधान्य उत्पादनात वाढ होईल आणि पिण्याच्या पाण्याचा दुष्काळही संपेल. दुसऱ्या जलसिंचन आयोगाच्या शिफारशी शासनाने मान्य कराव्यात. त्यातच शासनाचा आणि शेतकऱ्यांचा फायदा आहे.

❑



# १५. शेतीच्या उत्पादन वाढीसाठी

देश स्वतंत्र झाल्यानंतर अनेक प्रश्नांना देशाला सामोरे जावे लागले. लोकसंख्या आणि अन्नधान्याची टंचाई या समस्यांना तोंड द्यावे लागले. १९५० च्या सुमाराला लोकसंख्या सुमारे ३५ कोटी होती आणि अन्नधान्याचे उत्पादन ५० दशलक्ष टन एवढे होते. पुढे लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली. शेती उत्पादनाने मात्र कासवाची चाल धरली. १९६५-७० च्या सुमारास अन्नधान्याची तीव्र टंचाई देशात निर्माण झाली. भूकबळी टाळण्यासाठी नाइलाजाने परदेशातून धान्य आणावे लागले. भारताने इच्छा नसतानाही अमेरिकेशी या संबंधीचा करार केला. पीएल फोर एटी या नावाने तो करार प्रसिद्ध आहे. या कराराप्रमाणे अमेरिकेतून लाखो टन गहू भारतात आयात झाला. डुकरांना चारावयाचा गहू अमेरिकेने भारताला दिला, अशी त्यावेळी टीकाही झाली. पण त्या गव्हाने भारताची भूक भागविली एवढे मात्र खरे. १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्राची अन्नधान्याची परिस्थिती खूपच नाजूक होती. हाताला काम द्या आणि पोटाला अन्न द्या अशी घोषणा देत विरोधी पक्षांनी खेड्यांतील लाखो लोकांना रस्त्यावर आणले. या सर्व परिस्थितीचा शासनाला विचार करणे भागच होते तेव्हापासून अन्नधान्याच्या वाढीव उत्पादनासाठी शासन स्तरावर विशेष प्रयत्न सुरू झाले.

१९६५-६६ च्या सुमारालाच अधिक उत्पादन देणारे हायब्रीड ज्वारीचे बियाणे बाजारात आले. त्या बियाण्यांचा पदर धरून रासायनिक खते आली आणि बघता-बघता देशाचे धान्य उत्पादन वाढले. १९९९-२००० च्या सुमाराला शेती उत्पादनाने उच्चांक गाठला. २०० दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन शेतकऱ्याने केले. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला.

उत्पादन वाढले पण त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. उलट शेतकरी परावलंबी बनला. ५० वर्षांपूर्वी हायब्रीड बियाणे आणि रासायनिक खताचा उपयोग उत्पादन वाढीसाठी शेतकरी करीतच नव्हता. शेतात पिकणारे बियाणे निवडून चांगल्या बियाण्यांचे तो जतन करीत होता आणि त्याचीच पेरणी करीत होता. हे सर्व बियाणे सरळ जातीचे (स्ट्रेट व्हरायटी) होते. त्यामुळे बाजारातून किंवा दुकानातून बियाणे खरेदी करण्याची वेळ त्यांच्यावर येत नव्हती. खताचेही तसेच होते. शेणखत उकिरड्यावर पडायचे. पालापाचोळा त्यावर पडायचा. राख, मल–मूत्र उकिरड्यावर टाकले जायचे. एवढेच नव्हे तर सांडपाणी आणि धुतलेल्या भांड्याकुंड्यांचे पाणीही उकिरड्यातच जमा व्हायचे. घर तेथे उकिरडा अशीच जवळपास परिस्थिती होती. वर्षभर साठलेल्या उकिरड्यातील खत शेतकरी उन्हाळ्यात शेतावर नेऊन पसरीत होता. यालाच अलीकडच्या काळात सेंद्रिय खत म्हणतात. यामुळे खतावर देखील त्याचा फारसा खर्च होत नव्हताच.

पण काळ बदलला. निरनिराळ्या कंपन्यांनी हायब्रीड बियाणे तयार केले. रासायनिक खते तयार केली. शहरातून आणि खेड्यातून खत–बियाणे विक्रीची हजारो दुकाने सुरू झाली. शेतकऱ्यांत त्याचे आकर्षण वाढले. त्याचे उत्पादनही वाढले. त्यामुळे उकिरड्यावरील सेंद्रिय खत आणि परंपरागत बियाण्यांचा त्याला विसर पडला. हायब्रीड बियाणे आणि रासायनिक खताकडे त्याचा कल वाढला. या आधुनिक खत बियाण्यांबरोबरच पिकावर नवनवे रोग पडले. त्यापासून पिकांची नासाडी होऊ नये म्हणून कीटकनाशकांचा प्रसार आणि उपयोग वाढला. या बरोबर शेतकऱ्याचा खर्च वाढला. आधुनिक बियाणे वापरूनही उत्पादन घटू लागले. शेती परवडेनाशी झाली. पण दुसरा उद्योग करणे त्याला शक्य नव्हते. शेतातील नुकसान भरून काढण्यासाठी सावकार आणि बँकेच्या कर्जाचा त्याने आधार घेतला. पण त्यातूनही तो वर आला नाही. ऊस, केळी, द्राक्ष, बागायती शेती सोडली तर ९० टक्के शेतकरी कर्जाच्या भोवऱ्यात अडकलेला आहे. तो भरपूर शरीरश्रम करतो. पण त्याचा योग्य मोबदला त्याला मिळत नाही. शासनाच्या शेती विकासाच्या योजनांचा वापर करूनही तो कर्जबाजारीच राहिला आहे. यामुळेच आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. शेतीसंबंधीची शासनाची चुकीची धोरणे, बियाणे, खताचे, कीटकनाशकांचे झालेले केंद्रीकरण याचा त्याच्या शेतीवर अनिष्ट परिणाम होत आहे. म्हणून आता रासायनिक खतामुळे शेतीत भरपूर उत्पादन वाढेल आणि देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी होईल असे छातीठोकपणे कोणीही सांगू शकत नाही. उलट एकविसाव्या शतकाच्या

सुरुवातीपासूनच शेतीतील उत्पादन घटण्यास सुरुवात झाली आहे. हरितक्रांती, धवलक्रांती झाली आणि संपलीही. शेतकरी मात्र कर्जातून मुक्त नाही.

शेतीचे उत्पादन वाढवायचे असेल तर छोट्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव दिला गेला पाहिजे. एवढ्यावरच थांबून चालणार नाही. सध्या देशातील एकूण जमिनीपैकी केवळ ४९ टक्के जमीनच अन्नधान्य उत्पादन करू शकते. ५१ टक्के जमीन ओसाड आणि बिगर उत्पादित आहे. उत्पादित जमिनीवर फळबागा फुलविण्यासाठी सरकार प्रोत्साहन देत आहे. यामुळे फळांच्या बाबतीत देश स्वावलंबी झाला पण अन्नधान्याचे उत्पादन मात्र घटत आहे. ओसाड आणि पडीक जमिनीचा वापर फळझाडांच्या लागवडीसाठी केला आणि मूळ एकूण ४९ टक्के जमिनीवर शेती उत्पादन वाढविले तर हा प्रश्न सुटू शकेल असे वाटते.

नवनव्या रोगांचा प्रादुर्भाव होण्यामागेही काही कारणे आहेत. रशिया आणि अमेरिकेच्या मोनोक्रॉपींग उत्पादन पद्धतीची आपण नक्कल केली. एकच एक प्रकारचे पीक शेतात घेतले जाऊ लागले. त्यामुळेही असे घडले असेल असे जाणकारांना वाटते. पूर्वीच्या आपल्या शेतीमध्ये शेतकरी 'इरवाड' पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर करीत होता. त्यामुळे एका शेतावर एकाच वेळी विविध प्रकारची पिके कमी जास्त प्रमाणात घेतली जात होती. रोगराईचा प्रादुर्भाव थांबविण्यासाठी त्याचा उपयोग होत असे. ही पद्धत पुन्हा आणली गेली पाहिजे. गव्हामध्ये मोहरी, गाजराचे पीक, करडईचे पट्टे पेरले जायचे. काही तज्ज्ञांचे मत असे आहे की, यामुळे पिकावर येणाऱ्या रोगांना प्रतिकार होत असे. ही पद्धत पुन्हा सुरू झाली पाहिजे. याचा दुसरा परिणाम असा की एकच एक पीक पेरल्यामुळे मोसम चांगला नसेल तर पीक उत्पादन घटते. शेतकरी तोट्यात योतो. त्याच्या हाती काहीच लागत नाही. इरवाड पद्धतीमुळे एक पीक गेले तरी दुसरे पीक हाती लागण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे तोट्याचे प्रमाण घटते.

भारतातील शेतीचा कणा अल्पभूधारक शेतकरी आणि छोटे कोरडवाहू शेतकऱ्यांनीच मजबूत ठेवला आहे मात्र अमेरिका, रशियाच्या शेतीपद्धतीने भाळलेले तज्ज्ञ छोटी शेती परवडत नाही असा आक्रोश करीत आहेत. छोट्या शेतकऱ्यांची शेती एकत्र करावी आणि कॉर्पोरेट पद्धतीने तिचा वापर करावा असाही प्रचार मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे काही काळ छोटा शेतकरी सुखात राहील. पण लांब पल्ल्याचा विचार केला तर तो आपले स्वामित्व आणि स्वाभिमान गमावून बसेल. भारतीय शेतीतील छोट्या शेतकऱ्यांचे बळ संपले तर पुन्हा नवीन जहागीरदार, सरंजामदार आणि

भांडवलदार तयार होतील. सामान्य माणसाला आणि छोट्या शेतकऱ्याला मात्र गुलामाचे जिणे जगावे लागेल. लोकशाहीमध्ये गुलामगिरीच्या संकल्पनेला थारा दिला जात नसतो. भारतीय लोकशाहीला स्वाभिमानी मतदारांची लोकशाही हवी आहे की गुलाम मतदारांची लोकशाही हवी आहे याचा विचार आजपासूनच करावा लागेल.

❑

# १६. गावचा धर्म-शेजारधर्म

शेतीचा शोध लागला आणि माणसाचे भटकणे थांबले. अन्नाच्या शोधासाठी तो भटकत होता. कंदमुळे खाऊन तो जगत होता. त्याच्या आयुष्यात स्थिरता नव्हतीच. पण शेतीतून अन्नाची निर्मिती करण्याचे तंत्र त्याला कळले. शेतीतून निर्माण होणाऱ्या अन्नातून जगणे शक्य आहे याचा त्याला विश्वास वाटला. त्याच शेतीतून पुन्हा-पुन्हा वेगवेगळ्या प्रकारचे अन्नधान्य तो निर्माण करू लागला. योग्य जागा आणि जमिनी पाहून त्यांच्या टोळ्या स्थिरावल्या आणि त्यातूनच वाड्या-वस्त्या उदयास आल्या. गावाचा जन्म झाला. हळूहळू शेती करण्याची आणि समूहजीवन जगण्याची वेगळी संस्कृती जन्माला आली. शेतीचे तंत्र सुधारत गेले. शेती सुधारण्यासाठी नवनव्या अवजारांचा शोध लागला. त्यातूनच अवजारे तयार करणारे, त्या अवजारांचा वापर करणारे तसेच समाजजीवन सुसह्य व्हावे म्हणून जीवन उपयोगी वस्तू तयार करणारांचे वेगवेगळे गट किंवा वर्ग निर्माण झाले. कदाचित जातींचा जन्म याच प्रक्रियेतून झाला असावा किंवा वर्गही जन्माला आले असावेत.

जात कशी आणि केव्हा निर्माण झाली? धर्म कसा उदयाला आला याचे अनेक तज्ज्ञांनी आणि संशोधकांनी अनेक अंदाज बांधले आहेत. हजारो वर्षांपूर्वी स्थिर झालेल्या खेड्यांतून मात्र जाती-धर्म-वर्ग-वर्ण यांचा समुदाय आपापल्या पायरीने सर्व व्यवहार सांभाळून एकत्र नांदत होता. खेडं म्हणून ते एक होतं. १७ व्या शतकाच्या अखेरीस पाश्चिमात्य देशात औद्योगिक क्रांती झाली. त्या क्रांतीचा परिणाम भारतातही सर्वत्र जाणवू लागला. ब्रिटिशांच्या भारतावरील आधिपत्यामुळे देखील औद्योगिक क्रांतीला भारतात वेग आला. याचेही परिणाम खेड्यापाड्यावर जाणवू लागले होतेच.



स्वातंत्र्यानंतर मात्र आधुनिक संस्कृतीचा म्हणजे पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव ग्रामीण भागात वाढत गेला. आज असंख्य खेडी आधुनिकतेच्या प्रभावाखाली आपले दैनंदिन जीवन जगत आहेत. शिक्षण, आरोग्याच्या प्रश्नांवर गावागावातून जाणिवा निर्माण झाल्या आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावही गावातील तरुण वर्गात नवी जाणीव निर्माण करीत आहे. हे जरी खरे असले तरी आजच्या विज्ञानयुगातही खेड्यातील-जाती-धर्मासंबंधीची तीव्र जाणीव कमी झालेली दिसत नाही. धर्मांधता आणि जातीयवाद यांनी खेड्यातील माणुसकीच्या संस्कृतीला वेढा घातला आहे. विज्ञानामुळे, शिक्षणाच्या प्रसारामुळे मनाची विशालता वाढण्याऐवजी ग्रामीण भागाचीही मने कोती होताहेत की काय असे वाटण्याइतपत परिस्थिती बदलली आहे.

खेड्यातला खरा धर्म काय होता? हिंदू की मुसलमान? ख्रिश्चन की पारसी? या प्रश्नांचे उत्तर भूकंपभागातल्या खेड्यातील एका शेतकऱ्याने फार चांगले दिल्याचे मला आठवते. १९९३ च्या किल्लारी भूकंपात काही परदेशी पाहुण्यांना घेऊन भूकंपाची अवस्था दाखविण्यासाठी खेड्या-खेड्यातून आम्ही फिरत होतो. एका खेड्यात त्या परदेशी पाहुण्यांनी गंमत म्हणून त्या गावकऱ्याला प्रश्न विचारला. तुमच्या खेड्याचा धर्म काय! आणि त्या शेतकऱ्यांने पटकन उत्तर दिले, 'आमच्या खेड्याचा धर्म "शेजार धर्म". ग्रामीण संस्कृतीतील खऱ्या धर्माची ओळख त्या शेतकऱ्याच्या तोंडून मला आणि परदेशी पाहुण्यांनाही त्या दिवशी झाली. परंतु बदलत्या परिस्थितीत ही ओळख पुसट होत चालली आहे की काय अशी शंका माझ्या मनात सतत डोकावतं आहे.

शिक्षणाचा गावागावातून झालेला प्रसार माहिती मिळविण्याची सोय आणि संपर्काच्या वाढत्या साधनांमुळे जातिधर्माच्या भावना पुसट होण्याऐवजी ग्रामीण भागात त्या अधिक तीव्र होत चालल्या आहेत. शेजारधर्म हाच आमच्या गावाचा धर्म असे मानणारे मन संपुष्टात येऊ लागले आहे. मी अमुक जातीचा, तो तमुक जातीचा असा जातीचा अहंकार फुत्कार टाकीत आहे. अल्पसंख्याक, बहुसंख्याक, ओबीसी, एस.टी./एन.टी., दलित, हिंदू, मुसलमान अशा जातिधर्माच्या भावना बळावत आहेत. गटा-तटांना खेड्यातूनही चालना मिळत आहे.

एक म्हातारा म्हणाला, आमच्या लहानपणी असे नव्हते. मुसलमानांचे डोले बसले की आम्ही धुल्ला खेळायला जायचो. डोल्यांपुढे नाचायचो. डोल्याला तेल वाहायचो. मुसलमानांचा सण गावाचा सण होता. हिंदूंची दिवाळी गावाची दिवाळी होती. बैलांचा पोळा सर्वांसाठी होता. पण अलीकडे हे बदलले. मी विचारलं असे का झाले? तेव्हा पटक्याखालचे डोके हलले अन् त्या म्हाताऱ्यानं पटकन उत्तर दिले,

''ईलेक्सनमुळे''. स्वतंत्र झाल्या-झाल्या गावात इलेक्शन झाली. तेव्हा आम्ही कॉंग्रेसला मते दिली. कॉंग्रेस सर्वांचा पक्ष होता. जात-धर्म अशी काही भानगडच नव्हती. कॉंग्रेस म्हणजे कॉंग्रेस. पण अलीकडे जातीचेच पक्ष झाले. धोरणावर कुणीच चालत नाही. त्या वृद्धाचे म्हणणे तेथे जमलेल्या चारचौघांना पटत होते.

काही बुद्धिवादी आणि वरच्या वर्गातल्या मंडळीचे म्हणणे असे की, आरक्षणामुळे सुद्धा गावागावातून तट-गट झालेत. कशामुळे काय झाले हा संशोधनाचा विषय आहे. एवढे मात्र खरे की, शेजारधर्म पाळणारे गाव आता जाती-जाती मध्ये, धर्मा-धर्मामध्ये, पक्षा-पक्षामध्ये विभागले गेले आहे. गावाबाहेरचे आणि गावातले यातले अंतर कमी होत असतानाच जाती-धर्माचे हे नवे कंगोरे गावाला विकसित करू शकतील काय याचा विचार करण्याची वेळ आली आहे. गावातील शेजारधर्म हा माणुसकीवर आधारलेला होता. दोऱ्यामुळे जसे माळेचे मणी गुंफलेले असतात. छोटे-छोटे मणी माळेची शोभा वाढवितात तशी शोभा शेजारधर्मामुळे गावाला होती. धर्म, जात भिन्न असली तरी माणुसकी मात्र सर्वांच्या ठायी होती. ही माणुसकी आता अस्तंगत होत चालली आहे.

खेडेगावातील शोषणाचे मोठे हत्यार असलेला चातुर्वर्ण्य गेल्या काही दशकांत संपत आला आहे, ही चांगली गोष्ट आहे. चातुर्वर्ण्यातील शिल्लक असलेले काही अवयव नामशेष झालेच पाहिजे हे आता सर्वांनाच पटत आहे. पण हे होत असताना माणुसकीची शिकवण देणारी शेजारधर्माची संस्कृती संपुष्टात आली तर गावाचे 'गावपण' संपायला वेळ लागणार नाही. दुर्दैवाने आज ते घडत आहे. पूर्वी गावात वेशीतले आणि वेशीबाहेरचे असे दोन भाग होते. आता त्यात भर पडत आहे. जातिधर्माच्या अनेक वेशी निर्माण होत आहेत. याला राजकारण्यांनी सुरू केलेला जातीयवाद कारणीभूत आहे. वैयक्तिक आणि पक्षीय स्वार्थी राजकारणी कारण नसताना जातीचा अहंकार फुलविण्याचे नीच कर्म करत आहेत. शेजारधर्माचा संस्कार त्यामुळेच पुसट होऊन गावात सदैव अस्थिरता पसरविण्यास सुरवात झाली आहे.

शिक्षणाचा प्रसार खेड्यापर्यंत पोहचला हे चांगलेच झाले. परंतु शिक्षणाचा संस्कार मात्र खेड्यापर्यंत पोचू शकला नाही. शहरात जे असते ते चांगलेच असते, अनुकरणप्रिय असते असा समज खेडेगावातील लोकांमध्ये पसरला. शहरात क्वचितच एकत्र कुटुंब पद्धती दिसते. शिक्षण झाले, लग्न झाले, नोकरी लागली की नवराबायको आई-वडिलांपासून विभक्त होतात. हा विभक्तपणाचा लाजिरवाणा प्रकार पाश्चात्य संस्कृतीचाच परिणाम आहे. पण पाश्चात्त्य जगात जे-जे घडते ते-ते अनुकरणीय असते असा बुद्धिजीवींनी समज करून घेतला आणि या समजानेच भारतातील माणुसकीच्या

संस्कृतीला छेद बसला. एकत्र कुटुंब पद्धती ही भारतीयांची शान आहे असे आजही मला वाटते. ज्या घरात आजोबा आणि नातवंडे याचे नाते पक्के आहे त्यालाच आपण भारतीय कुटुंब म्हणावे असे मला वाटते. पण या प्रथेला बुद्धिवंतांनी छेद दिला नि त्याचे लोण खेड्यापाड्यात पसरले. त्यामुळे खेड्याचा शेजारधर्म तर सोडाच, पण कुटुंबात माणुसकीने वागण्याचाही धर्म विघुरला. तरुण शिकले, नोकरीला लागले आणि स्वतंत्र कुटुंबाचं अस्तित्व त्याला प्राप्त झाले. यातूनच आपपर भाव निर्माण झाला. नोकरीनिमित्ताने मुले विखुरली तरी नाती एकात्म राहवीत. सण, कुळाचार, वाढदिवस इ. निमित्ताने एकमेकांची नाती जपणे महत्त्वाचे. नव्या अर्थाने एकत्र कुटुंबाची कल्पना काळासोबत निर्माण करता येते. ज्यात वयस्कांची, लहानांची सुरक्षितता, भावंडांना एकमेकांची मदत, आधार मिळतो.

शेजारधर्माचे काही अंश आजही ग्रामीण भागात दिसतात. शेजारधर्म हा सर्व धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे. पण शहरामधून कोणी धर्ममार्तंड, कोणी पाद्री, कोणी मुल्ला-मौलवी धर्म प्रचारासाठी खेड्यात शिरले. त्यांनीच जातीमध्ये अहंकार निर्माण केला. त्यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी जाती आणि धार्मिक विद्वेष पसरविला. यात तेल घातले राजकीय कार्यकर्त्यांनी आणि पुढाऱ्यांनी. कारण कर्तबगारी नसलेल्यांना जातीचं राजकारण करून लवकर पुढारीपण मिळविता येतं. स्वातंत्र्यपूर्व काळात संपूर्ण हयात चळवळीत घालविल्यानंतर, परकीय शासनाचा छळ सहन केल्यानंतर, यातना-वेदना भोगल्यानंतर नेतृत्व प्राप्त होत होते. ते नेतृत्व जाती-धर्म-पंथ यांच्या पलीकडे जाऊन समाजाचा आणि देशाचा विचार करणारे होते. सध्या मात्र उलट प्रवाह सुरू झाला आहे. देशाचा विचार सोडाच गावाचाही फारसा कोणी विचार करीत नाही. देवाचं नाव आणि दर्शन स्वहितासाठी अनेकजण घेतात. तसा जातीचा उपयोग नेतागिरी करण्यासाठी होत चालला आहे. याचाच कळत-नकळत परिणाम ग्रामीण भागातील शेजारधर्मावर होत आहे. हा धर्म संपला तर "एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ" हे खेड्याचं ब्रीद संपुष्टात येईल. ग्रामीण जीवनातला निरामय आनंद लयाला जाईल. आज हे सुरू झाले आहे याची खंत आपण सर्व बाळगणार ना?

❑



# १७. एकत्र कुटुंब-सुखी कुटुंब

खेड्यातील शेजारधर्म अधुनिकतेच्या वावटळीमुळे संपुष्टात येत आहे. तसेच खेड्यातील कुटुंबसंस्था देखील लयाला जाण्याच्या मार्गावर आहे. कुटुंब म्हणजे पति-पत्नी आणि त्यांची मुले अशी व्याख्या आजच्या काळात सर्वांनाच मान्य दिसते, पण ग्रामीण कुटुंबाचे स्वरूप काही वेगळेच होते. कुटुंबात आई-वडील, भावंडे, आजी-आजोबा, नातवंडे-पतवंडे या सर्वांना स्थान होते. घरातील माणसांची जादा संख्या हे कुटुंबाचे वैभव होते. वडील आणि मुलगा यांच्यमध्ये जेवढा जिव्हाळा असे त्यापेक्षा कितीतरी अधिक जिव्हाळा आजी-आजोबा आणि नातवंडांच्या नात्यात होता. घरातील अशा वृद्धांच्या मदतीला नातू-पणतू धावून जात. आजी-आजोबा नातू पणतूंचे लाड पुरवीत आणि नातू-पणतू आजोबा-आजीची छोटी-मोठी कामे करीत असत. मला आठवतं, २० वर्षांपूर्वी मानवलोकने मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने घेतले होते. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना पाच-सहा दिवस रुग्णालयातच राहावे लागे. औषधपाण्याची काळजी डॉक्टर्स आणि परिचारिका घेत. परंतु इतर काळजीसाठी घरातले कोणीतरी रुग्णाजवळ असणे गरजेचे होते. त्या शिबिरात १००-१२५ रुग्णांवर शस्त्रक्रिया झाल्या. सर्व रुग्ण ६०-६५ वयाचे आणि ग्रामीण भागातले. रुग्णांचे नातेवाईक म्हणून बहुसंख्य रुग्णांजवळ काळजी घेण्यासाठी ८-१० वर्षांची नातवंडे होती. मुला-मुलींपेक्षाही आजी-आजोबांना नातवंडांचा लळा जास्त असतो हे मला त्यावेळी जाणवले. आज हे दृष्य जरी काही कुटुंबांतून दिसत असले तरी येणाऱ्या काही काळात नातवंडे आणि आजोबांनी भरलेले घर दिसेल की नाही याची शंका आहे.

शिक्षणाच्या प्रभावामुळे माणसे स्वत:ची मते तयार करू लागली. ती मते मांडली जाऊ लागली. मतस्वातंत्र्याच्या नावाखाली आपण त्याचा उदो-उदोही केला. पण अनेक वेळा याला विकृत वळण लागले. अनेक घरांतून घरात सासू-सुनेचे, वडील-मुलांचे मतभेद सुरू झाले. यातून ग्रामीण भागातील एकत्र कुटुंबपद्धती अडचणीत आली. याशिवाय संपत्तीचे प्रश्न, शेतीचे प्रश्न यांचीही या अडचणीत भर पडली. यामुळे एकत्र कुटुंबपध्दतीचा प्रवास लयाकडे जाऊ लागला. पूर्वीच्या काळीही घरातल्या प्रत्येकाला स्वत:ची मते होती. परंतु एकमेकांच्या मताचा आदर करण्याची प्रथा सर्वच कुटुंबांतून पाळली जात होती. त्यामुळे मतभेद असताना देखील घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीचे मत महत्त्वाचे समजले जात होते. त्या मताचा आदर केला जात होता. वडीलधारी व्यक्तीही लहानांची काही मते स्वीकारीत, आणि तसे वागण्याचा प्रयत्न घरातील सर्वच लहानथोर करीत होते. लोकशाहीमध्ये सुद्धा स्वत:च्या मताएवढेच दुसऱ्याच्या मताचा आदर करणे अपेक्षित आहे. पण लोकशाहीचा हा संस्कार आणखीन तरी फारसा रुजलेला दिसत नाही. मतस्वातंत्र्याच्या नावाखाली चुकीच्या कल्पना आणि स्वमताच्या अनाठायी आग्रहामुळे एकत्र कुटुंबपद्धतीचा समन्वय बिघडत आहे.

एकत्र कुटुंबपद्धतीचे फायदे अनेक. त्याचा सगळ्यात मोठा आधार घरातील वृद्धांना होता. एकत्र कुटुंबपद्धतीमुळेच घरातील वृद्धांना संरक्षण होते. त्यांचे जीवन समाधानी होते. बालकांप्रमाणेच, जर्जर झालेल्या वृद्धांची काळजी घरातील मंडळी घेत होती. आजही तुरळक कुटुंबांत वृद्ध मंडळी सुखी आहेत. पण हळूहळू एकत्र कुटुंबपद्धतीचा ऱ्हास होत चालल्यामुळे वृद्धांवर मोठे संकटच कोसळत आहे.

आरोग्याच्या सुखसोयींमुळे आयुर्मान वाढले. वाढत्या आयुर्मानामुळे वृद्धांची संख्या वाढत आहे. २० व्या शतकाच्या पहिल्या एक दोन दशकांत भारतीयांचे आयुष्यमान २२-२३ वर्षेएवढेच होते. पण विसाव्या शतकाच्या पहिल्या पाच दशकांनंतर ही अवस्था सुधारली. आयुष्यमान ३२ वर्षांच्या पुढे सरकले. १९७५ नंतर भारतीयांची आयुष्यमर्यादा ५० च्या पुढे गेली आणि २००१ सालानंतर या आयुष्यमर्यादेने त्रेसष्ठी गाठली. याचाच अर्थ असा होतो, की गेल्या ५० वर्षांत वृद्धांची संख्या वाढली. परंतु पाश्चात्य संस्कृतीतील विभक्त कुटुंबपद्धतीची ग्रामीण कुटुंबांना देखील चटक लागल्यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीचे विघटन सुरू झाले. त्याचा परिणाम वृद्धांवर झालेला दिसतो. आज जवळपास ८० टक्के वृद्ध ग्रामीण भागात राहतात. त्यांच्यपैकी अनेकांना कोणतीही सामाजिक सुरक्षा नाही. त्यांना सुरक्षा मिळावी म्हणून

पुन्हा पाश्चात्यांचेच अनुकरण देशात सुरू आहे. त्यांच्यासाठी वृद्धाश्रम सुरू केले आहेत. वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे. भारतीय संस्कृतीचा वारसा जपणाऱ्यांनी याचा विचार जरूर करायला हवा. वृद्धाश्रमाची संकल्पना भारतीय संस्कृतीत बसणारी नाही. पण प्रतिष्ठेच्या खुळ्या कल्पना गांवातही पोहचल्या आहेत. त्यामुळेच एकत्र कुटुंबपद्धतीचा ऱ्हास सुरू आहे.

ग्रामीण भागात लोकसंख्येच्या दहा टक्के एवढी वृद्धांची संख्या आहे. वृद्ध माणसात आणि लहान मुलामध्ये बरेच साम्य असते. लहान बालकाची काळजी घ्यावी लागते. कारण त्याला स्वत:ला काहीच करता येत नाही. वृद्धांचीही अवस्था अशीच असते. अतिवृद्धांची तर लहान मुलांप्रमाणेच काळजी घ्यावी लागते. फरक एवढाच की लहान मुलाच्या संवेदना हळूहळू विकसित होत असतात. कोणी थोडेसे दुर्लक्ष केले तरी ते विसरून जाते. पण वृद्धांच्या संवेदना जागृत असतात. त्यांच्या असहायतेचा कोणी गैरफायदा घेतला, त्यांच्याकडे कोणी दुर्लक्ष केले तर त्यांना खूप दु:ख होते. वेदना होतात. समाधानाने जगण्याचे सुख त्यांना मिळू शकणार नाही या जाणीवेने ते निराश होतात. आपण कुटुंबावर भार तर नाही ना अशी रुखरुख त्यांना सतत बोचत राहते. त्यांना वृद्धाश्रमात ठेवून कुटुंबातील आनंद व समाधान त्यांना कोणीही देऊ शकत नाही. पण दुर्दैवाने वृद्धाश्रम हाच यावर उपाय समजून अनेक कर्ती-धर्ती मुले आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमाची वाट दाखविण्यात इतिकर्तव्यता समजतात. वृद्धाश्रमाची ही संस्कृती ग्रामीण भागातील कुटुंबव्यवस्था ढासळून टाकीत आहे. फ्लॅट संस्कृतीचा शिरकाव आता खेड्यात झाला आहे. एकत्र कुटुंबपद्धती ही वृद्धांना सुखी ठेवणारी , त्यांना आधार देणारी होती. या पद्धतीला वृद्धाश्रम पर्याय होऊ शकत नाही.

दारिद्र्यामुळे म्हाताऱ्या आई-वडीलांना सांभाळणे कठीण आहे. त्यामुळे आमच्या संसारावर आर्थिक बोजा पडतो असे अनेक जण सांगतात. पण हे तेवढेसे खरे नाही. कारण वृद्धांना आर्थिक मदत देणाऱ्या अनेक योजना शासनाकडे आहेत. स्वयंसेवी संस्था वृद्धांसाठी काही सुखसोयी निर्माण करून देत आहेत. प्रश्न आहे वृद्धांना माणूस म्हणून जपण्याचा. त्यांच्यासाठी वेळ देण्याचा. ही संवेदनशीलता पूर्वी घराघरातून पाहायला मिळत होती ती तशीच कायम कशी राहील यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्याची गरज आहे. ही संवेदनशील मानसिकता घडविण्याचे काम शालेय जीवनापासूनच सुरू झाले पाहिजे. वृद्धांना जगण्याचा हक्क आहे आणि हा हक्क शाबूत ठेवण्याचे कर्तव्य कुटुंबातील कमावत्या व्यक्तीने पार पाडले पाहिजे. समाजातील

जाणत्या धुरीणांनी याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. रांजणीच्या नॅचरल शुगर कारख्यान्याचे चेअरमन श्री. ठोंबरे यांनी त्यांच्या कारखान्यात वृद्धांसाठी सुरू केलेली प्रथा वाखाणण्यासारखी आहे. कारखान्यात नोकरीवर घेतानाच ते कर्मचाऱ्यांवर काही अटी घालतात. त्याप्रमाणे त्या कर्मचाऱ्याला त्याच्या पगारातला काही हिस्सा आपल्या आई-वडिलांकडे पाठवावा लागतो. श्री. ठोंबरे यांच्या माणुसकीमुळे त्यांच्या कारखान्यातील कर्मचाऱ्यांचे आई-वडील सुख उपभोगीत आहेत. शासनाने ही पद्धत अवलंबिली तर अनेक वृद्धांना सुखाने जगता येईल.

असे ऐकिवात आहे की, जर्मनीमध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तीची पत्नी 'गृहिणी' असेल तर तिच्या कामाचा मोबदला तिच्या नोकरी करणाऱ्या पतीला वेतनाबोबर मिळतो आणि ते पैसे पती आपल्या पत्नीला घरी देतो. आपल्याकडे वेगळ्या अर्थाने ही योजना राबविणे शक्य आहे. सध्या अनाथ वृद्धांना महिन्याकाठी २५० ते ३५० रुपये केंद्र आणि राज्य शासन देते. आज मोठ्या संख्येने ग्रामीण भागातील मंडळी विविध क्षेत्रांत छोट्या-मोठ्या नोकऱ्या करीत आहेत. नोकरीच्या निमित्ताने ते गाव सोडतात. यामुळे ते कुटुंब विभक्त होते आणि घरातील वृद्धांकडे दुर्लक्ष होते. वृद्धांना गावातच सोडून त्यांना नोकरीच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे वृद्ध गावातच दुर्दैवी जीवन जगत असतात. पगारातील काही हिस्सा आई-वडिलांना दिलाच पाहिजे असे बंधन जर शासनाने, निरनिराळ्या कंपन्या किंवा संस्थांना घातले तर ग्रमीण भागातील वृद्धांना नवजीवन मिळेल. पण ज्यांना कमी पगार मिळतो अशांच्या वृद्ध आई-वडिलांना सांभाळू न शकणाऱ्यांना पळवाट काढता येणार नाही. घरातील वृद्ध माणसे नोकरी करणाऱ्या मुलाच्या घरात राहतील किंवा मुलगा त्यांना गावी पैसे पाठवील. एकत्र कुटुंबपद्धतीचा भाग म्हणूनच असा उपक्रम हाती घेणे योग्यच ठरेल. त्यामुळे वृद्धांची काळजी शासकीय कर्तव्य म्हणून पगारदारांना घ्यावीच लागेल, एकत्र कुटुंब पद्धती टिकविण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. आजोबा-आजी व नातवंडांचे अजोड नाते कुटुंबाची शोभावाढवील. कुटुंबात सुख नांदेल. कुटुंब सुखी तर गाव सुखी असे दृष्य दिसेल.

❑

# १८. नारी के सहयोग बिना हर गाव सूना है

गावविकासाच्या विविध समस्यांचा विचार करताना ग्रामीण भागातील महिलांच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. राजकारणात ३३ टक्के आरक्षण महिलांना मिळाले. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला खुर्चीत बसायला शिकल्या. कोणी ग्रामपंचायत सदस्या झाल्या तर कोणी सरपंच. परंतु हे पदाचे आरक्षण महिलांच्या संपूर्ण संरक्षणाचे साधन बनू शकले नाही. पूर्वीच्या काळी महिलांबद्दल आदर आणि सद्भाव दर्शविला जात होता. काही ऋषींनी तर महिलांबद्दल म्हटले आहे "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते. रमन्ते तत्र देवता". म्हणजे जेथे महिलांचे पूजन होते तेथे देवताही रमतात. महिलांचा महिमा पुराणांतून वर्णन केला आहे! पण उत्तरोत्तर हा महिमा संपतो आहे.

महिला सबलीकरणाच्या आम्ही कितीही बाता मारल्या आणि योजना राबविल्या तरीही महिलांवरील अन्याय, अत्याचार कमी होताना दिसत नाहीत. महिलांमध्ये आई, बहीण, पत्नी, मुलगी, नात यांचे दर्शन होते असे विद्वान सांगतात. उत्तरोत्तर हा सर्व दर्शनभाव कमी होतो आहे आणि शिल्लक राहत आहे ती फक्त 'नारी'. नराने उपभोगण्याची वस्तू! स्त्री जातीकडे बघण्याचा दृष्टिकोन विकृत होत चालला आहे. मुलीला मुलापेक्षा कुटुंबात कमी लेखले जाते. पालकांना मुलीचा जन्म नकोच असतो. खेड्यात तर 'वंशाचा दिवा' म्हणजे मुलगाच पाहिजे असतो. वंशाला 'पणती' म्हणजे मुलगी चालत नाही. अशा धारणेमुळे मुलींचे जन्माचे प्रमाण घटत आहे. २००१ च्या जनगणनेचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की ठाणे, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, बीड, लातूर, उस्मानाबाद या जिल्ह्यात मुलींचे प्रमाण घटले आहे. मुलींचे घटण्याचे हे प्रमाण ग्रामीण भागात प्रत्येक दशकात वाढत आहे.

१९९१च्या जणगणनेत राज्याच्या ग्रामीण भागात दरहजार पुरूषांमागे महिलांचे प्रमाण ९७२ इतके होते. हेच प्रमाण २००१ मध्ये ९५९ इतके झाले. याला कारण खेड्यांमधून स्त्री-पुरुष समानतेसंबंधीची जाणीव निर्माण करण्यात शासन आणि आपण अपयशी ठरलो हे आहे. जन्मापूर्वीच स्त्री-भ्रूणहत्या करण्यात काही महाभाग स्वत:ला धन्य समजतात. जन्मानंतरही स्त्रियांच्या मागे लागलेली साडेसाती कमी झालेली नाही.

स्त्रियांचे प्रमाण घटत असतानाच परित्यक्तांचा-नवऱ्याने टाकलेल्या महिलांचा- प्रश्नदेखील गंभीर बनत चालला आहे. कारणे अनेक असतील. पण त्यांच्या संख्येतही वाढ होत आहे. प्रत्येक गावांत जसे आठ-दहा टक्के निराधार वृद्ध आहेत तशीच परित्यक्तांची संख्याही आहे. या संख्येप्रमाणेच त्यांचे प्रश्नही आहेत. शरीरश्रम हे खेड्यातल्या उपजीविकेचे मुख्य भांडवल आहे. पण १४ वर्षांखालील ४० टक्के मुले, ६० वर्षांच्या वरती १० टक्के वृद्ध माणसे अशी ५० टक्के लोकसंख्या उत्पादक कामे करीतच नाहीत. त्यात भर निराधार, परित्यक्ता महिलांची पडत आहे. बालविधवांचे प्रमाण फारसे घटलेले नाही. या बालविधवा आणि परित्यक्ता जेव्हा म्हाताऱ्या होतात तेव्हा त्यांना सासरचे किंवा माहेरचे अंगणातही थारा देत नाहीत. अतिशय विपन्न अवस्थेत त्यांना जगावे लागते. १९८९ पासून मानवलोकने हेल्पेज इंडियाच्या मदतीने १५० वृद्धांना सातत्याने सर्व प्रकारचे सहकार्य केले आहे. या १५० वृद्धांमध्ये १११ बालविधवा किंवा परित्यक्ता महिला आहेत. त्यांच्या कहाण्या ऐकल्या तर त्या जगत आहेत की जगण्याची शिक्षा भोगत आहेत हेच कळत नाही. एकीकडे महिलांच्या अधिकाराची भाषा आम्ही बोलतो आणि दुसरीकडे त्यांची नग्न धिंड काढण्यात आनंद मानतो ही विकृती नव्हे तर काय? स्वातंत्र्यानंतर महिलांना मतदानाचा हक्क मिळाला एवढीच काय ती प्रतिष्ठा त्यांना मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनासमितीमध्ये महिलांच्या मतदानाचा आग्रह धरला नसता, तर महिला जगताला दुय्यम दर्जाचे नागरिकत्व प्राप्त झाले असते. आजही मतदानाचा आणि ३३ टक्क्यांचा हक्क सोडला तर महिलांच्या पदरात आम्ही काय टाकले आहे?

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाला. त्यात महिलाही मागे नाहीत. असे असतानाही त्यांच्यावरील अन्याय, अत्याचाराच्या प्रमाणात घट झालेली दिसत नाही. आपली जबाबदारी झटकून टाकण्यासाठी ग्रामीण भागात १८ वर्षांच्या आतील मुलींचे लग्न पालक लावून देतात. यात बीड जिल्हा पहिला आहे. जीटीझेड च्या अहवालाप्रमाणे बीड जिल्ह्यात ५७ टक्के मुलींचे विवाह १८ वर्षांच्या आत होतात असे म्हटले आहे. इतर जिल्ह्यांतही कमीअधिक असेच चित्र आहे. तरुण वयात विधवा



झालेल्या मुलींच्या पुनर्विवाहाचे प्रमाण फारसे वाढलेले नाही. मुलींनी पुनर्विवाह करण्यासंबंधी ग्रामीण भागातील पालकांच्या आणि समाजाच्या मानसिकतेत फारसा बदल झालेला नाही. समाजधुरीणही यासाठी विशेष प्रयत्न करीत नाहीत.

विधवा महिलेचे घरात स्थान काय? तर तिला जनावराप्रमाणे घरात काम करावे लागते. आयुष्यभर घरातील माणसांचे टोमणे ऐकणे आणि तरीही त्यांच्यासाठी काबाडकष्ट करणे हाच तिचा धर्म होऊन बसला आहे. क्वचितच एखाद्या विधवेच्या नशिबी घरातील लोकांची सहानुभूती आणि प्रेम वाट्याला येते. एखाद्या कैद्याला जेलमध्ये ठेवावे तसे आयुष्यभर ती कुटुंबातल्या जेलमध्येच जगत असते. ग्रामीण भागातील समाजाने दुर्लक्षिलेल्या या सर्व महिला आहेत. यांच्यासाठी कुटुंबात वा गावकऱ्यांत आपुलकीची आणि सहानुभूतीची कुठलीही जागा नाही. गावातील महिला हे गावचे वैभव असले पाहिजे. 'संस्कृता स्त्री पराशक्तिः' सुसंस्कृत स्त्री सर्वश्रेष्ठ शक्ती आहे असे वचन आहे. परंतु प्रत्यक्षात स्त्रीला गेल्या हजारो वर्षांपासून 'सुसंस्कृत' करणाऱ्या शिक्षणापासून वंचित केले आहे. ऐकेकाळी समाजात महिलांबद्दल एकूणच जो मान, सन्मान, आदर होता तो लयाला जात आहे. महिलांवरील अत्याचार आणि अन्याय गावागावातून वाढले आहेत. हे कोणत्या प्रगतीचे लक्षण?

दलितांना शिक्षणात सवलती मिळाल्या. नोकऱ्यांत आरक्षण मिळाले. ओबीसीलाही ही संधी प्राप्त झाली. आरक्षणाचे आणि संधी देण्याचे हेच सूत्र शासनाने महिलांसाठी अंमलात आणण्याचे ठरविले आहे. पण हे पुरुषवर्गाला मान्य नाही. काही वर्षांपूर्वी मानवलोकने ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या बारा तालुक्यांतील महिलांचे सर्वेक्षण केले होते. ते सर्वेक्षण असे सांगते, सरपंच महिलेचा कारभार तिचा नवरा किंवा दीरच पाहतो. अनेक वेळा मीटिंगलाही तोच हजर असतो. निवडून आलेल्या महिला एकट्या-दुकट्या शहराच्या ठिकाणी सभा-संमेलनाला जात नाहीत. कारण त्यांच्या घरातील पुरुषमंडळींना ते पसंत नसते. हा त्यांच्यावरील अविश्वास आहे. आजही ही परिस्थिती बदललेली नाही.

जे राजकारणात घडते तेच अर्थकारणातही आहे. तेच मालकी हक्कासंबंधीही घडत आहे. किल्लारीच्या भूकंपात नव्याने बांधलेल्या घराची मालकी नवरा-बायकोच्या नावाने नोंदवावी असा स्वयंसेवी संघटनांनी आग्रह धरला होता. तो त्या भागातील पुरुष मंडळींना त्यावेळी फारसा पटला नाही. अर्थात त्यावेळचे मुख्यमंत्री श्री.शरदचंद्रजी पवार यांनी स्वयंसेवी संस्थेची ती मागणी पूर्ण केली आणि आता तर महाराष्ट्र

शासनानेच तसा कायदा केला आहे. महिलांचे सहकार्य घ्यायचे, त्यांचे श्रम घ्यायचे पण त्यांना मालकी द्यायची नाही. ही पुरुषांची कोती वृत्ती शिक्षण घेऊनही कमी झालेली दिसत नाही. पुरुषप्रधान संस्कृतीचे हे मागासलेपण आणि कोती वृत्ती ग्रामीण विकासाच्या आड येत आहे.

शासनाच्या धोरणाप्रमाणे ग्रामपंचायत, सोसायटी, शिक्षण समिती, पाणलोट समिती, जलस्वराज्य या सर्व प्रकल्पांमध्ये आणि उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग गृहीत आहे. निरनिराळ्या समित्यांमध्ये त्यांची नावे समाविष्ट केली जातात, पण ती नावापुरतीच. त्यांना प्रत्यक्ष सहभागी होण्यापासून वंचित ठेवले जाते. त्यांना संधी देण्याचे विशेष प्रयत्न आज ग्रामीण भागात होताना दिसत नाहीत. बदलत्या काळाची चाहुल लक्षात घेऊन सर्व क्षेत्रांत महिलांच्या सहभागाचा विचार करण्याची गरज आहे. अर्थात ही गरज पुरुषांच्या पुढाकाराने सफल केली तरच महिलांचे सबलीकरण होऊ शकेल.

५० टक्के महिलांनी, महिला ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव घेतला की दारूबंदी कायदा तेथे लागू होतो असे शासन सांगते, पण प्रत्यक्षात काय? अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा, पूस, गिरवली, राडी, पाटोदा, जळगांव इत्यादी गावांतील महिलांनी दारुबंदीसाठी पुढाकार घेतला. तसे ठरावही केले. पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव असलेल्या पोलीस स्टेशननी त्याकडे दुर्लक्ष केले. कोणताही राजकीय पुढारी या कामात महिलांच्या बाजूने उभा राहिला नाही. काही गावांतून तर असा पुढाकार घेणाऱ्या महिलांना मारही खावा लागला. काहींच्या नवऱ्यांनी बायकोला बदडून काढले. गावात शांतता नांदली तर सुबत्ता निर्माण होईल. महिला हे काम नेकीने आणि नेटाने करू शकतात. त्यासाठी कायदा राबविणाऱ्यांचे पाठबळ हवेच. लोकनायक जयप्रकाश नारायण एकदा म्हणाले होते, 'नारी के सहयोग बिना हर बदलाव अधूरा है!' म्हणून ग्रामीण विकासाला गती द्यायची असेल तर 'संस्कृता स्त्री पराशक्ती' च्या संस्कृतीला पुन्हा उजाळा देण्याची गरज आहे.

❑



# १९. यंत्रे आली–जनावरे कमी झाली

गावात शेती उत्पादनासाठी अनेक प्रकारची यंत्रसामुग्री वापरली जाऊ लागली आहे. त्याची सुरवात ट्रॅक्टरपासून झाली. ट्रॅक्टरमुळे नांगरणी होते, कोळपणी होते एवढेच नव्हे तर काढणीसुद्धा शक्य झाली आहे. कमी श्रमात, कमी वेळात शेतातील कामे करून घेता येतात म्हणून ट्रॅक्टर हे आता शेतकऱ्यांना वरदान ठरले आहे. सुरुवातीच्या काळात ट्रॅक्टरने शेती नांगरणे शेतकऱ्याला पसंत नव्हते. माझ्या गावात पन्नास वर्षांपूर्वी गावच्या देशमुखांनी ट्रॅक्टर आणला, पण नांगरणीसाठी त्याचा कोणी वापर केला नाही. कोणीतरी गावात अफवा पसरविली की, ट्रॅक्टरने शेती नांगरली की जमीन गरम होते, पीक येत नाही. देशमुखाला ट्रॅक्टर परत पाठवावा लागला. पण आज हा गैरसमज दूर झालेला दिसतो. कारण बहुतेक गावांतून शेतीसाठी ट्रॅक्टरचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे आणि आता तर नांगरणीपासून धान्याचे पोते भरण्यापर्यंतची सर्व कामे यंत्राद्वारे करता येतात.

पूर्वीच्या काळी शेती कसण्यासाठी जनावरांचा वापर होत होता. ज्याच्याकडे बैल बारदाना मोठा तो शेतकरी मोठा असा समज होता आणि तो खराही होता. बैल आणि हल्यांना नांगरणीपासून खळे करण्यापर्यंत सर्वच कामांना वापरले जायचे. त्यांना जन्म देणाऱ्या गाई–म्हशीदेखील शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात होत्या. शेतमजुरांकडे म्हैस, गाय किंवा किमान शेळीतरी असायची. या सर्व जनावरांचा उपयोग दुधासाठी पूर्वीही होत होता तसाच आजही होतो. या जनावरांएवढा शेतकऱ्यांचा दुसरा मित्र कोणीच नसेल! कारण दूध, शेण, मूत्र आणि मेल्यावर कातडेदेखील मानवजातीच्या

उपयोगात आणले जात होते. ही जनावरे म्हणजे त्यागाचे उत्तम प्रतीकच! ग्रामीण भागातील लोकांसाठी जनावरांएवढा त्याग इतर कोणी केला असेल असे वाटत नाही.

लोकसंख्या वाढली त्यामुळे अन्नाची मागणी वाढली. ही मागणी पूर्ण करण्याकरिता शेतीतील धान्याचे उत्पादन वाढविणे गरजेचे होते. शेणखत, मूत्रापासून हे शक्य नाही असे कृषी तज्ज्ञांना वाटले म्हणून त्यांनी रासायनिक खताचा वापर करण्याची सवय शेतकऱ्यांना लावली. खत, मूत्र,पालापाचोळा यापेक्षा रासायनिक खताच्या वापरामुळे काही काळ उत्पादन वाढले. पण हे वाढत असतानाच खताच्या मात्राही वाढवाव्या लागल्या. १५:१५:१० हे खत दोन वर्षे ज्यांनी वापरले त्याला तिसऱ्या-चौथ्या वर्षांपूर्वी इतकेच उत्पादन घेण्यासाठी १८:१८:१० नंतर २०:२०:० चा डोस वापरावा लागला. पुढे हा डोस वाढतच गेला मग २३:२३:०, १८:४६ आणि आता १०:२६:२६ असा वाढत्या प्रमाणात खताचा वापर करूनदेखील हवे तेवढे उत्पादन वाढेल याची खात्री नाही. उलट जमिनीचा कस यामुळे कमी होत आहे. जमीन नापीक होत आहे. या रासायनिक खतांचा अंश पाण्यात उतरत आहे. पाणी दूषित होत आहे. त्याचा परिणाम मानवी शरीरावर दिसू लागला आहे. रासायनिक खताच्या उत्पादित अन्नधान्यातून आणि पाण्यातून मानवी शरीरात विष पेरले जात आहे, अशी चर्चा अलीकडे मोठ्या प्रमाणात देशभर सुरू झाली आहे.

म्हणून आता पुन्हा सेंद्रिय शेतीचे 'भजन' कृषी तज्ज्ञांनी सुरू केले आहे. अर्थात राजकीय धोरणाच्या पाठिंब्याशिवाय अशा भजनांना अर्थच नसतो. शेती वाचवायची असेल तर सेंद्रिय खताला पर्यायच नाही असा गजर राजकारण्यांनी सुद्धा सुरू केला आहे. या पार्श्वभूमीवर जनावरांचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.

शेतीत यंत्रसामुग्रीचा वापर वाढला आणि हळूहळू जनावरांच्या संवर्धनाकडे दुर्लक्ष होत गेले. बैलांचा वापर कमी झाला. त्यांची संख्या कमी झाली. म्हैस, गायींची संख्याही रोडावली. शेळ्या-मेंढ्या सांभाळणे गोरगरीबांना न परवडणारे झाले. खुरपणी, निंदणी, कापणी इत्यादी कामांसाठी शेतात जाताना शेतमजूर बरोबर त्याची गाय, म्हैस, शेळी घेऊन जात असे. जनावर बांधावरल्या एखाद्या झुडपाला बांधले जाई. बांधावर ते चरत राही आणि जनावरांचा मालक दिवसभर शेतात काम करीत असे. कामाची त्याला मजुरी मिळत होती. जनावर फुकट चरून निघत होते. आता शेतीतील सर्व कामांसाठी यंत्राचा वापर वाढला आहे. त्यामुळे मजुरांचे शेतीतील मजुरीचे दिवस कमी झाले आहेत. मजुरीबरोबर त्याने सांभाळलेल्या जनावरांचे बांधावर चरणे आता अवघड झाले आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतकऱ्यांकडील बैल बारदाना देखील कमी

झाला आहे. काही गावांतून तर बैलांचे कामच संपत आले आहे. गावांतील बैलगाड्यांची संख्या कमी झाली. शेतमाल वाहतुकीसाठी ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टर आले. यातून वाहतूक करणे सर्वांनाच सोयीचे होऊ लागले. त्यामुळेही अशा जनावरांकडे दुर्लक्ष झाले. घोड्यांची संख्या कमी होत आहे. कारण घोड्यांच्याऐवजी सायकल, मोटरसायकल, जीप या वाहनांचा वापर वाढला. एकूणच जनावरांची उपयोगिता कमी झाली. म्हणून त्याकडे दुर्लक्ष झाले.

माणूस सर्वांत स्वार्थी प्राणी आहे. एखाद्या वस्तूचा, प्राण्याचा उपयोग संपला की त्याकडे तो दुर्लक्ष करतो. जनावरांशिवाय शेती, वाहतूक करता येते आणि तीही कमी वेळात कमी श्रमात असे लक्षात आल्यामुळे खेडेगावातून जनावरांची संख्या कमी होत चालली आहे. आधुनिक यंत्राचा वापर मनुष्यजातीला सोयीचा असला तरी जनावरांकडे होणारे दुर्लक्ष कृषी उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने धोकादायक आहे.

यापुढच्या काळात सेंद्रिय खताचा वापर मोठ्या प्रमाणात शेती उत्पादनासाठी झाला पाहिजे. तरच आपली शेती टिकून राहील असे कृषिशास्त्रज्ञांना वाटते. शासनाने सुद्धा सेंद्रिय खताच्या उत्पादनास प्रोत्साहन दिले आहे. सेंद्रिय खताचे उत्पादन वाढावे म्हणून अनेक योजना, प्रकल्प आखले जात आहेत. गांडूळ शेतीचा उच्चार केल्याशिवाय एकही कृषिपरिषद पूर्ण होत नाही. एवढे महत्व गांडूळ खताला दिले गेले आहे. सेंद्रिय खताचे महत्त्व यापुढच्या काळात खरोखरच वाढणार असेल तर जनावरांच्या वाढीचा विचार करावाच लागेल. कारण गाय, म्हैस, बैल, शेळी, मेंढी, घोडा, डुक्कर हे सर्व प्राणी सेंद्रिय खत निर्माण करणारे छोटे-छोटे कारखानेच आहेत. या प्राण्यांचा शेती करण्यासाठी उपयोग घ्या अथवा न घ्या! सेंद्रिय खताचा चालता-फिरता छोटा कारखाना म्हणून त्याचा विचार करावा लागेल. सेंद्रिय खत निसर्गातील अनेक गोष्टींचा उपयोग करून तयार करता येतो हे सांगण्याची आता गरज नाही. जनावरांद्वारे होणारी शेणखताची प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी अधिक सोयीची आहे. म्हणून शेण किंवा विष्ठा देणाऱ्या प्राण्याला यापुढच्या काळात जपावे लागणार आहे.

शेतीसाठी नत्र, स्फुरद आणि पलाश या घटकांची नितांत गरज आहे असे कृषी शास्त्रज्ञ सांगतात. हे सर्व घटक कमीजास्त प्रमाणात जनावरांच्या मलमूत्रात उपलब्ध आहेत. शेतकऱ्याला पूर्वीप्रमाणेच मलमुत्रात आयते तयार झालेले नत्र, स्फुरद आणि पलाशचे मिश्रण पुन्हा वापरावे लागेल.

गाय ही हिंदू धर्मात पूजनीय मानली जाते. गायीच्या पोटात तेहेतीस कोटी देव वास करतात असे मी लहानपणी ऐकले होते. देव असतात की नाही, गाय पूजनीय आहे की नाही या फंदात पडण्याची गरज नाही. मात्र गावरान गाय मानवहितासाठी सप्तशक्तींचे आगर आहे असे मला वाटते. कारण गायींचे दूध औषधी, गायीचे तूप औषधी, गायीच्या मुत्राला तर आयुर्वेदात खूप मोठे स्थान आहे. अनेक आयुर्वेदिक औषधे गायीच्या मुत्राचा उपयोग करून तयार केली जातात. गायीचे शेण उत्तम सेंद्रिय खत आहे. गायीच्या कातडीचा उपयोग अनेक वस्तू तयार करण्यासाठी केला जातो. हाडे आणि शिंगांचा वापर खतनिर्मितीसाठी होतो. म्हणूनच गाय पूर्वजांनी पूजनीय मानली आहे. जसे गायीचे तसे शेळीचे. शेळीच्या दुधाचा वापर आरोग्यवर्धक असतो. म. गांधींनी शेळीला व तिच्या दुधाला महत्त्व दिले होते ते यामुळेच. हे सर्व प्राणी मानवाला उपयोगी पडणारे आहेत. यंत्र युग अवतरले असले तरी या प्राण्यांना दूर करून चालणार नाही. कारण ग्रामवासीयांचे ते खरे मित्र आहेत. पर्यावरणाचे रक्षक आहेत.

❑

# २०. तर आत्महत्या थांबतील

गेल्या दोन-तीन वर्षांत शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते, अर्थतज्ज्ञ आणि शेतकीतज्ज्ञ आत्महत्येच्या प्रश्नांवर बोलत आहेत. शासनानेही आत्महत्या थांबाव्यात म्हणून काही उपाययोजना जाहीर केली आहे. शेतकऱ्यांसाठी पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केले आहे. देशाच्या कृषिमंत्री आणि पंतप्रधानांनी आत्महत्या घडलेल्या विदर्भाचा दौरा करून शेतकऱ्यांना कर्जमुक्तीसाठी योजना जाहीर केल्या आहेत. तरीही विदर्भ आणि मराठवाड्यात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढतच आहे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले तर आत्महत्या करणाऱ्या थांबतील असे काही तज्ज्ञांचे मत आहे. कर्जावर व्याजाचे प्रमाण जास्त आहे असे काहींनी निदर्शनास आणून दिल्यामुळे कर्जमाफीबरोबरच व्याजाचे दर कमी करावेत अशी काहींनी मागणी केली आहे.

कर्ज माफ केले तर आत्महत्या थांबतीलच असे ठामपणे कोणीही सांगू शकत नाही. व्याज किंवा कर्जमाफ केले तर शेतकऱ्यांचा एक प्रश्न सुटेल पण दैनंदिन व्यवहार भागविण्यासाठी त्याच्या हातात पैसा येईल का हा खरा प्रश्न आहे. कर्जमाफी किंवा व्याजमाफीमुळे दररोजच्या जगण्यातील त्याच्या अडचणी दूर होत नाहीत. ज्या शेतकऱ्यांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केल्या तो सुटला! पण त्याच्या कुटुंबाचे काय? म्हणून कर्जमाफी किंवा व्याजमाफी ही शेतकऱ्याला कर्जातून मुक्त करण्याची सुरुवात आहे. शेतकऱ्याला सुखी करण्याचे ते पहिले पाऊल आहे. कर्जमाफीपासून या उपक्रमाची सुरुवात करावी. मात्र शेतकरी भविष्यात सुखी व्हावा म्हणून आणखीन काही उपाययोजना करणे गरजेचे आहे.



आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचा काही संस्थांनी अभ्यास केला आहे. त्यात असे लक्षात येते की, आत्महत्या केलेल्यांमध्ये ८२% अल्पभूधारक कोरडवाहू शेतकरी आहेत. अल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांमध्ये आत्महत्येचे एवढे मोठे प्रमाण असेल तर या वर्गातील शेतकऱ्यांना पहिल्यांदा आर्थिक मदत मिळेल अशी योजना आखणे गरजेचे आहे.

या छोट्या शेतकरी वर्गाला पैशाची गरज भासते पेरणीच्या दिवसात. त्याची शेती पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे तो दुबार पीक घेऊ शकत नाही. खरिपाच्या पिकातून मिळालेला पैसा दुसरे खरीप पीक येईपर्यंत त्याला पुरवावा लागतो. पण तो पुरत नाही. त्यामुळे खरीप पिकासाठी लागणारे बियाणे, खते घेण्यासाठी त्याला कोणाकडे तरी हात पसरावे लागतात. वेळेवर पेरणी झाली नाही तर मिळेल त्या टक्केवारीने तो बँकांकडून किंवा सावकारांकडून कर्ज घेतो. हे कर्ज शेतीतील मिळणाऱ्या उत्पन्नातून घर भागवून फेडणे त्याला शक्य होत नाही. अशा शेतकऱ्याला कर्जातून वाचविणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने बँकांना कर्जवाटपाचे धोरण बदलण्यास भाग पाडले पाहिजे. छोट्या कोरडवाहू शेतकऱ्याला बियाणे खतासाठी कर्ज देण्याऐवजी बँकांनी त्यांना "उसनवार" द्यावी. अशा शेतकऱ्यांना वेळेवर पेरणीसाठी दोन-पाच हजार रुपये कर्ज म्हणून नव्हे तर उसनवार म्हणून द्यावेत. या उसनवारीची परतफेड खरिपाचे पीक निघाल्यानंतर किंवा सहा-सात महिन्यांचे व्याज लावण्याऐवजी बँकांनी त्याच्याकडून व्यवस्थापन म्हणून ५०-१०० रुपये इतका खर्च वसूल करावा. असे केले तर कोरडवाहू छोट्या शेतकऱ्याला व्याजाचा भुर्दंड बसणार नाही.

शेतकऱ्याला आरोग्यासाठी, औषधोपचारासाठी, मुलाबाळांच्या शिक्षणासाठी खर्च करावाच लागतो. शासनाने सर्व शेतकऱ्यांचा आरोग्यासाठी विमा उतरवावा. आजच्या विम्याच्या पद्धतीमधून शेतीसाठी होणाऱ्या नुकसानीची भरपाई होऊ शकते. पण औषधोपचारासाठी लागणाऱ्या आणि न परवडणाऱ्या खर्चाची भरपाई या विम्यातून होत नाही. म्हणून सर्व शेतकऱ्यांचा आरोग्यासाठी विमा दरवर्षी शासनाने भरावा.

शेतकऱ्यांचे वर्गीकरण करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात तीन-चार प्रकारचे शेतकरी आहेत. एक कोरडवाहू शेतकरी ज्याला शेती हे एकमेव उत्पन्नाचे साधन आहे. खरिपाची शेती करणाऱ्या शेतकऱ्याला शेती पिकली नाही किंवा उत्पन्न पुरले नाही तर त्याला मोलमजुरी करावी लागते, दुसऱ्या प्रकारात मोडणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये शेतीशिवाय गाई, म्हशी, शेळी, किराणा दुकान किंवा सुतार, लोहार, कुंभार असा

एखादा जोडधंदा आहे. तिसऱ्या प्रकारात मोडणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरात कोणीतरी शासकीय किंवा निमशासकीय नोकरीत आहे. त्यांना शेतीशिवाय त्यांच्या व्यवसायातून भरपूर उत्पन्न मिळते. वकील, डॉक्टर, कारखानदार असे शेतकरी आपली शेती बटईने देऊन टाकतात. म्हणून केवळ शेती हेच उत्पन्नाचे साधन असलेला शेतकरी किंवा ज्याच्याकडे दुसरे जुजबी उत्पन्न आहे असा खेड्यात राहणारा शेतकरीच कर्जाच्या तावडीत सापडलेला आहे. अशा शेतकऱ्यांच्या घरात साठ वर्षांच्या वर असणाऱ्या स्त्री-पुरुषाला दरडोई निवृत्तिवेतन देण्यात यावे. त्यामुळे कमावत नसलेल्या वृद्धांचा भार शेतकरी कुटुंबावर पडणार नाही.

शेतकरी कुटुंबातील शिकणाऱ्या मुलामुलींच्यासाठी शासनाने काही निश्चित धोरण आखले पाहिजे. वरच्या श्रीमंत वर्गातील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय त्यांचे पालक करू शकतात. शिक्षणासाठी भरपूर खर्च करण्याची त्यांची ऐपतही असते. अशा वर्गातूनच उच्चविद्याविभूषित होणाऱ्या तरुणांची संख्या जास्त आहे. छोट्या शेतकऱ्यांच्या घरात शिकणारी मुले-मुली हुशार आहेत. पण त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षणातील विविध संधींपासून दूर राहावे लागते. अशा विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची, तांत्रिक शिक्षणाची, वैद्यकीय शिक्षणाची सर्व सोय शासनाने केली पाहिजे. शिक्षण, आरोग्य आणि शेती या तीन गोष्टींवरच शेतकऱ्याला जादा खर्च करावा लागतो. या खर्चामुळेच शेतकरी कर्जबाजारी होत चालला आहे. या तीनही गोष्टींवर होणाऱ्या खर्चासाठी शासनाने आर्थिक मदत केली तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबू शकतील.

शेतीसाठी ४ ते ६ टक्के दराने कर्ज द्यावे अशी भरपूर चर्चा गेले वर्षभर सुरू आहे. शासन या दृष्टीने सकारात्मक धोरण आखत आहे. पण यामुळे शेतकरी कर्जमुक्त होईलच आणि त्याच्या आत्महत्या थांबतीलच अशी ग्वाही देण्यात अर्थ नाही. शेतीसाठी व्याजाचे दर कमी केले पाहिजेच हे कोणी नाकारू शकत नाही पण यामुळे शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सुटतीलच असे गृहीत धरणे धाडसाचे आहे.

'सर्व उद्योग थांबतील, पण भारतासारख्या देशात शेतीचा उद्योग थांबणार नाही.' असे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते. हे खरे आहेच. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेतीच तोट्यात आली तर परदेशातून धान्य आणून या देशाला फार दिवस जगवणे कठीण आहे. मुक्त अर्थव्यवस्थेच्या नादी लागून स्पेशल इकॉनॉमिक झोन चा प्रकल्प मोठ्या प्रमाणात राबविण्याचे चतुराईचे धोरण शासनाने स्वीकारले आहे यामुळे येत्या काही वर्षांत लाखो हेक्टर शेती, उत्पादनापासून

वंचित राहणार आहे. स्पेशल इकॉनॉमिक झोन ऐवजी स्पेशल ॲग्रीकल्चरल झोन असा प्रकल्प जर शासनाने राबविला तर या झोनमध्ये येणारी हजारो हेक्टर जमीन सुधारेल. उत्पादन वाढेल. वीज, पाणी, आयात निर्यातीवरच्या करात स्पेशल इकॉनॉमिक झोन मध्ये काही वर्षांसाठी सूट देण्यात आली आहे. अशीच सूट स्पेशल ॲग्रीकल्चरल झोन मध्ये दिली गेल्यास बेकारांचे तांडे पुन्हा शेतीकडे वळतील. बेकारी कमी होईल आणि त्यातून शेतकऱ्यांच्या अनेक समस्यांवर उपाय सापडेल. ७३ व्या घटना दुरुस्तीने गावाला स्वाभिमानाने जगण्यासाठी अधिकार दिले. शेतीत समृद्धी झाल्याशिवाय हे अधिकार वांझ आहेत.

पेरणीच्या दिवसांत जेव्हा शेतकऱ्याला गरज असते तेव्हा अन्नधान्याचे भाव वाढलेले असतात असा अनुभव आहे. जेव्हा शेतकऱ्यांचे खळे सुरू झालेले असते तेव्हा बाजारात अन्नधान्याचे भाव कमी झालेले असतात. शेतकऱ्याला पैशाची गरज असते. गावातून घेतलेली उधार-उसनवार परत करण्याची त्याला घाई असते. शिवाय पैसा त्याच्या हातात नसतो. म्हणून पडेल त्या भावाने तो काही माल विकतो. त्यामुळे त्याचे आर्थिक नुकसान होते. हे टाळण्यासाठी काही व्यवस्था करणे गरजेचे आहे. गावांगावात सेवा सहकारी सोसायट्या आहेत. या सोसायट्यांनी शेतकऱ्यांचा बाजारात विकला जाणारा माल ठेवून घ्यावा आणि त्यावर काही उसनवार द्यावी. म्हणजे शेतकऱ्यांची तात्पुरती गरज भागेल. बाजारात भाव वाढले की सोसायट्यांमध्ये ठेवलेला माल शेतकरी बाजारात विकून टाकील आणि सोसायटीचे पैसे परत करील. या पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टळेल.

शेतीमालाच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांचा बराच मोठा खर्च होत असतो. बाजारात अनेक नवनवीन कंपन्यांनी आपली उत्पादने आणली आहेत. जाहिराती करून शेतकऱ्यांना भुरळ घालण्याचे हे धोरण गेली अनेक वर्षेसुरू आहे. हरित क्रांतीनंतर रासायनिक खते आणि बियाणे वापरण्यावर भर दिला गेला. शेतकरी या धोरणाला बळी पडला. स्वतःचे बियाणे तयार करण्यापेक्षा बाजारातले बियाणे घेण्याकडे त्याचा कल वाढला. बाजारातले बियाणे चांगले. ते उच्च दर्जाचे असते अशी बतावणी करून शेतकऱ्याला ते उच्च किमतीत विकण्यात येते. बियाणे खरेदी करण्यावर सुद्धा त्याचा बराचसा खर्च होत असतो. जुन्या काळी जसे शेतकरी आपली बियाणे तयार करीत होता आणि त्याचीच पेरणी तो स्वतःच्या शेतात करीत होता. आताही शासनाने ही भूमिका स्वीकारून शेतकऱ्यांना अशी परवानगी दिली तर शेतकऱ्यांचा बियाण्यांवर होणारा खर्च

बऱ्याच अंशी कमी होईल. पेरणीच्या काळात बियाण्यांच्या खरेदीसाठी त्याला कोणाकडेही हात पसरावे लागणार नाहीत. कर्जाचा डोंगर वाढणार नाही.

बियाण्यांप्रमाणेच खतावरही शेतकऱ्यांनी गेल्या २५-३० वर्षांत भरपूर खर्च केला आहे. रासायनिक खतांच्या वापरामुळे उत्पादन वाढते हे त्याला कळल्यावर महागडी रासायनिक खते डावलून चालणार नाही. सेंद्रिय खताबरोबरच जमिनीचा पोत सुधारण्यासाठी तळ्यातील गाळ शेतात टाकण्याचे छोट्या शेतकऱ्यांना सहकार्य शासनाने करावे. देशातील धरणांपैकी महाराष्ट्रात ४५% धरणे आहेत. याशिवाय पाझर तळी आणि सिमेंट नाला बांध हजारोंच्या संख्येत आहेत. सिमेंट नाला बांध आणि पाझर तलावात पाण्याइतकीच कॅचमेंट एरियातून माती वाहून आली आहे. लाखो टन माती दरवर्षी या तळ्यांत येऊन साठत आहे. दरवर्षी किंवा तळी कोरडी पडल्यावर त्यातील माती नाममात्र खर्चाने कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतात टाकली तर पहिली दोन-तीन वर्षे त्या शेतकऱ्याला शेतात कोणतेही खत टाकण्याची गरज भासणार नाही, असा मानवलोकचा अनुभव आहे. ऐपत नसलेल्या छोट्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतात हे मातीचे धन योग्य प्रमाणात टाकण्याचे नियोजन शासनाने केले तर हजारो अल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांचा खतावरील होणारा खर्च वाचेल. सलग दोन-तीन वर्ष खर्च वाचला तर त्याची कौटुंबिक परिस्थिती सुधारेल. तो आर्थिक संकटातून सावरला की त्याच्या जगण्याला अर्थ येईल. तो आत्महत्येपासून दूर राहील.

❑

# २१. मराठवाड्याच्या विकासासाठी 'साझ' हवा

सध्या शेतीच्या धोरणावर देशभर चर्चा सुरू आहे. केंद्र शासनाने शेतीसंबंधीचे नवे धोरण चर्चेसाठी संशोधक सदस्यांपुढे ठेवले आहे. कारण स्वातंत्र्यानंतर कधी नव्हे एवढी घसरण शेतीक्षेत्रात झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे दरडोई उत्पन्न घसरत आहे. जपानसारख्या देशात सामान्या माणसाचे दरडोई उत्पन्न ३६ हजार पौंड आहे. तर भारतामध्ये ते फक्त ६०० डॉलर एवढे आहे. इलेक्ट्रॉनिक्स किंवा सॉफ्टवेअरमध्ये ३० टक्क्याने वाढ झाली. ऑटोमोबाइल्स्, टेलीकम्युनिकेशन, व्यापार, पर्यटन आदी क्षेत्रांत जवळपास १५%नी वाढ झाली. मात्र शेतीक्षेत्राचा विकास केवळ दोन टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. शेतीक्षेत्र आणि इतर क्षेत्रांतील विकासाचे अंतर वाढत आहे. या संदर्भातच मराठवाड्यातील विकासाचा विचार करावा लागेल.

गेल्या ६० वर्षांचे भारतीय शेतीसंदर्भात अवलोकन केले तर असे लक्षात येईल की, आपण स्वतंत्र झालो तेव्हा आपल्या देशावर कोणाचेही कर्ज नव्हते. हळूहळू परिस्थिती बदलली. जरी भारत आज अनेक पिकांमध्ये पहिल्या दुसऱ्या क्रमांकात असला तरी शेतीक्षेत्रातील परिस्थिती ढासळली आहे. मध्यंतरी आपण अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण झालो होतो. आता ती स्वयंपूर्णता धोक्यात आली असून गतवर्षी ५० लाख टन गहू बाहेरून आयात करावा लागला. एवढेच नव्हे तर सध्या अन्नधान्य, कडधान्य, खाद्यतेल अशा जीवनावश्यक किमान दोनशे वस्तू परदेशातून आयात करण्यात येत आहेत. जागतिक व्यापाराचा भाग म्हणून हे करावे लागत आहे असे शासन सांगते. शासनाने घेतलेली ही दिशा चुकीची असल्यामुळे जागतिक व्यापारातसुद्धा आपला



सहभाग हळूहळू कमीच होत आहे. दोन हजार वर्षांपूर्वी आपला जागतिक व्यापारातील हिस्सा हा ३५% होता. १७ व्या शतकात तो १८% वर आला, आणि आज तो केवळ एक टक्क्यावर येऊन पोहचला आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊनच मराठवाड्यातील शेतीचा विचार करावा लागेल.

मराठवाड्याचे भौगोलिक क्षेत्र ६४०४० चौ. कि. मी. आहे. एक चौ. कि. मी. म्हणजे १०० हेक्टर असे गणित लावले तर मराठवाडा हा ६४.४० लाख हेक्टरवर पसरलेला आहे. या क्षेत्रापैकी ३६.४६ लाख हेक्टर खरिपाचे, २०.६९ लाख हेक्टर रब्बीचे आणि उर्वरित क्षेत्र डोंगर, पडिक जमीन, नद्या, नाले, धरणे, रस्ते, शहरे आणि वस्त्या यांनी व्यापलेले आहे. शिवाय मराठवाड्याच्या ३८-४० टक्के भूभागावर दुष्काळाची छाया पडलेली असते.

मराठवाड्यात कोरडवाहू शेतीचे क्षेत्रच मोठे आहे. १९९१ च्या आकडेवारीप्रमाणे मराठवाड्यात २२.४० लाख खातेदार आहेत. बारकाईने याचे विश्लेषण केले तर असे लक्षात येते की या खातेदारांपैकी ७.४५ लाख खातेदाराकडे दोन हेक्टरच्या आत जमीन आहे. त्यापैकी ७५ टक्के जमीन ही कोरडवाहूच आहे. कोरडवाहू जमीन याचा अर्थ वर्षांतून एकदाच उत्पन्न देणारी जमीन. याचा दुसरा अर्थ असा की, कोरडवाहू शेतकऱ्याला त्याच्या स्वतःच्या जमिनीवर बाराही महिने काम नसते. पण त्या जमिनीतील उत्पादनावर आणि उत्पन्नावर त्याचा वर्षभराचा संसार भागणे कठीण असल्यामुळे त्याला जगण्यासाठी दुसरा उद्योग किंवा मजुरी करावी लागते. ती त्याला हमखास मिळतेच असे कोणीही छातीठोकपणे सांगू शकणार नाही. म्हणूनच अशा शेतकरी वर्गात दारिद्र्याचे, कर्जबाजारीपणाचे आणि आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे.

मराठवाड्याचा विकास कोणासाठी असा प्रश्न कोणी विचारला तर कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी असेच म्हणावे लागेल. दुय्यम स्थानावर सिंचनाची व्यवस्था असलेला शेतकरी किंवा कारखानदार, उद्योगपतीही, असू शकेल. मराठवाड्याचा विकास करावयाचा असेल तर मराठवाड्यातील शेतीचा विकास हे सूत्र विसरून चालणार नाही. शेतीचा विकास करताना कोरडवाहू शेतकऱ्यांच्याच शेतीच्या विकासाला प्राध्यान्य द्यावे लागेल. असा विकास करावयाचा असेल तर काही गोष्टींचा वेगळ्या पद्धतीने विचार करावा लागेल. शासन गेली पन्नास वर्षे शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवीत असले तरी त्या योजनांचा फायदा अभावानेच कोरडवाहू गरीब शेतकऱ्यांना झाला

आहे. गरीब शेतकरी कसाही असला तरी त्याचे शेतीतील उत्पादन हे मोठ्या शेतकऱ्यांच्या शेतीतील उत्पादनापेक्षा दर हेक्टरी सरासरीने जास्त आहे. कारण छोटी शेती असल्यामुळे शेतीवर त्याला लक्ष द्यावे लागते. अशा कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विकासासाठी काही गोष्टी निश्चितपणे करता येतील. त्याची चर्चा झाली पाहिजे.

मराठवाड्यात जवळपास सर्वच जिल्ह्यांत साखर कारखाने आहेत. हे कारखाने वर्षभर चालू नसतात. ऑक्टोबर ते एप्रिल–मे असे त्यांचा हंगाम असतो. याच काळात कोरडवाहू शेतकऱ्यांनाही शेतीत काहीच काम नसते. तेव्हा अशा छोट्या शेतकऱ्यांना साखर कारखान्यात हंगामी अग्रहक्काने काम दिले पाहिजे. त्यांच्यासाठी पूरक उत्पन्नाचे हे हक्काचे साधन व्हावे. अर्थात जिल्ह्यातील सर्वच शेतकऱ्यांना हे काम पुरणार नाही म्हणून इतर क्षेत्रेही धुंडाळावी लागतील.

कापूस उत्पादनात विदर्भानंतर मराठवाड्याचा क्रमांक लागतो. मराठवाड्याच्या सर्वच जिल्ह्यांत भरपूर कापूस होत नसला तरी काही जिल्हे वगळता कापसावर प्रक्रिया करण्याचा उद्योग सुरू करता येईल. अनेक ठिकाणी जिनिंग, प्रेसिंग, आणि सूतगिरण्या निघाल्या आहेत. परंतु कापसावर संपूर्णपणे प्रक्रिया व्हावी म्हणून सूतगिरणी बरोबरच कापडगिरण्या आणि त्यांची विक्री केंद्रेही काढली पाहिजेत. आज तुटकतुटक हे काम सुरू आहे. जार जिनिंग ते कापड गिरणी अशा सर्वच प्रक्रिया एकाच भूक्षेत्रावर केल्या तर अशा प्रत्येक युनिटमागे हजारो शेतकऱ्यांना पाच–सहा महिने काम मिळू शकते. आज सहकारी पद्धतीने चालणाऱ्या ज्या जिनिंग, प्रेसिंग बंद आहेत त्यांची कारणे शोधून कापसाच्या प्रक्रिया उद्योगातील विविध घटक एकाच भूप्रदेशावर सुरू करावेत. म्हणजे साखर कारखान्याप्रमाणेच अनेकांना हंगामी काम देता येईल.

मराठवाड्यात तेलबियांचे बऱ्यापैकी उत्पादन आहे. कापसातून निघणारी सरकी, भुईमुग, करडई, जवस, मोहरी, सूर्यफुल, सोयाबिन यांच्यावर तेलासाठी प्रक्रिया करणारे कारखाने सुरू होऊ शकतात. भारत देश दरवर्षी लाखो टन खाद्यतेलांची आयात करीत आहे. २००४–०५ मध्ये ५२.९० लाख टन खाद्यतेलाची आयात झाली हे सर्वांना माहीत आहे. तेलबियांवर प्रक्रिया उद्योगाचा व्यवस्थित विचार केला तर या उद्योग क्षेत्रातही हजारो कोरडवाहू शेतकऱ्यांना हंगामी रोजगार उपलब्ध करून देता येईल. अशा हंगामी प्रक्रिया उद्योगांत हजारो कोरडवाहू शेतकऱ्यांना सामावून घेतले तर त्यांच्यासाठी हे अतिरिक्त उत्पन्नाचे साधन ठरेल.

याशिवाय मराठवाड्यातल्या दुष्काळी भागाचा स्वतंत्र विचार केल्याशिवाय त्या भागाचा विकास होणे शक्य नाही. सध्या एस्.ई.झेड चा बोलबाला आहे. भारतातील विविध प्रांतांत एस्.ई.झेड च्या नावाखाली हजारो हेक्टर जमीन सलग खरेदी करण्यासाठी उद्योगपतींची धावपळ सुरु आहे. शासनही त्याला प्रोत्साहन देत आहे. एस्.ई.झेड मुळे उद्योग वाढला तर हजारोंना रोजगाराची संधी मिळेल असे सांगितले जाते. उद्योगपतींना उद्योग त्वरित उभा करता यावा आणि त्या उद्योगाला त्वरित बरकत यावी म्हणून सवलतीच्या दरात या उद्योगक्षेत्राला लागणारे पाणी, वीज खात्रीने उपलब्ध करून देण्यात येत आहे. आयात निर्यातीवर सवलत दिली जाणार आहे. शिवाय त्यांच्या उद्योगक्षेत्रात कोणाचाही हस्तक्षेप नको म्हणून लुडबूड करणाऱ्यावर बंधने घातली जाणार आहे, थोडक्यात एस्.ई.झेड म्हणजे स्वायत्त, स्वतंत्र असे उद्योगपतींचे राज्यच. अशा क्षेत्रात परवानगीशिवाय कोणालाही प्रवेश मिळू शकणार नाही असे बोलले जाते.

एस्.ई.झेड चा मुख्य गाभा लक्षात घेता तशाच प्रकारचा प्रयोग एस्.ए.झेड ची कल्पना राबवून करता येण्यासारखा आहे. एस्.ए.झेड म्हणजे स्पेशल ॲग्रीकल्चरल झोन मराठवाड्याच्या दुष्काळी भागाचा आणि शेतीचा विकास एस्.ए.झेड ही कल्पना वापरून करता येण शक्य आहे. एस्.ए.झेड साठी एस्.ई.झेड प्रमाणेच पंधरा वीस हजार हेक्टरचा सलग दुष्काळी भूप्रदेश निवडावा.

या सर्व भूप्रदेशाचा पाणलोट क्षेत्रविकास करावा. या प्रदेशावर पडणाऱ्या पावसाची नोंद घेऊन जागोजागी पाणी अडवावे, जुन्या विहिरी दुरुस्त कराव्यात, शक्य तेथे नव्या विहिरी घ्याव्यात, छोटी मोठी धरणे, बंधारे बांधावेत, जुनी धरणे आणि बंधाऱ्यांची दुरुस्ती करावी. त्यातील गाळ धरणाच्या वा बंधाऱ्याच्या पाणलोट क्षेत्रावर पसरावा. त्यामुळे या क्षेत्रावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचा उपयोग जास्तीत जास्त शेतीसाठी करता येईल. पाण्याचा काटकसरीने वापर व पिकास लागणाऱ्या पाण्याचा हिशेब शेतकऱ्यांना शिकवावा. गाळ टाकल्यामुळे पहिली काही वर्षे शेतकऱ्याला रासायनिक खते वापरण्याची गरज पडणार नाही. त्याचा खर्च वाचेल.

एस्.ए.झेड मध्ये समाविष्ट असलेल्या गावांसाठी बँकांनी सवलतीचे धोरण स्वीकारावे. खरीप आणि रब्बीसाठी शेतकऱ्यांना बँकांनी दरडोई पाच-सात रुपये बियाणे खत खरेदी करण्यासाठी अनामत म्हणून द्यावे. त्याची फेड त्याने हंगाम संपल्यावर करून घ्यावी. ही अनामत रक्कम म्हणजे कर्ज नसावी. त्याचे स्वरूप

उसनवारीसारखे असावे. हा व्यवहार करण्यासाठी बँकांनी शेतकऱ्यांकडून ५०-१०० रु व्यस्थापन खर्च घेण्यास हरकत नाही. दरवर्षीच्या शेती हंगामासाठी ही प्रथा सुरू झाली तर छोट्या शेतकऱ्याला सावकाराच्या दारात जाण्याची वेळ येणार नाही.

एस्.ए.झेड च्या क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक गावात ग्राम पंचायत आणि विकासाची जाणीव असलेल्यांची समिति नेमावी व त्या समितीद्वारे शेती, पीकपाणी, शेती उत्पादनावर प्रक्रिया उद्योग, इत्यादींचे गावकऱ्यांना प्रशिक्षण द्यावे. प्रत्येक गावात धान्याचे गोडाऊन बांधावे. सेवा सहकारी सोसायटीने माल सांभाळण्याचा खर्च शेतकऱ्यांकडून घ्यावा. या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांची आर्थिक गरज तात्पुरती भागेल. शेतकऱ्यावर गरजेपोटी पडेल भावात माल विकण्याची पाळी येणार नाही. चांगला भाव आल्यावरच तो आपले उत्पादन विकेल. गावात होणाऱ्या कृषी उत्पादनावरील काही धान्यावर प्रक्रिया करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. गावातच तेल, पेंड, डाळी तयार करून मगच ती बाजारात जाईल अशी व्यवस्था करावी. शासनाने अशा वस्तू हमी भावाने खरेदीची व्यवस्था केली तर अधिक सोपे होईल.

दुष्काळी भागातील दुभत्या जनावरांची वाढ करण्यासाठी विशेष योजना आखावी. गावातील दूध डेअरीच्या वतीने दुधावर प्रक्रिया करून दही, ताक, लोणी, तूप तयार करण्याची यंत्रसामुग्री आणि त्या संबंधीचे सर्व प्रशिक्षण संबंधितांना द्यावे. प्रक्रियेनंतर तयार होणाऱ्या मालासाठी शासनाने बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी. पहिली पाच वर्षे एस्.ए.झेड च्या गावात निर्माण होणाऱ्या सर्वच वस्तूवर शासनाने सबसिडी द्यावी.

दुष्काळी भागात आरोग्याचे प्रश्नही फारच गंभीर आहेत. मुलींच्या लग्नाचे वय १८ पर्यंत पोहचलेले नाही. प्राथमिक आरोग्य केन्द्र नावालाच उभे आहेत. तेथे २४ तास सोडा काही तासही आरोग्य कर्मचारी उपस्थित नसतात. एस्.ए.झेड साठी निवडलेल्या क्षेत्रात सर्वांना आरोग्याच्या सेवा मिळतील याची हमी देण्यात यावी. त्यासाठी स्वतंत्र ग्रामीण रुग्णालय उभे करावे आणि सतत आरोग्य सेवा उपलब्ध ठेवावी. फिरत्या रुग्णवाहिकेची सोय असावी. एस्.ए.झेड सुरू झाल्यापासून पहिल्या पाच वर्षांत १८ वर्षांनंतर मुलीचे व २१ वर्षांनंतर मुलाचे लग्न करणाऱ्या कुटुंबाला भरघोस आर्थिक मदत जाहीर करावी. माता. बालसंगोपनाचा कार्यक्रम प्रयत्नपूर्वक राबवावा. ग्रामीण स्वच्छता वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत. एस्.ए.झेड क्षेत्रात येणाऱ्या गावासाठी आरोग्याचे विशेष कार्यक्रम राबवावेत.

शिक्षणासाठीची पायाभूत व्यवस्था प्रत्येक गावात करावी. शाळेची इमारत आणि शाळेचे प्रांगण सुंदर असावेच पण त्याचबरोबर त्या शळेत शिकवणाऱ्या शिक्षकांना व इतर कर्मचाऱ्यांना गावातच राहणे बंधनकारक करावे. एस्.ए.झेड क्षेत्रातील गावासाठी यांत्रिक आणि तांत्रिक शिक्षण देणारी महाविद्यालये उभी करावीत आणि तेथे सवलतीच्या दराने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जावे. १२वी ला चांगले गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिक्षणाची सर्व सोय शासनाने करावी. त्यासाठी होणारा खर्च त्याला नोकरी देऊन त्याच्याकडून हवा तर वसूल करण्यास हरकत नसावी. एस्.ए.झेड मध्ये येणाऱ्या सर्व गावांतून कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे बांधावीत आणि तेथे राहणाऱ्यांसाठी पाणी, लाईट, रस्ते इत्यादींची सोय करावी. या घरात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून ग्रामपंचायतीने भाडे वसूल करावे. म्हणजे ग्रामपंचायतचे उत्पन्नही वाढेल. एस्.ए.झेड च्या गावात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना हवा तर वेगळा भत्ता देण्यात यावा.

अशा अनेक योजना एस्.ए.झेड मध्ये आखाव्यात आणि त्यासाठी पहिली पाच ते सात वर्षे त्या भागातील खेड्यांना भरपूर आर्थिक सहकार्य करावे, विविध सवलती द्याव्यात. असे झाले तर पंधरा-वीस हजार हेक्टरचा दुष्काळी भाग उत्तम प्रकारे विकसित होईल. शेती, शिक्षण आणि आरोग्य या विकासाच्या पायाभूत गरजा आहेत असे मानले जाते. एस्.ई.झेड साठी शासन भरपूर सवलती देऊ शकते तर एस्.ए.झेड साठी का देऊ शकत नाही 'मेगा वॉटरशेड' मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात चालू आहे. त्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यात स्पेशल ॲग्रीकल्चरल झोन निवडावा. आणि तेथे विकासाच्या बहुविध योजना विशेषत्वाने राबवाव्यात. असा प्रयोग करण्याचे धाडस शासनाने दाखवावे. यातून निश्चितच दुष्काळी भागाचा विकास साधेल असे मला वाटते.

उद्योग धंद्याचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास ही कल्पना अपूरी आहे. ग्रामीण भागातील शेतीचा विकास उद्योग समजून करणे गरजेचे आहे. त्यासाठी एस्.ई.झेड प्रमाणेच सवलती दिल्या गेल्या पाहिजेत. शेतीत सुधारणा झाली. वरील उपाययोजना अमलात आणल्या तर गावकऱ्यांना बाराही महिने रोजगार उपलब्ध होईल. गावांतील पाच दहा कुटुंबाऐवजी हजारो कुटुंबांत संपन्नता निर्माण होईल. अशी विकेंद्रित अर्थ व्यवस्था लोकशाहीला बळकट करू शकेल. एस्.ई.झेड मुळे नवा वसाहतवाद पुन्हा भारतात जन्म घेतो की काय अशी शंका अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे.

एस्.ए.झेड प्रकल्प राबविल्यामुळे वसाहतवाद निर्माण होण्याचा प्रश्नच संभवत नाही. प्रयोग म्हणून मराठवाड्याच्या प्रत्येक जिल्ह्यातून पंधरा वीस हजार हेक्टर सलग भूभाग आणि गावे निवडून गावचा सर्वांगिण विकास एस्.ए.झेड च्या कल्पनेतून राबवावा. अशा छोट्या छोट्या प्रकल्पातून ग्रामव्यवस्थेला बळकटी येईल. एस्.ए.झेड ही भारतीय लोकशाहीच्या विकेंन्द्रित अर्थव्यवस्थेला बळकट करणारी, पंचायत राज व्यवस्था मजबूत करणारी असेल. यामुळे खेड्यातला माणूस खेड्यातच राहील तोही सुखाने.

शिक्षण देखील वरचेवर महागडे होत चालले आहे. विविध क्षेत्रांत नव्या शासकीय शिक्षण संस्थांची संख्या वाढविण्याचे शासनाने बंद केले आहे, खासगीकरणाला प्राधान्य दिले आहे. खाजगी संस्था चालविणारे सत्ताधारी किंवा श्रीमंत वर्गातले असल्यामुळे त्यांना अशा संस्था चालविणे सोपे आहे. भरमसाठ फी आकारल्यामुळे आणि टेबलाखालून पैसे गोळा करण्याची पध्दत सुरू झाल्यामुळे तांत्रिक किंवा आरोग्य शिक्षण घेणे गरिबांना कठीण झाले, गरीब कुटूंबातूनही बुध्दिमान तरूण आहेत मात्र आजच्या या खाजगीकरणाच्या युगात त्यांना उच्च शिक्षण घेणे परवडणारे नाही यामुळे ग्रामीण भागातील बुध्दिवंत तरुणांची पिढीच बरबाद होते की काय अशी शंका अनेकांच्या मनात निर्माण होत आहे.


वंचीताना उच्च शिक्षणाची संधी कल्पना राबवून देता येईल. महागडया शिक्षणपध्दतीमुळे गरीब विद्यार्थ्यांवर घरी बसण्याची पाळी येते असेल तर मधल्या विद्यार्थ्यासाठी शासनाने दत्तक योजना सुरू करावी. अशा तरुणांच्या शिक्षणावर होणारा खर्च शासनाने करावा, शिक्षण संपल्यावर त्याला नोकरीची हमी द्यावी. त्याला मिळणाऱ्या पगारातून हप्त्या हप्त्याने शासनाने त्यांच्यासाठी केलेला खर्च वसूल करावा. असे केले तरच गरीब विद्यार्थ्यांना संधी मिळेल आणि त्याच्या बुध्दीचा उपयोग देश घडविण्यासाठी होईल.

❑

*ग्रामीण जीवनाच्या सद्यस्थितीवर प्रकाशझोत टाकणारे आणि ग्रामीण पुनर्रचनेबाबत मार्गदर्शन करणारे उद्‌बोधक पुस्तक – गांव झिजत आहे.*

**– ग. प्र. प्रधान**

**लेखकाविषयी**



डॉ. द्वारकादास लोहिया यांचा जन्म पाटोदा, ता. अंबाजोगाई जि. बीड या गावात ०७ सप्टेंबर १९३८ साली झाला. कुटुंबातून स्वातंत्र्याचे संस्कार झाले. अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेत शिकत असताना आचार्य ग. धो. देशपांडे व किंबहुने गुरूजींनी राष्ट्र सेवा दलाचे संस्कार त्यांच्या मनात पेरले आणि रुजवले, तेच पुढे पिडीत, शोषीत ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी समविचारी सहकाऱ्यांसमवेत मानवलोकच्या रूपाने अंकुरले.

१९७२ चे दुष्काळ विरोधी आंदोलन, मराठवाडा विकास आंदोलन, भ्रष्टाचार विरोधी मोहीम, मंत्र्यांना गावात प्रवेशबंदी, भ्रष्ट पोलीस व अधिकाऱ्यांना नजराणा अशा उपक्रमात पुढाकार व नेतृत्व. यामुळे अनेकदा तुरुंगवास. १९७५च्या आणीबाणीत १८ महिने गजाआड.

ग्रामीण विकासाचे काम करताना परदेशात झालेले विकास कार्य आपल्या परिसरात राबविण्याच्या भूमिकेतून इस्राईल, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, कॅनडा, नेदरलॅन्ड, इंग्लंड, हॉलंड, इ. देशांना भेट. ग्रामीण विकासाच्या विविध पुरस्कारांनी सन्मानित. पाणी आणि शेती हा जिव्हाळ्याचा विषय. विविध परिषदा, व्याख्यानमाला, चर्चासत्रे इ. माध्यमातून प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी, विविध वर्तमानपत्रे, मासिके यातून लिखाण. मेशपालन आणि लोकरउद्योग, पंचायत राज, मराठवाडा दुष्काळ, शोचनीय शौचालये, ग्रामपंचायतीत महिलांचा सहभाग इ. पुस्तिका प्रकाशित.